अनेक पुस्तके ज्यावर आधारली आहेत, असा मूळ संदर्भ...

सुधारित
अभ्यासक्रमानुसार
२०१९

महत्त्वाचे मुद्दे, तक्ते व
नव्या धर्तीचे आणि वाढत्या
काठिण्यपातळीचे भरपूर
वस्तुनिष्ठ प्रश्न

# PSI
# STI
# ASO
# पूर्व परीक्षा



इकॉनॉमिक सर्व्हे, २०१७-१८
भारत वनस्थिती अहवाल, २०१७
महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१७-१८
जागतिक विकास अहवाल, २०१७
आयपीसीसीचा मूल्यांकन अहवाल, २०१५
मानव विकास अहवाल, २०१६

लेखन-संस्करण
के'सागर

के'सागर पब्लिकेशन्स

**Published By**
Sau. Shobhadevi Kshirsagar
**K'Sagar Publications**
'Suvarna Shilpa', 444/1 Shaniwar Peth,
Adjacent to Rajmachikar Flour Mill,
Near Dakshinabhimukhi Maruti Temple,
Pune - 411 030 : 24450125, 24455435
Fax : 91-020-24453065

***Email : customer@ksagar.com***
***sales@ksagar.com***
***website : www.ksagar.com***

◆◆◆◆◆◆◆◆◆

© K'Sagar Publications, Pune : 2013
Twenty-first Edition as per new syllabus : 2019
(Eightieth edition of the original book)
**ISBN 978-81-927789-8-3**

The name K'Sagar is registered
under the trade marks Act, 1999

◆◆◆◆◆
**Printed at**
Mayur Prints
Kasba Peth, Pune
◆◆◆
**Typesetting**
K'Sagar Publications, Pune
◆◆
**Cover Design**
K'Sagar Publications, Pune
◆
**Price : ₹ 595/-**

| Our Firms | K'Sagar Book Centre | K'Sagar's House of Books | K'Sagar's House of Books |
|---|---|---|---|
| | Appa Balwant Chowk,<br>Pune - 411 002<br>(020) 24453065<br>9823121395<br>9545567862 / 63 | Satya-ganesh Sankul,<br>102, Budhwar Peth,<br>Jogeshwari Mandir Lane,<br>Pune - 411 002<br>(020) 24465650<br>9923810566 | 39/1, Durga Chambers,<br>Jogeshwari Mandir Lane,<br>Pune - 411 002<br>(020) 24483166<br>9923906500<br>8087722277 |

Due care has been taken to ensure that the information provided in this book is correct. However, the authors and the publishers bear no responsibility for any damage resulting from any inadvertent omission or inaccuracy in the book.

# K सागरीय...

सन २०१३ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने विक्रीकर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक व मंत्रालय सहायक पदांसाठी स्वतंत्रपणे घेतल्या जाणाऱ्या पूर्व परीक्षेच्या अभ्यासक्रमात काही आवश्यक स्वरूपाच्या मूलभूत सुधारणा केल्या.

अनेकांना अभ्यासक्रमातील हा बदल धक्कादायक वाटला असला तरी निरपेक्ष दृष्टिकोनातून पाहू गेले असता हा बदल विचारपूर्वक केलेला, विधायक व अधिक न्याय्य स्वरूपाचाच असल्याचे दिसून येते. पूर्वीच्या सामान्य क्षमता चाचणी या दीडशे प्रश्नांच्या व दीडशे गुणांच्या प्रश्नपत्रिकेऐवजी आपणास आता सामान्य क्षमता या शंभर प्रश्नांच्या व शंभर गुणांच्या प्रश्नपत्रिकेचा एका तासाच्या अवधीत यशस्वीपणे मुकाबला करावयाचा आहे.

या नव्या अभ्यासक्रमाचे विश्लेषण केले असता बव्हंशी पूर्वीच्याच अभ्यासक्रमाची व्याप्ती आयोगाने वाढविली असल्याचे व असे करताना सर्व विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांना यथायोग्य न्याय दिल्याचे प्रकर्षाने जाणवते. नवीन अभ्यासक्रमानुसार भारतीय अर्थव्यवस्था या एका व्यापक घटकाचा या अभ्यासक्रमात नव्याने समावेश केला गेला आहे.

महाराष्ट्रातील समाजसुधारक हा घटक अभ्यासक्रमातून वगळला असला तरी पूर्वीच्या ‘भारताचा सामान्य इतिहास’ या घटकाऐवजी ‘आधुनिक भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा इतिहास’ हा घटक अभ्यासक्रमात समाविष्ट केला असल्याने त्या अंतर्गत महाराष्ट्रातील समाजसुधारक हा घटक आपणास अभ्यासावाच लागणार आहे.

आपल्या नवीन अभ्यासक्रमात भारताचा भूगोल या विषयाचा स्पष्टरीत्या समावेश नसला तरी भूगोल (महाराष्ट्राच्या भूगोलाच्या विशेष अभ्यासासह) या घटकांतर्गत काही प्रमाणात का होईना भारताच्या भूगोलाचा अभ्यास आपणास करावाच लागणार आहे. पूर्वीच्या अभ्यासक्रमातील अंकगणित या घटकाऐवजी आता अंकगणित व बुद्धिमापन चाचणी या संयुक्त अभ्यासघटकाचा अभ्यास करणे अनिवार्य ठरले आहे. नागरिकशास्त्र, सामान्य विज्ञान व चालू घडामोडी हे पूर्वीचे घटक नवीन अभ्यासक्रमातही कायम ठेवण्यात आले आहेत.

नव्या अभ्यासक्रमाच्या विस्तृत कक्षा, व्यापकता व सखोलता लक्षात घेऊन प्रस्तुतच्या १,०४८ पृष्ठांच्या या ग्रंथराजाची रचना साकारली आहे. ही रचना साकारताना आपल्या अभ्यासक्रमातील सातही घटकांचा सखोल, व्यापक तरीही परीक्षाभिमुख परामर्श घेतला आहे. या संदर्भग्रंथाची रचना करताना आयोगाने अंगीकारलेल्या नव्या दृष्टिकोनाची आणि आयोगाच्या प्रश्नांच्या नव्या धर्तीची जाण ठेवली असून त्याचे योग्य ते भान राखले आहे.

या संदर्भग्रंथातील पृथ्वी, जगातील विभाग, हवामान, अक्षांश, रेखांश या प्रकरणाची रचना करताना प्रकाशनाच्या अस्मादिकांनी संस्करित केलेल्या प्रा. सु. प्र. दाते यांच्या ‘प्राकृतिक भूगोल’ या संदर्भाचा तद्वतच राज्य प्रशासन या प्रकरणाची रचना साकारताना अस्मादिकांनी संस्करित केलेल्या प्रा. व्ही. बी. पाटील लिखित भारतीय प्रशासन या ग्रंथांचा मुक्त संदर्भ घेतला आहे. त्यांचे ऋण येथे व्यक्त करणे मी अगत्याचे मानतो.

शुभेच्छांसह!!

आपला,

**व्ही. एस. क्षीरसागर**

**(K'Sagar)**

# अनुक्रमणिका

## विभाग पहिला– नागरिकशास्त्र


### १. भारतीय राज्यघटना १५

**प्रास्ताविक**

- घटना निर्मिती
- राष्ट्रसन्मान कार्ये
- भारतीय घटनेचा सरनामा
- भारतीय घटनेची वैशिष्ट्ये
- महत्त्वाची प्रकरणे व परिशिष्टे
- मूलभूत हक्क
- मूलभूत कर्तव्ये
- मार्गदर्शक तत्त्वे

**भारतीय संघराज्य**

- कार्यकारी मंडळ
- राष्ट्रपती
- राष्ट्रपतींचे अधिकार
- घटनात्मक संरक्षण
- राष्ट्रपती व मंत्रिमंडळ
- उपराष्ट्रपती
- पंतप्रधान व त्याचे मंत्रिमंडळ

**विधिमंडळ किंवा संसद**

- लोकसभा
- राज्यसभा

**भारताची न्यायसंस्था**

- सर्वोच्च न्यायालय
- उच्च न्यायालये

**घटकराज्यांचे शासन**

- विधानसभा
- विधानपरिषद

**अन्य महत्त्वाच्या बाबी**

- भारताचा महान्यायवादी
- भारताचे सरहिशेबतपासनीस
- कंट्रोलर जनरल ऑफ अकाऊंट्स
- काही महत्त्वाच्या घटनादुरुस्त्या
- महत्त्वाच्या नोंदी
- काही महत्त्वाची पदे व विहित वय

### २. जिल्हा प्रशासनासह राज्यप्रशासन ४९

**राज्यव्यवस्थापन**

- भारत हा राज्यांचा संघ
- घटक राज्यांची शासनव्यवस्था
- राज्यपाल
- राज्यपालाचे अधिकार व कार्ये
- राज्यपालाचे स्थान
- मुख्यमंत्री
- मंत्रिमंडळ
- राज्य मंत्रिमंडळाची कार्ये
- राज्य सचिवालय
- सचिवालयाची कार्ये
- सचिवालयाची रचना
- मुख्य सचिव
- कार्यकारी विभाग

जिल्हा प्रशासन

- जिल्हा– प्रशासनाचा महत्त्वपूर्ण घटक
- जिल्हाधिकारी
- जिल्हाधिकाऱ्याची महत्त्वपूर्ण कार्ये
- तहसीलदार

ग्रामस्तरावरील अधिकारी

- पोलीस पाटील
- कोतवाल
- तलाठी

३. ग्रामव्यवस्थापन (प्रशासन) ७२

स्थानिक शासन

- स्वातंत्र्योत्तर काळातील विकास
- महाराष्ट्रातील पंचायत राज्य

जिल्हा परिषद

- पंचायत राज्यातील शिखर संस्था
- जिल्हा परिषदेची रचना
- अध्यक्ष व उपाध्यक्ष
- मुख्य कार्यकारी अधिकारी
- मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची भूमिका
- जिल्हा परिषदेचे अधिकार व कार्ये
- जिल्हा परिषदेच्या विषय समित्या
- परिषदेच्या सभा
- अंदाजपत्रक

पंचायत समिती

- विकास गट स्तरावरील संस्था
- पंचायत समितीची रचना
- सभापती व उपसभापती
- सरपंच समिती
- गटविकास अधिकारी
- पंचायत समितीचे अधिकार व कार्ये
- पंचायत समितीचे अंदाजपत्रक
- पंचायत समितीचे विसर्जन

ग्रामपंचायत

- पंचायत राज्याची पायाभूत संस्था
- ग्रामपंचायतीची रचना
- ग्रामनिधी
- ग्रामपंचायतीची कामे
- सरपंच व उपसरपंच
- ग्रामसभा
- ग्रामपंचायत सचिव
- ग्रामपंचायतीचे अधिकार व कार्ये
- अंदाजपत्रक, हिशेबतपासणी
- राज्यस्तरीय मूल्यमापन समित्या
- केंद्रस्तरीय मूल्यमापन समित्या
- त्र्याहत्तरावी घटनादुरुस्ती
- पंचायतराज्याशी संबंधित राज्यघटनेतील तरतुदी

४. हे लक्षात ठेवा! ११०

५. वस्तुनिष्ठ प्रश्न १२७

## विभाग दुसरा– आधुनिक भारताचा विशेषतः महाराष्ट्राचा इतिहास

१. आधुनिक भारताचा इतिहास १६७

- भारतात इंग्रजी सत्तेची स्थापना
- ईस्ट इंडिया कंपनीचे आर्थिक धोरण
- १८५७ चा उठाव
- सामाजिक व सांस्कृतिक जागृती

- राष्ट्रीय सभेचा स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग
- सशस्त्र क्रांतिकारकांचे कार्य
- परदेशातील कार्य
- भारताची घटनात्मक प्रगती
- महत्त्वाचे गव्हर्नर जनरल आणि व्हाईसरॉय आणि ठळक घडामोडी
- स्वातंत्र्योत्तर भारताचा इतिहास
- पंडित जवाहरलाल नेहरू
- इंदिरा गांधी
- राजीव गांधी
- पी. व्ही. नरसिंहराव
- अटल बिहारी वाजपेयी
- डॉ. मनमोहन सिंग
- नरेंद्र मोदी
- गव्हर्नर जनरल व राष्ट्रपती

**२. महाराष्ट्राचा इतिहास** २०९

- महाराष्ट्र नावाची व्युत्पत्ती
- संक्षिप्त इतिहास
- इंग्रजांची राजवट
- संयुक्त महाराष्ट्राची चळवळ
- संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचा भडका
- संयुक्त महाराष्ट्र समिती
- संयुक्त महाराष्ट्र वास्तवात

**३. महाराष्ट्रातील समाजसुधारक**
**(महाराष्ट्राच्या इतिहासाच्या अनुषंगाने)** २२६

- महात्मा जोतीबा फुले (१८२७-१८९०)
- गो. ग. आगरकर (१८५६-१८९५)
- महर्षी धोंडो केशव कर्वे (१८५८-१९६२)
- राजर्षी शाहू महाराज (१८७४-१९२२)
- कर्मवीर भाऊराव पाटील (१८८७-१९५९)
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९१-१९५६)
- विद्यमान समाजसुधारक

**४. हे लक्षात ठेवा!** २४८

**५. वस्तुनिष्ठ प्रश्न** २६६

- स्पष्टीकरणे


## विभाग तिसरा– भारतीय अर्थव्यवस्था


**१. लोकसंख्या, दारिद्र्य व बेरोजगारी** ३११

- भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप
- भारताची लोकसंख्या
- भारत : साक्षरता
- अनुसूचित जाति-जमाती
- लोकसंख्याविषयक धोरण
- भारतातील दारिद्र्य
- भारतातील बेरोजगारी
- रोजगारनिर्मितीचे शासकीय प्रयत्न
- भारताचा विदेशी व्यापार
- परकीय कर्जाचा वाढता बोजा
- औद्योगिक धोरण, १९९१
- मक्तेदारी आणि व्यापार प्रतिबंधक अधिनियम, १९६९
- स्पर्धा कायदा, २००२
- आर्थिक धोरण, १९९१
- सार्वजनिक क्षेत्रासाठी आरक्षित असलेले उद्योग
- नवरत्न, मिनीरत्न, महारत्न
- राष्ट्रीय वस्तू उत्पादन धोरण-२०११
- काही महत्त्वाच्या योजना / कार्यक्रम
- महत्त्वाच्या संस्था व स्थापना वर्षे
- महत्त्वाच्या समित्या व विषय

## २. पंचवार्षिक योजना ३६९

- भारतातील नियोजन
- नियोजन आयोग
- राष्ट्रीय विकास परिषद
- पहिली पंचवार्षिक योजना १९५१-५६
- दुसरी पंचवार्षिक योजना १९५६-६१
- तिसरी पंचवार्षिक योजना १९६१-६६
- मध्यंतरीच्या वार्षिक योजना
- चौथी पंचवार्षिक योजना १९६९-७४
- पाचवी पंचवार्षिक योजना १९७४-७९
- सहावी पंचवार्षिक योजना १९८०-८५
- सातवी पंचवार्षिक योजना १९८५-९०
- आठवी पंचवार्षिक योजना १९९२-९७
- नववी पंचवार्षिक योजना १९९७-२००२
- दहावी पंचवार्षिक योजना २००२-०७
- अकरावी पंचवार्षिक योजना २००७-१२
- बारावी पंचवार्षिक योजना कार्यान्वित
- योजनानिहाय अपेक्षित वृद्धिदर व साध्ये
- नियोजन व आर्थिक विकास

## ३. भारताचा परकीय व्यापार ३८८

- जागतिक व्यापारात भारत
- जागतिक व्यापारात हिस्सा नगण्य
- भारताच्या प्रमुख निर्यात वस्तू
- आयात-निर्यात धोरण
- आयात-निर्यात धोरण (२००९-१४)
- परकीय व्यापार धोरण (२०१५-२०)
- निर्यात विभाग
- विशेष आर्थिक क्षेत्रे (SEZ)
- भारताचे व्यापारी संबंध
- भारताचा आयात व्यापार
- प्रतिकूल व्यापारशेष
- भारताचा व्यवहारशेष
- जागतिक बँक
- आंतरराष्ट्रीय नाणेनिधी
- युरोपीय महासंघ
- जागतिक व्यापार संघटना

## ४. शासकीय अर्थव्यवस्था : अर्थसंकल्प, लेखा, लेखापरीक्षण ४१८

- शासनाचे आर्थिक धोरण
- शासकीय अंदाजपत्रक
- शून्याधारित अंदाजपत्रक
- अंदाजपत्रकासंबंधित राज्यघटनेतील तरतुदी
- भारतीय कररचना
- केंद्र व राज्ये यांच्यातील आर्थिक संबंध
- अर्थ आयोग
- कम्प्ट्रोलर जनरल ऑफ अकाऊंट्स
- लेखाविषयक संसदीय समित्या
- तुटीचा अर्थभरणा
- भारताचा एकत्रित व संचित निधी
- भारताचा आकस्मिक खर्च निधी
- अर्थविषयक विधेयक
- भारताचे सरहिशेबतपासनीस
- परकीय साहाय्य
- व्यापारविषयक करार

## ५. भारतीय बँक व्यवस्था ४४२

- प्राथमिक माहिती
- भारतातील बँकिंग संरचना
- रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया
- बँकांचे राष्ट्रीयीकरण
- नरसिंहम समिती-२
- स्टेट बँक ऑफ इंडिया
- प्रादेशिक ग्रामीण बँका
- अग्रणी बँक योजना

### कृषि–पतपुरवठा

- त्रिस्तरीय सहकारी कृषि-पतपुरवठा संस्था
- भू-विकास बँका

**वित्तीय महामंडळे/विकास बँका**

- भारतीय औद्योगिक पतपुरवठा आणि गुंतवणूक महामंडळ
- भारतीय औद्योगिक विकास बँक
- भारतीय निर्यात-आयात (EXIM) बँक
- भारतीय लघुउद्योग विकास बँक
- राज्य वित्तीय महामंडळे
- युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया
- भारतीय आयुर्विमा महामंडळ

**६. मुद्रा आणि राजकोषीय नीती** ४६५

- रिझर्व्ह बँकेच्या पतनियंत्रण-पद्धती
- बँकदराबाबतचे धोरण
- रिझर्व्ह बँक आणि खुल्या बाजारातील व्यवहार
- राखीव रोखता प्रमाणाबाबतचे धोरण
- वैधानिक रोखता गुणोत्तर (SLR)
- रोखता समायोजन
- रिझर्व्ह बँकेचे गुणात्मक पतनियंत्रण
- नरसिंहम समिती-१
- बँकींग अम्बुड्समन योजना

**७. वस्तुनिष्ठ प्रश्न** ४७७

- स्पष्टीकरणे

## विभाग चौथा– भूगोल : महाराष्ट्राच्या भूगोलाच्या विशेष अभ्यासासह

**१. पृथ्वी व अक्षांश-रेखांश** ५६१

- खगोलशास्त्र
- सूर्यकुल
- सूर्यकुलातील ग्रह
- पृथ्वी : अक्षांश व रेखांश
- पृथ्वीचे परिवलन
- रेखांश आणि वेळ
- पृथ्वीचे परिभ्रमण
- चंद्र
- ग्रहणे
- पृथ्वीचे अंतरंग

**भू–कवचात बदल घडवून आणणाऱ्या शक्ती**

- अंतर्गत शक्ती
- बाह्यशक्तीचे कारक

**२. हवा आणि हवामान** ५८६

- हवा
- सौरशक्ती व हवेचे तापमान
- सौरशक्ती
- सौरशक्तीच्या वितरणावर प्रभाव पाडणारे घटक
- तापमानाचे भौगोलिक वितरण
- तापमानकक्षा
- हवेचा दाब
- पृथ्वीवरील हवेच्या दाबाचे वितरण
- भूपृष्ठावरील हवेच्या दाबाचे पट्टे
- ग्रहीय वारे
- मोसमी वारे
- आवर्त व प्रत्यावर्त
- काही वादळवारे
- पाऊस

**३. भारताचा भूगोल अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने** ६०६

- प्रास्ताविक
- भारत– प्राकृतिक रचना
- भारत– भू-स्तररचना
- भारत– मृदा
- भारत– नदीप्रणाली
- भारतातील नद्या
- भारत– वने
- भारतातील राष्ट्रीय उद्याने

- भारतातील अभयारण्ये
- भारतातील व्याघ्र प्रकल्प
- भारतातील जल व विद्युत प्रकल्प
- औष्णिक विद्युत प्रकल्प
- भारतातील कृषि-उत्पादने
- भारतातील खनिजे
- उद्योगधंदे व प्रमुख शहरे
- लघुउद्योग व प्रसिद्ध ठिकाणे

## ४. महाराष्ट्राचा भूगोल एक विशेष अभ्यास ६४६

### भू–स्तर रचना, प्राकृतिक रचना, भू–शास्त्रीय रचना, मृदा व पर्जन्य

- भू-स्तर रचना
- प्राकृतिक रचना
- भू-शास्त्रीय रचना
- मृदा
- महाराष्ट्रातील मृदेचे प्रकार
- मृदेची धूप
- मृदेच्या धूपेचे प्रकार
- पर्जन्यमान
- महाराष्ट्रातील पर्जन्याचे वितरण
- पर्जन्याची परिवर्तनशीलता
- पर्जन्य-परिवर्तनशीलतेचे परिणाम
- महाराष्ट्रातील पर्जन्याची वैशिष्ट्ये

### जलप्रणाली

- जलप्रणाली
- महाराष्ट्रातील जलप्रणाली
- महाराष्ट्रातील नद्या

### बंगालच्या उपसागराला मिळणाऱ्या नद्या

- गोदावरी
- भीमा
- कृष्णा
- पैनगंगा
- वर्धा
- वैनगंगा

### अरबी समुद्राला मिळणाऱ्या नद्या

- नर्मदा
- तापी
- कोकणातील नद्या

### महाराष्ट्रातील वने

- वनव्याप्त क्षेत्र
- वन-उत्पादने

## ५. महाराष्ट्राची आनुषंगिक व भौगोलिक माहिती ६८१

- सीमेवरील राज्ये
- महाराष्ट्रातील जिल्हे
- स्थानिक स्वराज्य संस्था
- राज्यातील शहरे
- लोकसंख्या : २०११ (प्राथमिक निष्कर्ष)
- लोकसंख्या : २००१ अंतिम निष्कर्ष
- साक्षरता : २०११ (प्राथमिक निष्कर्ष)
- साक्षरता : २००१
- शिक्षण : २०१७-१८
- शेती : २०१६-१७
- वन सर्वेक्षण : २०१७
- उत्पन्न : २०१६-१७
- आरोग्य सुविधा : जानेवारी, २०१८
- सहकारी संस्था : १ एप्रिल, २०१७
- रस्त्यांची लांबी : मार्च, २०१७
- राज्यातून जाणारे राष्ट्रीय महामार्ग
- लोहमार्ग : १ एप्रिल, २०१७
- राज्यातून जाणारे लोहमार्ग

- राज्यातील नद्या
- नद्यांच्या काठांवरील स्थळे
- नद्या व प्रमुख धरणे
- नद्या व त्यांच्या उपनद्या
- प्रमुख नद्या व उगमस्थाने
- कृषी उत्पन्न व उत्पादक प्रदेश
- फळे व संबंधित स्थळे
- जलविद्युत प्रकल्प
- औष्णिक प्रकल्प
- अणुविद्युत प्रकल्प
- आंतरराज्यीय प्रकल्प
- औद्योगिक विकासाशी संबंधित संस्था
- उद्योगधंदे व संबंधित स्थळे
- राज्यातील लघुउद्योग
- खनिजे व उत्पादक क्षेत्रे
- महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे
- राज्यातील किल्ले
- गुंफा मंदिरे
- राज्यातील अष्टविनायक
- ज्योतिर्लिंगांची स्थाने
- राष्ट्रीय उद्याने
- अभयारण्ये
- प्रमुख घाट
- प्रमुख विमानतळ
- महाराष्ट्रातील विद्यापीठे
- राज्यातील संस्थात्मक उपक्रम
- महाराष्ट्रातील प्रमुख शहरे

**६. हे लक्षात ठेवा!** ७१०

**७. वस्तुनिष्ठ प्रश्न** ७३९

## विभाग पाचवा– सामान्य विज्ञान

**१. सामान्य विज्ञानातील सामान्य माहिती** ७९५

- महत्त्वाची माहिती
- महत्त्वाची शास्त्रीय कारणे
- प्राचीन भारतीय शास्त्रज्ञ
- अर्वाचीन भारतीय शास्त्रज्ञ

**२. रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र** ८०६

काही महत्त्वाच्या संकल्पना

- मूलद्रव्ये
- भौतिक व रासायनिक बदल
- कार्बनची अपरूपे
- इंधने
- खते

महत्त्वाची माहिती

- काही मूलद्रव्ये व संज्ञा
- काही रासायनिक संयुगे व रेणुसूत्रे
- स्थिर संयुजा असलेली मूलद्रव्ये व संज्ञा
- इलेक्ट्रॉन संरूपण
- महत्त्वाची मूलद्रव्ये आणि त्यांचे उपयोग
- महत्त्वाची संयुगे व त्यांचे उपयोग
- कार्बन आणि कार्बन संयुगे
- उत्प्रेरके
- काचेचे विशिष्ट रंग व धातुसंयुगे
- किरणोत्सारी समस्थानिके व रोगनिदान वा उपचार
- काही महत्त्वाची संमिश्रे व त्यांतील घटक
- धातू व धातुके

- काही आम्ले व अल्कली
- काही किरणोत्सारी मूलद्रव्ये व त्यांचा अर्धआयुष्य काल
- आम्ल व अल्कली अनुमापनात वापरले जाणारे दर्शक व परिणाम
- काही रासायनिक पदार्थांची व्यावहारिक व शास्त्रीय नावे
- मापनाची मूलभूत एकके
- व्यवहारोपयोगी मापके
- मूलभूत एककांवर आधारित मापके

काही महत्त्वाचे नियम आणि संकल्पना

- न्यूटनचे गतीविषयक नियम
- कार्य
- शक्ती
- ऊर्जा
- बल
- संवेग
- न्यूटनचा गुरुत्वाकर्षणाचा नियम
- विशिष्ट उष्णता
- पाण्याचे असंगत आचरण
- आर्द्रता
- प्रकाशाचे अपवर्तन
- इंद्रधनुष्य
- ध्वनीचे परावर्तन
- रडार
- विद्युत्मापन- परिमाण व उपकरणे
- विद्युत : मापन, परिमाण व उपकरण
- विद्युत उपकरणे व विजेच्या परिणामाचे प्रकार
- अणुगर्भाचे भंजन
- न्यूक्लिय सम्मीलन
- कार्बन-१४
- प्रारण

**३. प्राणिशास्त्र व वनस्पतिशास्त्र** ८३१

- सजीव
- वनस्पती आणि प्राणिपेशींतील फरक
- वनस्पती वर्गीकरण
- थॅलोफायटा
- ब्रायोफायटा
- टेरिडोफायटा
- स्पर्माटोफायटा
- प्राण्यांचे वर्गीकरण
- वनस्पतींमधील प्रकाश-संश्लेषण
- गुणसूत्रे
- इंद्रियसंस्था
- पारिस्थितिकी

**४. शरीर आरोग्यशास्त्र** ८३९

- सामान्य माहिती
- जीवनसत्त्वे
- जीवनसत्त्वे व रासायनिक नावे
- रोग
- प्रतिजैविके
- वितंचक
- हार्मोन्स आणि त्यांची कार्ये
- रक्त
- अपत्यांचे रक्त
- दृष्टिदोष

**५. हे लक्षात ठेवा!** ८४५

**६. वस्तुनिष्ठ प्रश्न** ८५८

- स्पष्टीकरण

## विभाग सहावा– अंकगणित


१. संख्या ८९३
२. बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार ८९५
३. ल.सा.वि. आणि म.सा.वि. ९०१
४. वर्ग-वर्गमूळ, घन-घनमूळ ९०३
५. अपूर्णांक ९०५
६. दशांश अपूर्णांक ९०८
७. पदावली ९११
८. सरळव्याज ९१४
९. शेकडेवारी ९१७
१०. गुणोत्तर व प्रमाण ९१९
११. सरासरी ९२१
१२. विविध परिमाणे ९२३
१३. नफा-तोटा ९२६
१४. काळ - काम - वेग ९३०
१५. क्षेत्रफळ ९३३


## विभाग सातवा– बुद्धिमापन चाचणी


१. बुद्धिमापन चाचणी ९४१

- सूचनापालन (अनुसरण)
- समसंबंध
- वर्गीकरण
- श्रेणी अथवा क्रम
- तर्कशक्ती आणि अनुमान
- सांकेतिक लिपी
- नमुना प्रश्नपत्रिका - १
- उत्तरे
- नमुना प्रश्नपत्रिका - २
- उत्तरे

२. बुद्धिमापन चाचणी संमिश्र महत्त्वाचे प्रश्न ९८५



## विभाग आठवा– चालू घडामोडी


■ चालू घडामोडी ९९९

■ महाराष्ट्र दुय्यम सेवा (अराजपत्रित) गट-ब पूर्व परीक्षा - २०१८ १०३१

# विभाग पहिला

# नागरिकशास्त्र




मराठी वा इंग्रजीतही राज्यघटनेवर इतका सर्वांगीसुंदर संदर्भ दुसरा नाही? **के'सागर**

# १ भारतीय राज्यघटना

## प्रास्ताविक

भारतीय जनतेने २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी भारताची घटना स्वीकृत व संमत केली. सदरहू घटना २६ जानेवारी, १९५० पासून अमलात आली.

### घटना निर्मिती

(१) कॅबिनेट मिशनच्या शिफारशींनुसार तयार केलेल्या योजनेअन्वये नोव्हेंबर, १९४६ मध्ये भारताच्या घटना समितीची रचना करण्यात आली. त्यानुसार या घटना समितीची एकूण सदस्यसंख्या ३८९ असणार होती. या ३८९ सदस्यांपैकी २९६ सदस्य ब्रिटिशव्याप्त भारताचे प्रतिनिधित्व करणार होते, तर ९३ सदस्य संस्थानांचे प्रतिनिधित्व करणार होते.

(२) जुलै-ऑगस्ट, १९४६ मध्ये ब्रिटिशव्याप्त भारतातील प्रांतांनी घटना समितीवर निवडून द्यावयाच्या २९६ जागांसाठीच्या निवडणुका पार पडल्या. काँग्रेसला २०८ जागा मिळाल्या, तर मुस्लीम लीगला ७३ जागा मिळाल्या. इतर छोटे गट व अपक्ष उमेदवारांना उरलेल्या १५ जागा मिळाल्या.

(३) वर नमूद केल्याप्रमाणे ९३ सदस्य संस्थानांचे प्रतिनिधित्व करणार होते; परंतु संस्थानांनी घटना समिती बाहेर राहावयाचे ठरविल्याने संस्थानांच्या वाट्याच्या ९३ जागा भरल्या गेल्या नाही.

(४) मुस्लीम लीगने स्वतंत्र पाकिस्तानची मागणी पुढे करून घटना समितीच्या कामकाजावर बहिष्कार घातला असल्याने अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी (म्हणजे ९ डिसेंबर, १९४६ रोजी) फक्त २०७ सदस्य उपस्थित होते.

(५) फ्रान्समध्ये प्रचलित असलेल्या प्रथेचे अनुकरण करून वयोवृद्ध नेते सच्चिदानंद सिन्हा यांची दिल्लीमध्ये भरलेल्या घटना समितीच्या पहिल्या अधिवेशनाचे हंगामी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

(६) ११ डिसेंबर, १९४६ रोजी डॉ. राजेंद्रप्रसाद यांची घटना समितीचे अध्यक्ष म्हणून तर एच. सी. मुखर्जी यांची उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवड केली गेली. सर बी. एन. राव यांची घटना समितीचे सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली.

(७) १३ डिसेंबर, १९४६ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी उद्दिष्टांचा ठराव मांडला. या ठरावाद्वारे भारतीय घटनेची मूलभूत तत्त्वे व भारतीय घटनेची संरचना याचे दिग्दर्शन केले गेले. (२२ जानेवारी, १९४७ रोजी उद्दिष्टांबाबतचा ठराव घटना समितीने मंजूर केला.)

(८) सुरुवातीस संस्थानांचे प्रतिनिधी घटना समितीपासून अलिप्त राहिले होते. देशाची फाळणी प्रस्तावित करणारी ३ जून, १९४७ ची माऊंटबॅटन योजना मान्य केली गेल्यानंतर बहुतेक सर्व संस्थांनांचे प्रतिनिधी घटना समितीत सहभागी झाले.

(९) मुस्लीम लीगच्या भारतीय प्रदेशातील प्रतिनिधींनीही घटना समितीत प्रवेश केला.

(१०) सन १९४७ च्या भारताच्या स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार घटना समितीस सार्वभौम दर्जा प्राप्त झाला. आता ती आपल्यासाठी हवी तशी घटना तयार करू शकणार होती. ब्रिटिश संसदेने भारतासाठी संमत केलेला कोणताही कायदा रद्द करण्यास वा अशा कोणत्याही कायद्यात सुधारणा वा बदल घडवून आणण्यास घटना समिती आता सक्षम होती.

(११) सन १९४७ च्या भारताच्या स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार भारताच्या घटना समितीसच आता भारताच्या विधिमंडळाचाही दर्जा प्राप्त झाला. ही समिती एकाच वेळी घटना समिती या नात्याने भारताची राज्यघटना तयार करणार होती तर भारताचे विधिमंडळ या नात्याने देशासाठी अन्य कायदेही संमत करू शकणार होती.

(१२) ही समिती वा प्रतिनिधी मंडळ जेव्हा घटना समिती म्हणून कार्ये करीत असे तेव्हा डॉ. राजेंद्रप्रसाद तिचे अध्यक्ष असत, तर जेव्हा ती विधिमंडळ म्हणून कार्ये करीत असे तेव्हा गणेश वासुदेव मावळंकर तिचे सभापती असत. अशा रीतीने या समितीने भारताची राज्यघटना तयार होऊन ती स्वीकृत व संमत केली जाईपर्यंत म्हणजे २६ नोव्हेंबर, १९४९ पर्यंत दुहेरी नात्याने आपले कार्य पार पाडले.

(१३) दरम्यानच्या काळात देशाची फाळणी होऊन पूर्व बंगाल, पश्चिम पंजाब, सिंध, बलुचिस्तान, वायव्य सरहद्द प्रांत व आसाममधील सिल्हेट जिल्हा पाकिस्तानात गेल्याने तेथून आलेल्या प्रतिनिधींचे प्रतिनिधित्व आपोआपच संपुष्टात आले. स्वाभाविकत:च स्वातंत्र्यानंतर घटना समितीच्या प्रतिनिधींची संख्या पूर्वीच्या ३८९ वरून २९९ पर्यंत कमी झाली.

(१४) २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी घटनेचा मसुदा जेव्हा भारतीय जनतेने स्वत:साठी स्वीकृत व संमत केला तेव्हा त्या दिवशी उपस्थित असलेल्या २८४ घटना समिती सदस्यांनी भारतीय जनतेच्या वतीने त्यावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

**घटना समितीने विविध कामासाठी निर्माण केलेल्या समित्या–**

| अ. क्र. | समितीचे नाव | अध्यक्ष |
|---|---|---|
| १. | संघराज्यीय अधिकार समिती | जवाहरलाल नेहरू |
| २. | संघराज्यीय राज्यघटना समिती | जवाहरलाल नेहरू |
| ३. | प्रांतिक राज्यघटना समिती | सरदार वल्लभभाई पटेल |
| ४. | मूलभूत अधिकार व अल्पसंख्याक आणि आदिवासी व अंतर्भूत न केलेली क्षेत्रे यांबाबत सल्लागार समिती | सरदार वल्लभभाई पटेल |
| ५. | मसुदा समिती | डॉ. बी. आर. आंबेडकर |
| ६. | कामकाज प्रक्रिया नियम समिती | डॉ. राजेंद्र प्रसाद |
| ७. | संस्थानांसोबत वाटाघाटी करण्यासाठी समिती | जवाहरलाल नेहरू |
| ८. | सुकाणू समिती | डॉ. राजेंद्र प्रसाद |
| ९. | घटना समितीच्या कार्याविषयी समिती | ग. वा. मावळंकर |
| १०. | कामकाज क्रम समिती | डॉ. के. एम. मुन्शी |
| ११. | गृह समिती | बी. पट्टाभी सीतारामय्या |
| १२. | राष्ट्रध्वजासंबंधी हंगामी समिती | डॉ. राजेंद्र प्रसाद |
| १३. | अधिकारपत्रे समिती | अल्लादी कृष्णस्वामी अय्यर |
| १४. | वित्त व कर्मचारी समिती | डॉ. राजेंद्र प्रसाद |

## राष्ट्रसन्मान कार्ये

घटना समिती या नात्याने घटना तयार करण्याचे कार्य करीत असतानाच आणि विधिमंडळ या नात्याने कायदे पारित करीत असतानाच समितीने काही राष्ट्रसन्मान कार्येही पार पाडली. ही कार्ये पुढीलप्रमाणे–

**भारताचा राष्ट्रध्वज**

(१) भारताचा राष्ट्रध्वज तिरंगी असून सर्वांत वर केशरी रंगाचा पट्टा, मध्ये पांढऱ्या रंगाचा पट्टा व सर्वांत खाली हिरव्या रंगाचा पट्टा अशी त्याची रचना आहे. हे तीनही पट्टे सारख्याच आकाराचे आहेत.

(२) राष्ट्रध्वजावर मध्यभागी पांढऱ्या रंगाच्या पट्ट्यावर विशिष्ट निळसर (Navy Blue) रंगात अशोकचक्र असून त्यास २४ आरे (स्पोक्स) आहेत. हे सम्राट अशोकाच्या सारनाथ येथील स्तंभावरील चक्रानुसार घेतलेले आहे.

(३) राष्ट्रध्वजाची उंची व लांबी यांचे प्रमाण २:३ असे आहे.

(४) घटना समितीने राष्ट्रध्वजाची वरील रचना २२ जुलै, १९४७ रोजी संमत व स्वीकृत केली.

**भारताचे राष्ट्रचिन्ह**

अशोकाच्या सारनाथ येथील स्तंभावरून भारताचे राष्ट्रचिन्ह घेतलेले आहे. यामध्ये तोंड उघडे असलेले तीन सिंह दर्शनी बाजूकडून दिसत असून एका सिंहाचे तोंड पाठीमागे असून ते दिसत नाही. या सिंहांच्या खालील पट्टीवर उजव्या बाजूला घोड्याचे व डाव्या बाजूला बैलाचे चित्र असून मध्ये धर्मचक्र आहे. या राष्ट्रचिन्हाच्या खाली 'सत्यमेव जयते' हे देवनागरी लिपीतील वाक्य असून त्याचा अर्थ 'फक्त सत्यच विजयी होते' (Truth Alone Triumphs) असा आहे. हे वाक्य 'मुंडक उपनिषदा'मधून घेतलेले आहे. २६ जानेवारी, १९५० रोजी आपण या राष्ट्रचिन्हाचा स्वीकार केला.

**भारताचे राष्ट्रगीत**

रवींद्रनाथ टागोरांचे 'जन-गण-मन' हे गीत भारताचे राष्ट्रगीत आहे. घटना समितीने २४ जानेवारी, १९५० रोजी या गीतास 'राष्ट्रगीत' म्हणून स्वीकृत केले.

'जन-गण-मन' हे गीत सर्वप्रथम भारतीय राष्ट्रीय सभेच्या कलकत्ता (कोलकाता) अधिवेशनात २७ डिसेंबर, १९११ रोजी गायिले गेले. टागोरांचे हे गीत पाच कडव्यांचे असून त्यांतील फक्त पहिले कडवेच संपूर्ण राष्ट्रगीत म्हणून गायले जाते. राष्ट्रगीत गाण्यास सर्वसाधारणपणे ५२ सेकंद इतका अवधी लागतो.

**राष्ट्रीय गाणे**

बंकिमचंद्र चतर्जी यांच्या 'आनंदमठ' कादंबरीतील 'वंदे मातरम्' या गीतास 'जन-गण-मन' या राष्ट्रगीताइतकाच दर्जा देण्यात आला आहे. हे गीत भारतीय राष्ट्रीय सभेच्या १८९६ च्या कोलकाता अधिवेशनात सर्वप्रथम म्हटले गेले.

**राष्ट्रीय कॅलेंडर**

भारताचे राष्ट्रीय कॅलेंडर शके कालगणनेनुसार असून चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून नवीन वर्ष सुरू होते. भारतीय कॅलेंडरनुसार हे वर्ष ३६५ दिवसांचे असते. हे कॅलेंडर राष्ट्रीय कॅलेंडर म्हणून २२ मार्च, १९५७ पासून स्वीकृत करण्यात आले. या कॅलेंडरची ग्रेगोरियन (इंग्लिश) कॅलेंडरशी सांगड घालण्यात आली असून सर्वसाधारणपणे चैत्र शुद्ध प्रतिपदा दर वर्षी २२ मार्च, तर लीप वर्षात २१ मार्च रोजी येते.

**आर्टिकल (Article) साठी 'अनुच्छेद' हा सुयोग्य मराठी प्रतिशब्द होय; तथापि, प्रचलित व साधा-सोपा असल्याने आर्टिकलसाठी 'कलम' या प्रतिशब्दाचा वापर या विभागात केला आहे.**

## भारतीय घटनेचा सरनामा

आम्ही भारतीय जनता आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी आमच्या घटना समितीमध्ये–

– सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक भारत निर्माण करण्याचे प्रतिज्ञापूर्वक ठरवीत आहोत व सर्व भारतीय जनतेस–

– सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय,

– विचार, उच्चार, श्रद्धा, धर्म व उपासनापद्धती यांचे स्वातंत्र्य,

– दर्जा व संधी यांची समानता यांची खात्री देत आहोत आणि व्यक्तींची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांची शाश्वती देणारी बंधुता वृद्धिंगत करण्यासाठी ही राज्यघटना आमच्यासाठी स्वीकृत व संमत करीत आहोत.

**सरनाम्याचा अन्वयार्थ**

(१) भारतीय जनता सार्वभौम असून तिने स्वत: स्वत:साठी राज्यघटना तयार केली आहे.

(२) भारत हा स्वतंत्र व सार्वभौम देश आहे.

(३) भारत हे प्रजासत्ताक लोकतंत्र आहे.

(४) भारत हे निधर्मी किंवा धर्मनिरपेक्ष असे राष्ट्र आहे.

(५) समाजवाद हे भारताचे उद्दिष्ट आहे.

(६) भारतीय घटनेने सर्व भारतीयांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळण्याची ग्वाही दिली आहे.

(७) भारतीय जनतेस विचार, उच्चार, श्रद्धा, धर्म व उपासनापद्धती यांचे पूर्ण स्वातंत्र्य मिळेल, याची हमी देण्यात आली आहे.

(८) सर्व नागरिकांना समान दर्जा व समान संधी मिळेल, याची खात्री देण्यात आली आहे.

(९) राष्ट्रीय एकता व एकात्मता, त्याचप्रमाणे व्यक्तींची प्रतिष्ठा राखण्यासाठी राष्ट्रातील विविध क्षेत्रांत व विविध स्वरूपांत बंधुतेचा पुरस्कार करण्यात आला आहे.

## भारतीय घटनेची वैशिष्ट्ये

(१) भारतीय राज्यघटना ही सर्व राज्यघटनांमध्ये अतिशय लांबलचक व सविस्तर अशी राज्यघटना असून तीमध्ये सुरुवातीस ३९५ कलमे (आर्टिकल्स) व ८ परिशिष्टे (शेड्युल्स) होती. आज (सन २०१८ च्या पूर्वार्धात) भारतीय राज्यघटनेत ४६५(+) कलमे व १२ परिशिष्टे आहेत. वेळोवेळी त्यांमध्ये वाढ होत आहे. ही घटना २५ भागांत अथवा प्रकरणांत विभागलेली आहे.

(२) भारतीय घटना ही संघराज्यात्मक, परंतु मध्यवर्ती शासन प्रबळ असलेली अशी घटना असून केंद्र व राज्ये यांचे अधिकार घटनेनेच ठरवून दिलेले आहेत.

(३) भारतीय घटना ही संघराज्यात्मक असली तरी इतर संघराज्यांच्या राज्यघटनांचा विचार करता ती लवचिक आहे.

(४) संसदेचे सार्वभौमत्व व लिखित राज्यघटनेचे श्रेष्ठत्व यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

(५) न्याय्य अशा मूलभूत हक्कांची तरतूद करण्यात आलेली आहे.

(६) मूलभूत अशा स्वरूपाच्या मार्गदर्शक तत्त्वांची तरतूद करण्यात आलेली आहे.

(७) बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीनुसार भारताच्या घटनेत मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला आहे.

(८) न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार असलेल्या स्वतंत्र न्यायव्यवस्थेची तरतूद करण्यात आली असून, न्यायसंस्थेचे अधिकार व संसदेचे प्रभुत्व यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

(९) भारताची घटना संघराज्यात्मक असली तरी इतर संघराज्यांप्रमाणे दुहेरी नागरिकत्वाची म्हणजे संघराज्याचे नागरिकत्व व राज्याचे नागरिकत्व अशी तरतूद नसून फक्त एकेरी नागरिकत्वाची म्हणजे केंद्राच्या नागरिकत्वाची घटनेत तरतूद आहे.

(१०) भारतीय घटनेनुसार भारताला एखादा विशिष्ट असा राष्ट्रीय धर्म नसून 'निधर्मी राष्ट्र' ही संकल्पना मान्य करण्यात आली आहे. प्रत्येक नागरिकाला त्याच्या आवडीनिवडीच्या धार्मिक श्रद्धा जपण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

(११) 'प्रौढ मतदान' पद्धतीची तरतूद करण्यात आली असून, अठरा वर्षे वयावरील प्रत्येक प्रौढ स्त्री-पुरुषास मतदानाचा हक्क आहे. तथापि, मतदान केलेच पाहिजे असे बंधन घटनेने घातलेले नाही अथवा ते कर्तव्य म्हणून ठरवून दिलेले नाही.

(१२) भारताची शासनव्यवस्था संसदीय पद्धतीची असून राष्ट्रपती हा घटनात्मक प्रमुख आहे.

(१३) संसदेला घटनादुरुस्तीचे अधिकार आहेत. तथापि, संसद घटनेची मूलभूत चौकट बदलू शकत नाही. स्वामी केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य (१९७३) या न्यायालयीन प्रकरणामध्ये पुढील सहा तत्त्वे घटनेची मूलभूत तत्त्वे म्हणून सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केली आहेत–

(१) राज्यघटनेचे श्रेष्ठत्व.
(२) प्रजासत्ताक व लोकशाही शासनपद्धती व देशाचे सार्वभौमत्व.
(३) घटनेचे निधर्मी व संघराज्यात्मक स्वरूप.
(४) विधिमंडळे व न्यायालये यांच्या अधिकारांची विभागणी.
(५) व्यक्तींची प्रतिष्ठा.
(६) राष्ट्राची एकता व एकात्मता.

## महत्त्वाची प्रकरणे व परिशिष्टे

**काही महत्त्वाची प्रकरणे व विषय**

| प्रकरण | विषय | प्रकरण | विषय |
|---|---|---|---|
| दोन | नागरिकत्व | तीन | मूलभूत हक्क |
| चार | मार्गदर्शक तत्त्वे | चार-ए | मूलभूत कर्तव्ये |
| अकरा | केंद्र-राज्य संबंध | पंधरा | निवडणुका |
| अठरा | आणीबाणीविषयक तरतुदी | वीस | घटनादुरुस्ती |

**महत्त्वाची परिशिष्टे**

सध्या भारतीय घटनेत बारा परिशिष्टे आहेत. सुरुवातीस घटनेत आठ परिशिष्टे होती. पहिली घटनादुरुस्ती १९५१ अन्वये नववे, बावन्नावी घटनादुरुस्ती १९८५ अन्वये दहावे, त्र्याहत्तरावी घटनादुरुस्ती १९९३ अन्वये अकरावे, तर चौऱ्याहत्तरावी घटनादुरुस्ती १९९३ अन्वये बारावे परिशिष्ट घटनेत समाविष्ट करण्यात आले आहे. ही परिशिष्टे व संबंधित विषय पुढे नमूद केले आहेत.

**परिशिष्ट पहिले :** भारतातील राज्ये व संघराज्य प्रदेश यांत नमूद केले आहेत. सध्या भारतात २९ राज्ये व ७ संघराज्य प्रदेश आहेत.

**परिशिष्ट दुसरे** : यामध्ये राष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, राज्यपाल वगैरेंची वेतने निश्चित केली आहेत. सध्या ही वेतने पुढीलप्रमाणे आहेत–

| पदनाम | वेतन दरमहा (इतर भत्ते व सवलती सोडून) | | |
|---|---|---|---|
| | पूर्वीचे वेतन | सध्याचे वेतन | |
| राष्ट्रपती | रुपये १,५०,०००/- | रुपये ५,००,०००/- | (एप्रिल,२०१८ पासून) |
| उपराष्ट्रपती | रुपये १,२५,०००/- | रुपये ४,००,०००/- | (एप्रिल,२०१८ पासून) |
| राज्यपाल | रुपये १,१०,०००/- | रुपये ३,५०,०००/- | (एप्रिल,२०१८ पासून) |
| सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश | रुपये १,००,०००/- | रुपये २,८०,०००/- | १ जानेवारी, २०१६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने |
| सर्वोच्च न्यायालयाचे इतर न्यायाधीश | रुपये ९०,०००/- | रुपये २,५०,०००/- | |
| उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश | रुपये ९०,०००/- | रुपये २,५०,०००/- | |
| उच्च न्यायालयाचे इतर न्यायाधीश | रुपये ८०,०००/- | रुपये २,२५,०००/- | |
| नियंत्रक व महालेखापरीक्षक | रुपये ९०,०००/- | रुपये २,५०,०००/- | |

**परिशिष्ट तिसरे** : पदग्रहण करते वेळी घ्यावयाच्या शपथांचे किंवा प्रतिज्ञांचे मसुदे यात दिले आहेत.

**परिशिष्ट चौथे** : राज्ये व संघराज्य प्रदेशांना राज्यसभेत द्यावयाचे प्रतिनिधित्व (जागांचे वाटप) या संदर्भातील तरतुदी यात दिल्या आहेत.

**परिशिष्ट पाचवे** : यात (आसाम, मेघालय, त्रिपुरा व मिझोराम वगळता) राज्यांमधील अनुसूचित विभाग व जमाती यांचे प्रशासन व नियंत्रण यांविषयक तरतुदी आहेत.

**परिशिष्ट सहावे** : यामध्ये आसाम, मेघालय, त्रिपुरा व मिझोराम यांमधील आदिवासी विभागाच्या प्रशासनाच्या बाबी दिल्या आहेत.

**परिशिष्ट सातवे** : यामध्ये मध्यवर्ती सूची (केंद्र सूची), राज्य सूची व समवर्ती सूची यांमधील विषय दिले आहेत. सुरुवातीस केंद्र सूचीमध्ये सर्वाधिक म्हणजे ९७, राज्य सूचीमध्ये ६६ तर समवर्ती सूचीमध्ये ४७ विषय समाविष्ट होते. नंतर केंद्र सूचीतील एक विषय कमी करण्यात आला व चार विषय वाढविण्यात आले. राज्य सूचीतील पाच विषय समवर्ती सूचीत वर्ग करण्यात आले; त्यामुळे केंद्र सूचीतील विषयांची संख्या १०० झाली होती. राज्य सूचीतील विषयांची संख्या ६१ पर्यंत खाली आली होती; तर समवर्ती सूचीतील विषयांची संख्या ५२ इतकी वाढली होती. एकशेएकवी घटनादुरुस्ती अधिनियम, २०१६ अन्वये केंद्रसूचीतील विषय क्रमांक ९२ व ९२-सी आणि राज्यसूचीतील विषय क्रमांक ५२ व ५५ वगळल्यामुळे आता केंद्रसूचीतील विषयांची संख्या ९८ पर्यंत खाली आली असून राज्य सूचीतील विषयांची संख्या ५९ इतकी कमी झाली आहे. समवर्ती सूचीतील विषयांची संख्या ५२ इतकीच राहीली आहे.

**परिशिष्ट आठवे** : यामध्ये बावीस भारतीय भाषा नमूद केलेल्या आहेत– आसामी, बंगाली, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मिरी, मल्याळम, मराठी, ओडिया, पंजाबी, संस्कृत, तमिळ, तेलुगू, उर्दू, सिंधी, मणिपुरी, नेपाळी, कोंकणी, बोडो, संथाली, मैथिली व डोग्री. सुरुवातीस सिंधी, मणिपुरी, नेपाळी, कोंकणी, बोडो, संथाली, मैथिली व डोग्री या भाषांचा समावेश या परिशिष्टात नव्हता. सन १९६७ मध्ये एकविसाव्या घटनादुरुस्तीअन्वये सिंधी भाषेचा या परिशिष्टात समावेश केला गेला. सन १९९२ मध्ये एकाहत्तराव्या घटनादुरुस्तीनुसार कोंकणी, मणिपुरी व नेपाळी या भाषा या परिशिष्टात समाविष्ट करण्यात आल्या. ब्याण्णवावी घटनादुरुस्ती, २००३ (शंभरावे घटनादुरुस्ती विधेयक) अन्वये बोडो, संथाली, मैथिली व डोग्री या चार भाषांना अधिकृत भारतीय भाषांचा दर्जा देण्यात आला.

**परिशिष्ट नववे** : यामध्ये राज्य विधिमंडळांनी जमीनसुधारणाविषयक आणि जमीनदारी निर्मूलनविषयक पारित केलेले कायदे व नियम यांचा समावेश आहे. या परिशिष्टात आजमितीस समाविष्ट असलेल्या कायद्यांची संख्या २८४ इतकी आहे.

**परिशिष्ट दहावे** : यामध्ये पक्षांतर, राजकीय पक्षातील फूट वगैरेंसंदर्भातील तरतुदी समाविष्ट आहेत.

**परिशिष्ट अकरावे** : ज्या विषयांवर पंचायतींचे प्रशासकीय नियंत्रण आहे अथवा ज्या बाबी पंचायतींच्या अखत्यारीत येतात असे २९ विषय यामध्ये दिलेले आहेत. सन १९९३ मधील त्र्याहत्तराव्या घटनादुरुस्ती अन्वये हे परिशिष्ट भारतीय घटनेत समाविष्ट करण्यात आले.

**परिशिष्ट बारावे** : यामध्ये नगरपालिका/नगरपरिषदा यांच्या अखत्यारीतील १८ विषय नमूद केले आहेत. सन १९९३ मधील चौऱ्याहत्तराव्या घटनादुरुस्ती अन्वये हे परिशिष्ट भारतीय घटनेत समाविष्ट केले गेले.

## मूलभूत हक्क

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या प्रकरणातील १२ ते ३५ ही कलमे मूलभूत हक्कांशी संबंधित असून कलम १४ ते ३५ मध्ये भारतीय नागरिकांना प्रदान करण्यात आलेले मूलभूत हक्क नमूद करण्यात आले आहेत.

### समतेचा हक्क (कलम १४ ते १८)

(१) कायद्यापुढे सर्वांना समान वागविले जाईल व सर्वांना कायद्याचे सारखेच संरक्षण मिळेल. अधिकार, दर्जा अशा प्रकारचा भेदभाव कायद्यापुढे असणार नाही.(कलम १४)

(२) धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान इत्यादी कारणांमुळे नागरिकांमध्ये भेदभाव केला जाणार नाही अथवा या कारणांवरून कोणाही नागरिकाला दुकाने, सार्वजनिक उपाहारगृहे व सार्वजनिक करमणुकीच्या ठिकाणी प्रवेश करण्यास व सार्वजनिक विहिरी, तलाव, रस्ते आदी सार्वजनिक स्थानांचा उपयोग करण्यास बंधने घालता येणार नाहीत. (कलम १५)

(३) सार्वजनिक क्षेत्रात सर्वांना नोकरीची समान संधी मिळेल. (कलम १६)*

(४) अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे व कोणत्याही स्वरूपात अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरविण्यात आला आहे. (कलम १७)

(५) पदव्या देण्यास शासनास बंदी घालण्यात आली आहे (अपवाद– सैन्य-दलातील हुद्दे, शैक्षणिक पात्रता व भारतरत्न, पद्‌मविभूषण, पद्‌मभूषण यांसारखे गौरव पुरस्कार). (कलम १८)

### स्वातंत्र्यांचा हक्क (कलम १९)

या मूलभूत हक्कांतर्गत खालील सहा स्वातंत्र्ये (पूर्वी सात) बहाल करण्यात आली आहेत–

(१) भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, (२) शांततापूर्वक आणि नि:शस्त्र सभा भरविण्याचे स्वातंत्र्य, (३) संस्था किंवा संघटना किंवा सहकारी संस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य, (४) भारतात कोठेही फिरण्याचे स्वातंत्र्य– संचारस्वातंत्र्य, (५) कोणताही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य, (६) भारतात कोठेही राहण्याचे वा स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य, (७) संपत्ती मिळविण्याचे, बाळगण्याचे व तिची विल्हेवाट लावण्याचे स्वातंत्र्य. (हे स्वातंत्र्य चव्वेचाळिसाव्या घटनादुरुस्तीनुसार काढून घेण्यात आले आहे; त्यामुळे कलम १९ अंतर्गत देण्यात आलेल्या स्वातंत्र्यांची संख्या आता सहा झाली आहे.)

*७७ वी घटनादुरुस्ती, १९९५; ८१ वी घटनादुरुस्ती, २००० व ८५ वी घटनादुरुस्ती, २००१ अनुसार कलम १६ मध्ये अनुक्रमे ४ ए व ४ बी ही दोन नवी उपकलमे (Clauses) समाविष्ट करण्यात आली; तर ८५ व्या घटनादुरुस्ती अनुसार कलम १६ मधील उपकलम ४ ए मध्ये दुरुस्ती करण्यात आली.

**गुन्ह्याबद्दल दोषी ठरविण्यासंबंधातील संरक्षण (कलम २०)**

ज्या कायद्याचा भंग करणे गुन्हा ठरतो असा गुन्हा केल्याशिवाय कोणासही अटक करता येत नाही. संबंधित गुन्ह्याबाबत कायद्यात जी शिक्षेची तरतूद आहे त्यापेक्षा अधिक शिक्षा देता येत नाही. एकाच गुन्ह्याबद्दल एकापेक्षा अधिक वेळा खटला भरता येत नाही व शिक्षा देता येत नाही. ज्याच्यावर एखाद्या गुन्ह्याचा आरोप आहे, अशा आरोपीस त्याच्या स्वतःविरुद्ध साक्षीदार करता येत नाही.

**जीविताचे व व्यक्तिस्वातंत्र्याचे संरक्षण (कलम २१)**

कायद्याने विहित केलेल्या पद्धतीशिवाय– सक्षम न्यायालयात गुन्हा सिद्ध झाल्याशिवाय व इतर कायदेशीर तरतुदींची पूर्तता झाल्याशिवाय– कोणाही व्यक्तीस तिच्या जीवितापासून व व्यक्तिस्वातंत्र्यापासून वंचित ठेवता येणार नाही.

**अटकेपासून व तुरुंगात डांबून ठेवण्यापासून संरक्षण (कलम २२)**

कोणाही व्यक्तीस अटकेची कारणे सांगितल्याशिवाय कस्टडीत डांबून ठेवता येणार नाही; वकिलाचा सल्ला घेण्यास प्रतिबंध करता येणार नाही; अटक केल्यापासून चोवीस तासांच्या आत त्या व्यक्तीस जवळच्या दंडाधिकाऱ्यांपुढे हजर करावे लागेल आणि दंडाधिकाऱ्यांच्या आदेशाशिवाय तिला २४ तासांपेक्षा अधिक काळ डांबून ठेवता येणार नाही.

**शोषणाविरुद्धचा हक्क (कलम २३ व २४)**

वेठबिगारी आणि तत्सम शोषणाचे प्रकार यांना बंदी घालण्यात आली आहे व ते कायद्याने गुन्हे ठरविण्यात आले आहेत. तथापि, शासन सार्वजनिक उद्देशांसाठी सक्तीची सेवायोजना अमलात आणू शकते. अर्थात, अशा सक्तीच्या सेवेबाबतीत धर्म, वंश, जात इत्यादी कारणांवरून दुजाभाव करता येणार नाही.

**धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क (कलम २५ ते २८)**

प्रत्येक व्यक्तीस तिच्या श्रद्धेप्रमाणे धर्माचे पालन करण्याचा, धार्मिक कृत्ये करण्याचा तसेच धार्मिक कार्यक्रम, प्रवचने यांना उपस्थित राहण्याचा हक्क आहे. तसेच, कोणाही व्यक्तीस विशिष्ट धर्माच्या उन्नतीसाठी काही देणगी वा वर्गणी देण्याचे बंधन नाही.

**शैक्षणिक व सांस्कृतिक हक्क (कलम २९ व ३०)**

अल्पसंख्याकांना त्यांची स्वतंत्र भाषा, लिपी व संस्कृती सांभाळता येईल. शैक्षणिक संस्थांमध्ये धर्म, वंश वा जात, भाषा आदी कारणांमुळे प्रवेश नाकारला जाणार नाही. भाषिक वा धार्मिक अल्पसंख्याकांना शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचे व चालविण्याचे अधिकार राहतील.

**संपत्तीचा हक्क (कलम ३१, ३२ (बी) व परिशिष्ट ९)**

हा मूलभूत हक्क चव्वेचाळिसाव्या घटनादुरुस्तीनुसार रद्द करण्यात आला आहे.

**घटनात्मक उपाययोजना होण्याचा हक्क (कलम १३, ३२ ते ३५, २२६ व ३५९)**

हा हक्क म्हणजेच मूलभूत हक्कांच्या घटनात्मक तरतुदींचा भंग झाल्यास त्याबद्दल न्यायालयाकडे दाद मागण्याचा हक्क होय. मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयाने काढलेल्या आदेशास 'रिट्स' असे म्हणतात. या हक्काच्या अंतर्गत प्रत्येक व्यक्तीस तिच्या मूलभूत हक्कांवर गदा आली तर सर्वोच्च तसेच उच्च न्यायालयाकडे दाद मागता येते.

**हिंदुस्थानची नवी राज्यघटना तयार करण्यासाठी घटना समिती निर्माण करण्याची तरतूद 'त्रिमंत्री योजने'त होती. या राज्यघटनेत मूलभूत हक्कांचा समावेश असावा व मूलभूत हक्कांवर आक्रमण होणार नाही याची हमी घटनेने घ्यावी, अशीही सूचना 'त्रिमंत्री योजने'ने केली होती.**

अशा प्रकरणी न्यायालय हॅबिअस कॉर्पस् (बंदी प्रत्यक्षीकरण), मँडामस (परमादेश), रिट ऑफ प्रोहिबिशन (प्रतिषेध), को वॉरंटो (अधिकार पृच्छा), सर्शिओररी (उत्प्रेक्षण) यांसारखे आदेश देऊन मूलभूत हक्कांवर आक्रमण होण्यापासून संरक्षण करते.

## मूलभूत कर्तव्ये

बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीपूर्वी मूलभूत कर्तव्ये घटनेमध्ये दिलेली नव्हती. स्वर्णसिंग समितीच्या शिफारशींचा विचार करून बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीनुसार मूलभूत कर्तव्यांचा घटनेमध्ये समावेश करण्यात आला आहे.

ही मूलभूत कर्तव्ये नव्याने समाविष्ट केलेल्या भाग ४ ए कलम ५१ ए मध्ये नमूद केली आहेत. ती थोडक्यात पुढे दिली आहेत–

(१) घटनेतील आदर्शांचा, राष्ट्रीय ध्वजाचा व राष्ट्रगीताचा आदर करणे.

(२) स्वातंत्र्यलढ्यातून निर्माण झालेल्या उदात्त आदर्शांचा अभिमान बाळगणे व त्यांचे अनुपालन करणे.

(३) भारताचे सार्वभौमत्व व एकात्मता यांचे संरक्षण करणे.

(४) राष्ट्राचे संरक्षण करणे व राष्ट्राला गरज असेल तेव्हा राष्ट्रसेवेस धावून जाणे.

(५) सर्व भारतीयांमध्ये एकात्मता व भ्रातृभाव निर्माण करणे.

(६) वने, तळी, सरोवरे, नद्या, वन्य प्राणी यांसारख्या नैसर्गिक देणग्यांचे संरक्षण करणे.

(७) आपल्या एकात्मिक संस्कृतीचा वैभवशाली वारसा जतन करणे.

(८) वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे.

(९) सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे व हिंसाचाराचा त्याग करणे.

(१०) व्यक्तिगत व सार्वजनिक अशा प्रत्येक क्षेत्रात उत्कृष्टतेकडे वाटचाल करणे.

(११) ६ ते १४ वर्षे या वयोगटातील आपल्या अपत्यास किंवा पाल्यास शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे.

उपरोक्त अकरावे मूलभूत कर्तव्य शहाऐंशीवी घटनादुरुस्ती, २००२ अन्वये घटनेत समाविष्ट करण्यात आले आहे.

**मूलभूत कर्तव्ये– मूल्यमापन**

**तरतुदींमधील उणिवा** : घटनेत समाविष्ट करण्यात आलेली ही मूलभूत कर्तव्ये अतिशय त्रोटक व संदिग्ध स्वरूपाची आहेत. आपल्या एकात्मिक संस्कृतीचा वैभवशाली वारसा जतन करणे हे एक मूलभूत कर्तव्य सांगितले आहे; परंतु आपल्या एकात्मिक संस्कृतीचा वैभवशाली वारसा जतन करणे म्हणजे नेमके काय करावयाचे, ते स्पष्ट नाही.

या मूलभूत कर्तव्यांचे पालन न केल्यास शिक्षेची तरतूद नाही; त्यामुळे ही कर्तव्ये निरर्थक ठरतात.

प्रत्येक नागरिकाने लष्करी शिक्षण घ्यावे; प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क बजावावा यांसारखी महत्त्वाची व निश्चित अशी कर्तव्ये दिली नसल्याने कर्तव्यांची ही यादी अपुरी वाटते.

नागरिकांच्या कर्तव्यांची दुसरी आणि महत्त्वाची बाजू म्हणजे राज्यांची कर्तव्ये, ती घटनेमध्ये दिलेली नाहीत.

**महत्त्व** : जरी वरील त्रुटी असल्या तरी या कर्तव्यांमधून राष्ट्राचा विकास साधून भारतास एक समर्थ व सार्वभौम राष्ट्र बनविण्याची जबाबदारी नागरिकांवरच असल्याचे स्पष्ट होते. त्या दृष्टीने आपण राष्ट्रहितास प्राधान्य देऊन भाषावाद, प्रांतवाद व जातीयवाद यांचा नाश केला पाहिजे. आपल्या या जबाबदारीची जाणीव आपणास झाली व जाणीवपूर्वक आपण आपल्या कर्तव्यांचे पालन केले तर भारत खऱ्या अर्थाने एक सार्वभौम व विकसित देश होणे अशक्य नाही.

नीलम संजीव रेड्डी यांनी राष्ट्रपतिपद भूषविण्यापूर्वी लोकसभेचे सभापतीपद भूषविले होते; तर ग्यानी झैल सिंग यांनी राष्ट्रपतिपद भूषविण्यापूर्वी केंद्रीय गृहमंत्रिपद भूषविले होते.

## मार्गदर्शक तत्त्वे

घटनेच्या चौथ्या भागात कलम ३७ ते ५१ व ३५५ मध्ये प्रत्यक्ष मार्गदर्शक तत्त्वे दिलेली असून कलम ३६ हेही मार्गदर्शक तत्त्वांशी संबंधित आहे. ही मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे घटनाकारांच्या मध्यवर्ती व राज्य शासनाकडून असलेल्या उदात्त अपेक्षा होत. ही मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे घटनाकारांना अपेक्षित असलेली आदर्श, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्था साध्य करण्यासाठी ज्या दिशेने शासनाने वाटचाल करणे घटनाकारांस अपेक्षित होते, त्या वाटेवरील दीपस्तंभच होत.

मार्गदर्शक तत्त्वांची ही कल्पना भारतीय राज्यघटनेने आयरिश राज्यघटनेपासून घेतली आहे.

या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले नाही तर त्याविरुद्ध न्यायालयात दाद मागता येत नाही; कारण या तत्त्वांचे स्वरूप कायदेशीर नसून उदात्त व नैतिक असे आहे. या तत्त्वांचे पालन करणे ही शासनाची नैतिक बांधिलकी आहे. काही महत्त्वाची मार्गदर्शक तत्त्वे पुढीलप्रमाणे—

(१) जनतेचे कल्याण साधण्यासाठी सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय असलेली आदर्श अशी सामाजिक व्यवस्था निर्माण करणे (कलम ३८).

(२) समान कामाबद्दल समान वेतन मिळण्याची खात्री देणे (कलम ३९).

(३) समान न्याय प्रवर्धित करणे व गरिबांना मोफत विधीविषयक साहाय्य पुरविणे (कलम ३९ ए).

(४) ग्रामपंचायतींद्वारा स्वयंशासन निर्माण करणे (कलम ४०).

(५) सहकारी संस्थांची स्वयंस्फूर्तीने स्थापना, त्यांची स्वयंसंचालित कार्यप्रणाली, त्यांचे लोकशाही पद्धतीने नियंत्रण व व्यावसायिक व्यवस्थापन यांसाठी कसोशीने प्रयत्न करणे. (कलम ४३ बी) सत्त्याण्णवावी घटनादुरुस्ती २०११ अन्वये नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या कलम ४३ बी अन्वये हे मार्गदर्शक तत्त्व भारतीय राज्यघटनेत नव्याने समाविष्ट करण्यात आले आहे.

(६) कामाबाबत न्याय्य व मानवीय परिस्थिती निर्माण करणे (कलम ४२).

(७) ग्रामीण भागातील व्यक्तिगत पातळीवरील किंवा सहकारी तत्त्वावरील कुटीरोद्योगांना प्रोत्साहन देणे (कलम ४३).

(८) सर्व नागरिकांसाठी समान नागरी कायदा अमलात आणणे (कलम ४४).

(९) सहा वर्षांखालील मुलांचे संगोपन व शिक्षणाची तरतूद (कलम ४५).

(१०) मागासलेल्या जाति-जमातींच्या आर्थिक व शैक्षणिक हितांचे संवर्धन करणे (कलम ४६).

(११) देशाच्या पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा करणे आणि वने व वन्य जीवसृष्टी यांचे रक्षण करणे (कलम ४८ ए)

(१२) न्यायसंस्था व शासनसंस्था एकमेकांपासून स्वतंत्र ठेवणे (कलम ५०).

(१३) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता वृद्धींगत करणे (कलम ५१).

### भारतीय संघराज्य

भारतीय संघराज्याचा विचार करताना आपल्याला भारतीय संघराज्याच्या कार्यकारी मंडळ, विधिमंडळ किंवा संसद आणि न्यायसंस्था या तीन महत्त्वाच्या अंगांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

राष्ट्रपतींचा मृत्यू झाला आहे आणि उपराष्ट्रपतींचे पदही रिक्त आहे, अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश राष्ट्रपतिपद सांभाळू शकतात. न्या. एम. हिदायतुल्ला यांनी अशा परिस्थितीत २० जुलै, १९६९ ते २४ ऑगस्ट, १९६९ या कालावधीत राष्ट्रपतिपदाचा कार्यभार सांभाळला होता.

Inspector) असे म्हटले जाते. सर्कल हा काही थोड्या गावांचा गट असतो. त्या गावांच्या महसूल प्रशासनाचे अधिकार सर्कल निरीक्षकाला मिळालेले असतात.

**गाव** : भारतातील सर्व राज्यांत गाव किंवा खेडे हा प्रशासनाचा सर्वांत कनिष्ठ घटक असतो. तलाठी हा महसूल प्रशासन व्यवस्थेतील ग्रामस्तरावर कार्यरत असलेला महत्त्वाचा कर्मचारी होय. गावाचा दुसरा महत्त्वाचा पदाधिकारी पाटील हा होय. त्यास पोलीस पाटील असेही संबोधले जाते. सर्वसाधारणपणे १०० ते १५० गावांचा मिळून एक तालुका होतो. एका जिल्ह्यात साधारणत: दहा ते बारा तालुक्यांचा समावेश होतो; म्हणजे जिल्ह्यातील गावांची संख्या साधारणत: एक हजार ते दीड हजार इतकी असते.

## जिल्हाधिकारी

भारतातील इंग्रजी सत्तेच्या सुरुवातीच्या काळात वॉरन हेस्टिंग्ज याने १७७२ मध्ये जिल्हाधिकारी पदाची निर्मिती केली; त्या वेळेपासून ते आजतागायत जिल्हाधिकाऱ्याचे अधिकार व कार्ये यांत काळानुसार व परिस्थितीनुसार काही बदल घडून आले असले तरी या संपूर्ण कालावधीत तोच जिल्हा प्रशासनाचा केंद्रबिंदू राहिला आहे.

**भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी**

जिल्हाधिकारी हा भारतीय प्रशासकीय सेवेतील (Indian Administrative Service) अधिकारी असतो. भारतीय प्रशासकीय सेवेत दोन प्रकारच्या अधिकाऱ्यांचा किंवा सदस्यांचा समावेश होतो. पहिल्या प्रकारचे अधिकारी प्रत्यक्ष भरतीद्वारे सनदी सेवेत प्रवेश केलेले अधिकारी असतात; म्हणजे त्यांची निवड केंद्रीय लोकसेवा आयोगाने घेतलेल्या स्पर्धा परीक्षेद्वारा झालेली असते. हे अधिकारी तुलनेने तरुण किंवा कमी वयाचे असतात. दुसऱ्या प्रकारचे अधिकारी राज्य सनदी सेवेतून बढती मिळवून भारतीय प्रशासकीय सेवेत सामील झालेले अधिकारी असतात. हे अधिकारी साधारणत: मध्यम वयाचे असतात. जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती झालेल्या अधिकाऱ्यांत वरील दोन्ही प्रकारच्या अधिकाऱ्यांचा अंतर्भाव असतो.

## जिल्हाधिकाऱ्याची महत्त्वपूर्ण कार्ये

जिल्हाधिकाऱ्याला प्रत्येक प्रकारच्या भूमिकेत कोणकोणती कार्ये करावी लागतात, याची चर्चा खालील मुद्द्यांच्या आधारे आपणास करता येईल–

(१) प्रशासकीय अधिकारी या नात्याने करावी लागणारी कार्ये.

(२) 'कलेक्टर' या नात्याने करावी लागणारी कार्ये.

(३) जिल्हादंडाधिकारी या नात्याने करावी लागणारी कार्ये.

(४) निर्वाचन अधिकारी या नात्याने करावी लागणारी कार्ये.

(५) इतर कार्ये.

**प्रशासकीय अधिकारी या नात्याने कार्ये**

जिल्हाधिकारी हा जिल्ह्याचा मुख्य प्रशासकीय अधिकारी असतो. त्या नात्याने त्याला पुढील काही महत्त्वाची कार्ये करावी लागतात–

(१) जिल्ह्यात त्याच्या हाताखाली कार्य करणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्यांच्या रजा मंजूर करणे.

(२) जिल्हाधिकारी कार्यालयातील दुय्यम सेवक, खात्यातील सेवक, तहसील कर्मचारी आणि इतर शासकीय कार्यालयातील कर्मचारी यांना शिक्षा देण्याच्या संदर्भातील अधिकाऱ्याची नियुक्ती.

(३) वार्षिक अंदाजपत्रक तयार करणारा अधिकारी या नात्याने आवश्यक जबाबदाऱ्या पार पाडणे.

(४) महसूल इमारतींच्या बांधकामाचे अंदाज तयार करणे तसेच महसूल विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या सर्व शासकीय इमारतींची देखभाल करण्याची जबाबदारी पार पाडणे.

(५) कोषागाराचा प्रभारी, जिल्हा मुद्रांक अधिकारी आणि शासकीय कोषागाराच्या सुरक्षिततेची जबाबदारी पार पाडणे.

(६) अनेक स्थानिक संस्थांचा अध्यक्ष म्हणून काम करणे. काही जिल्हाधिकारी प्रादेशिक वाहतूक प्राधिकरण, रस्तेमार्ग सल्लागार समित्या यांसारख्या समित्यांचे सदस्य असतात.

(७) जिल्ह्यातील राजशिष्टाचार अधिकारी म्हणून कार्य करणे.

(८) जिल्ह्याच्या वार्षिक प्रशासन अहवालाचे संकलन करणे आणि अहवाल सादर करणे.

(९) मंत्र्याच्या व अति महत्त्वाच्या व्यक्तींच्या जिल्ह्यातील दौऱ्यांच्या कार्यक्रमांचे व्यवस्थापन करणे.

(१०) जिल्हा नियोजन कार्यवाही समितीचे अध्यक्षस्थान भूषविणे.

**'कलेक्टर' या नात्याने कार्ये**

(१) जमीन महसुलाचे संकलन.

(२) शासनाच्या इतर थकबाकींचे संकलन.

(३) कालवे थकबाकीचे संकलन.

(४) तगाई कर्जांचे वाटप.

(५) तगाई कर्जाच्या थकबाकीची वसुली.

(६) आपत्तीच्या काळात पिकांच्या नुकसानीचे मूल्यमापन आणि त्यासंबंधी द्यावयाच्या मदतीची शिफारस.

(७) आग, दुष्काळ, महापूर, अतिवृष्टी यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवलेल्या टंचाईच्या परिस्थितीत आपद्ग्रस्तांना मदत देण्यासंबंधी उपाययोजना.

(८) दुष्काळाच्या परिस्थितीत जमीन महासुलात व तगाई कर्जाच्या वसुलीत सवलत देण्यासंबंधी उपाययोजना.

**जिल्हा दंडाधिकारी या नात्याने कार्ये**

जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे हे जिल्हाधिकाऱ्याचे सर्वांत महत्त्वाचे कर्तव्य समजले जाते. त्याच्या दृष्टीने कायदा व सुव्यवस्था हा अग्रक्रमाचा विषय असतो. त्याला जिल्हा दंडाधिकारी या नात्याने करावी लागणारी कार्ये कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नाशी संबंधित आहेत; म्हणून त्या कार्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्याला जिल्हा दंडाधिकारी म्हणून पुढील कार्ये करावी लागतात–

(१) दुय्यम दंडाधिकारी वर्गावर नियंत्रण व देखरेख.

(२) उत्सवकाळात दंडाधिकारी नेमणुकीविषयी आदेश देणे.

(३) सार्वजनिक शांततेला धोका उत्पन्न होण्यासारखी स्थिती उद्भवल्यास तिच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य ते आदेश जारी करणे.

(४) सरकारकडून किंवा इतरांकडून आलेल्या सर्व याचिका व तक्रारी निकालात काढणे किंवा त्यांचे निराकरण करणे.

(५) जिल्ह्याच्या फौजदारी प्रशासनाचा प्रमुख या नात्याने पोलीसांच्या कृतींवर नियंत्रण ठेवणे आणि त्यांना मार्गदर्शन करणे.

(६) गुन्हेगारीविषयक वार्षिक अहवाल सरकारला सादर करणे.

**निर्वाचन अधिकारी या नात्याने कार्ये**

जिल्हाधिकाऱ्याला निवडणूकविषयक कार्येही करावी लागतात. तो लोकसभा व विधानसभा मतदारसंघांचा निर्वाचन अधिकारी म्हणून कार्य करतो.

## पंचायतराज्याशी संबंधित राज्यघटनेतील तरतुदी

| कलम | तरतूद |
|---|---|
| कलम २४३ | व्याख्या |
| कलम २४३-ए | ग्रामसभा |
| कलम २४३-बी | पंचायती गठित करणे |
| कलम २४३-सी | पंचायतींची रचना |
| कलम २४३-डी | जागांचे आरक्षण |
| कलम २४३-इ | पंचायतींचा कालावधी |
| कलम २४३-एफ | सदस्यत्वाबाबत अपात्रता |
| कलम २४३-जी | पंचायतींचे अधिकार, प्राधिकार आणि जबाबदाऱ्या |
| कलम २४३-एच | पंचायतींचा कर लादण्याचा अधिकार आणि पंचायतींचे निधी |
| कलम २४३-आय | आर्थिक स्थितीचे पुनर्विलोकन करण्यासाठी वित्त आयोग गठित करणे. |
| कलम २४३-जे | पंचायतींच्या लेख्यांची लेखापरीक्षा |
| कलम २४३-के | पंचायतींच्या निवडणुका |
| कलम २४३-एल | संघराज्यक्षेत्रांना लागू करणे |
| कलम २४३-एम | विवक्षित क्षेत्रांना हा भाग लागू नसणे |
| कलम २४३-एन | विद्यमान कायदे व पंचायती अस्तित्वात राहणे |
| कलम २४३-ओ | निवडणुकीसंबंधीच्या बाबींमध्ये न्यायालयांनी हस्तक्षेप करण्यास रोध |

**५ ऑगस्ट, २०१४ रोजी महाराष्ट्र मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार १५ ऑगस्ट, २०१४ पासून दोन हजारपर्यंत लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या सरपंचांना दरमहा एक हजार रुपये मानधन दिले जात आहे. यापूर्वी हे मानधन ४०० रुपये होते; तर, आठ हजारपर्यंतची लोकसंख्या असलेल्या गावातील सरपंचाचे मानधन ६०० रुपयांवरून १,५०० रुपये इतके करण्यात आले आहे; आठ हजारपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीच्या सरपंचांना ८०० रुपयांऐवजी दोन हजार रुपये मानधन देण्यात येत आहे. ग्रामपंचायत सदस्यांचा बैठक भत्ता वाढवून २०० रुपये प्रतिबैठक करण्यात आला आहे.**

# ४ हे लक्षात ठेवा!

## भारतीय राज्यघटना

१. स्वातंत्र्यपूर्व काळात .... यांच्या अध्यक्षतेखालील समितीने १० ऑगस्ट, १९२८ रोजी सादर केलेला अहवाल म्हणजे वस्तुत: देशाच्या राज्यघटनेच्या मसुद्याचा आराखडाच होता, असे म्हणता येईल. **पंडित मोतीलाल नेहरू**

२. भारतीय जनतेने भारताची राज्यघटना स्वीकृत व संमत केली .... **२६ नोव्हेंबर, १९४९**

३. भारताची घटना तयार करण्यासाठी लागलेला एकूण कालावधी .... **२ वर्षे ११ महिने १८ दिवस**

४. भारताच्या घटना समितीची निवड कोणी केली? **प्रांतिक कायदे मंडळांनी**

५. .... अन्वये भारताच्या घटना समितीची रचना केली गेली. **त्रिमंत्री योजना, १९४६**

६. .... घटनादुरुस्तीनंतर मालमत्तेचा हक्क हा आता फक्त कायदेशीर हक्क उरला आहे. **चव्वेचाळिसाव्या**

७. भारतातील घटनादुरुस्ती पद्धती .... घटनेवर आधारित आहे. **दक्षिण आफ्रिकेच्या**

८. भारताच्या राष्ट्रपतींचे आणीबाणीच्या काळातील अधिकार जर्मनीतील .... घटनेवर आधारित आहेत. **वायमर प्रजासत्ताक**

९. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाचा जाहीरनामा व फ्रान्सच्या जनतेने मिळविलेली स्वातंत्र्याची सनद यांवर आपल्या घटनेतील मूलभूत हक्कांची तरतूद आधारलेली आहे, तर मार्गदर्शक तत्त्वांची कल्पना आपण .... घटनेवरून घेतली आहे. **आयरिश**

१०. अमेरिका व कॅनडा यांच्या घटनांचा अभ्यास करून भारताचे संघराज्यात्मक स्वरूप ठेवण्यात आले आहे, तर भारताची संसदीय पद्धतीची शासनव्यवस्था .... च्या घटनेवर आधारलेली आहे. **इंग्लंड**

११. .... यांनी भारत हे एक 'आगळ्या प्रकार'चे 'Sui-Generis' संघराज्य असल्याचे म्हटले आहे. **प्रा. अलेक्झांड्रोविझ**

१२. मालमत्ता मिळविणे, बाळगणे व तिची विल्हेवाट लावणे हे स्वातंत्र्य आता चव्वेचाळिसाव्या घटनादुरुस्तीनुसार काढून घेतलेले असल्याने कलम १९ अन्वये बहाल करण्यात आलेल्या स्वातंत्र्यांची संख्या आता .... इतकी झाली आहे. **सहा**

१३. मूलभूत हक्क संरक्षणाची हमी देणारे व मूलभूत हक्कांवर गदा आली असता न्यायालयाद्वारे दाद मागण्याचा हक्क देणारे भारतीय घटनेतील .... कलम म्हणजे मूलभूत हक्कांचा आत्मा होय. हे कलम रद्द करणे म्हणजे मूलभूत हक्कच रद्द करणे होय. **बत्तिसावे**

६२. भारतीय घटनेचे खालीलपैकी कितवे कलम घटनादुरुस्तीशी संबंधित आहे?
(अ) ३१ (ब) ३६८ (क) ३७० (ड) ३५९

६३. राष्ट्रपतिसंदर्भात खालीलपैकी कोणते विधान चूक आहे?
(अ) राष्ट्रपतिपदाची मुदत पाच वर्षे असते.
(ब) राष्ट्रपतीस राजीनामा द्यावयाचा असल्यास त्यांनी तो उपराष्ट्रपतीकडे सादर करावा लागतो.
(क) राष्ट्रपतीला राष्ट्रपतिपदाची निवडणूक दुसऱ्यांदा लढविता येत नाही.
(ड) राष्ट्रपतिपदासाठी उमेदवार हा भारतीय नागरिक असावाच लागतो.

६४. खालीलपैकी कोणाची नेमणूक करण्याचे अधिकार राष्ट्रपतींस नाहीत?
(अ) ॲटर्नी जनरल (ब) कम्प्ट्रोलर अँड ऑडिटर जनरल
(क) राज्यपाल (ड) उपराष्ट्रपती

६५. आपल्या पदाची सूत्रे हाती घेण्यापूर्वी राष्ट्रपतींस शपथ ग्रहण करावी लागते. खालीलपैकी कोण राष्ट्रपतीस शपथ देववितात?
(अ) उपराष्ट्रपती (ब) सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश
(क) लोकसभेचे सभापती (ड) राज्यसभेचे अध्यक्ष

६६. एखाद्या गुन्हेगाराची शिक्षा कमी करणे, तहकूब करणे, रद्द करणे आदी अधिकार घटनेतील खालीलपैकी कोणत्या कलमान्वये राष्ट्रपतींना बहाल करण्यात आले आहेत?
(अ) १२१ (ब) ७२ (क) १२३ (ड) १४३

६७. खालीलपैकी कोणत्या कलमान्वये एखाद्या महत्त्वाच्या कायदेशीर बाबीवर राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला घेऊ शकतात?
(अ) १२० (ब) १२३ (क) १४० (ड) १४३

६८. केंद्र व राज्य लोकसेवा आयोगाची तरतूद .... या कलमान्वये करण्यात आली आहे.
(अ) ३१५(१) (ब) ३२०(१) (क) ३२३(२) (ड) ३७८(२)

६९. आर्टिकल .... हे राष्ट्रपतींच्या वटहुकूम काढण्याच्या अधिकाराशी संबंधित आहे.
(अ) १२३ (ब) ३६८ (क) ३५२ (ड) ३७०

७०. खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?
(अ) राष्ट्रपतींस त्यांचे लष्करी अधिकार मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार वापरावे लागतात.
(ब) राष्ट्रपती संसदेच्या संमतीशिवाय युद्ध पुकारू शकत नाहीत.
(क) भारताच्या राष्ट्रपतींना अमर्याद लष्करी अधिकार आहेत.
(ड) राष्ट्रपती सैन्याच्या तीनही दलांचे सर्वोच्च प्रमुख असतात.

७१. खालीलपैकी कोणती कलमे राष्ट्रपतींच्या आणीबाणीच्या अधिकाराशी संबंधित आहेत?
(अ) ३५२, ३५६, ३६० (ब) १६३, १६४, १६५
(क) ३६७, ३६८, ३६९ (ड) ३६९, ३७०, ३७१

**६२. (ब) ६३. (क) ६४. (ड) ६५. (ब) ६६. (ब) ६७. (ड) ६८. (अ) ६९. (अ) ७०. (क) ७१. (अ)**

७२. उपराष्ट्रपतिसंबंधात खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?
(अ) उपराष्ट्रपतिपदाची मुदत पाच वर्षे इतकी असते.
(ब) उपराष्ट्रपतिपदासाठी ३५ वर्षे वय पूर्ण असावे लागते.
(क) उपराष्ट्रपतिपदासाठी भारताचा नागरिक असणे आवश्यक आहे.
(ड) उपराष्ट्रपती हा ज्येष्ठ विधिज्ञ असावा लागतो.

७३. खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?
(अ) ज्यास मंत्रिमंडळाचा पाठिंबा असतो, अशा मंत्र्याची राष्ट्रपती पंतप्रधान म्हणून नेमणूक करतात.
(ब) ज्या नेत्यास लोकसभेतील बहुसंख्य सभासदांचा पाठिंबा असतो, अशा नेत्याची राष्ट्रपती पंतप्रधान म्हणून नेमणूक करतात.
(क) पंतप्रधान हा केंद्र शासनाचा कार्यकारी प्रमुख असतो.
(ड) मंत्रिमंडळाची नेमणूक पंतप्रधानाच्या सल्ल्याने होते.

७४. खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?
(अ) मंत्रिमंडळातील जो मंत्री संसदेचा सभासद नसतो, त्यास सहा महिन्यांच्या आत संसदेवर निवडून यावे लागते.
(ब) मंत्रिमंडळ लोकसभेस जबाबदार असते.
(क) राष्ट्रपतींना मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसारच काम करावे लागते.
(ड) मंत्रिमंडळाचा सल्ला राष्ट्रपतीने विचारात घेतलाच पाहिजे असे नाही.

७५. 'पंतप्रधानाचा राजीनामा म्हणजे संपूर्ण मंत्रिमंडळाचा राजीनामा होय' हे विधान ....
(अ) संपूर्णतः बरोबर आहे. (ब) संपूर्णतः चुकीचे आहे.
(क) अंशतः बरोबर आहे. (ड) असंदिग्ध स्वरूपाचे आहे.

७६. 'समानांतील पहिला' (Primus Inter Pares) किंवा 'ग्रहमालेतील सूर्य' (Inter Stellas Luna Minoris) या शब्दांत .... वर्णन केले जाते.
(अ) इंग्लंडच्या राजाचे (ब) राष्ट्रपतींचे
(क) पंतप्रधानांचे (ड) अमेरिकेच्या अध्यक्षांचे

७७. कितव्या घटनादुरुस्तीनुसार मंत्रिमंडळाचा सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक ठरविण्यात आला आहे?
(अ) ४२ व्या (ब) ४३ व्या (क) ४४ व्या (ड) ४५ व्या

७८. एकतिसावी घटनादुरुस्ती, १९७३ अनुसार लोकसभेत जास्तीत जास्त .... इतके सदस्य असतात.
(अ) २८८ (ब) ७८ (क) ५२५ (ड) ५४५

७९. कितव्या घटनादुरुस्तीनुसार लोकसभेचा कार्यकाल हा सहा वर्षांचा करण्यात आला होता?
(अ) ४२ व्या (ब) ४३ व्या (क) ४४ व्या (ड) ४५ व्या

८०. राज्यसभेसंबंधी कोणते विधान बरोबर आहे?
(अ) राज्यसभेचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो.
(ब) राज्यसभेचा कार्यकाल सहा वर्षांचा असतो.
(क) लोकसभा विसर्जित झाली की राज्यसभाही विसर्जित होते.
(ड) राज्यसभा हे स्थायी सभागृह आहे.

**७२. (ड) ७३. (अ) ७४. (ड) ७५. (अ) ७६. (क) ७७. (अ) ७८. (ड) ७९. (अ) ८०. (ड)**

उत्कृष्ट संसदपटू (१९९४), लोकमान्य टिळक पुरस्कार (१९९४) इत्यादी प्रमुख पुरस्कारांनी सन्मानित असणाऱ्या वाजपेयी यांची उत्कृष्ट वक्ता व कवी मनाचा नेता म्हणून ओळख आहे.

सन २०१५ मध्ये भारत सरकारने त्यांना भारतातील सर्वोच्च नागरी सन्मान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतरत्न या सन्मानाने सन्मानित केले.

मृत्यू– १६ ऑगस्ट, २०१८

## डॉ. मनमोहन सिंग

डॉ. मनमोहन सिंग हे भारताचे पहिले शीख पंतप्रधान होत, अशी त्यांची ओळख करून देणे हे त्यांनी जपलेली मूल्ये लक्षात घेता त्यांच्यावर काहीसे अन्याय करणारे ठरेल. 'भारताच्या पंतप्रधानपदी विराजमान झालेला पहिला अर्थतज्ज्ञ' या शब्दांत त्यांची ओळख करून देणे अधिक सयुक्तिक ठरेल– त्यांच्या व्यक्तिमत्त्वास न्याय देणारेही ठरेल!

डॉ. मनमोहन सिंग यांचा जन्म २६ सप्टेंबर, १९३२ रोजी पंजाबमधील गाह या खेड्यात झाला. त्यांचे शिक्षण पंजाब, केंब्रिज व ऑक्सफर्ड या विद्यापीठांमध्ये झाले. १९५६ मध्ये त्यांना केंब्रिज विद्यापीठाचे प्रतिष्ठेचे 'ॲडम स्मिथ पारितोषिक' प्रदान करण्यात आले.

इ. स. १९६३–६५ च्या दरम्यान पंजाब विद्यापीठात त्यांनी 'अर्थशास्त्रा'चे अध्यापन केले. १९६९–७१ या दरम्यान त्यांनी दिल्ली विद्यापीठात 'आंतरराष्ट्रीय व्यापार' हा विषय शिकविला. जवाहरलाल नेहरू विद्यापीठातही त्यांनी मानद प्राध्यापक म्हणून काम केले.

इ. स. १९७१ मध्ये डॉ. मनमोहन सिंग यांनी प्रशासकीय सेवेत प्रवेश केला. इ. स. १९७२–७६ या दरम्यान त्यांनी केंद्रीय अर्थमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार म्हणून काम पाहिले. १९७६–८२ या कालखंडात त्यांनी रिझर्व्ह बँकेचे संचालक, भारतीय औद्योगिक विकास बँकेचे संचालक, आशियाई विकास बँकेचे भारतीय गव्हर्नर, नियोजन आयोगाचे सदस्य–सचिव यांसारख्या पदांवर काम केले. १९८२–८५ या कालखंडात त्यांनी भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नरपद भूषविले. इ. स. १९८५–८७ या कालखंडात त्यांनी नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले. काही काळ ते विद्यापीठ अनुदान आयोगाचेही अध्यक्ष होते. पी. व्ही. नरसिंहराव यांच्या काळात त्यांनी देशाचे अर्थमंत्रीपद भूषविले. त्यांच्याच कारकिर्दीमध्ये इ. स. १९९१ मध्ये भारताने उदार आर्थिक धोरणाचा आणि पर्यायाने जागतिकीकरणाचा अवलंब केला.

**सोनिया गांधी**

**ॲन्टॉनिया (सोनिया) सिनॉर मायनो. इटलीमधील तुरीन शहराजवळच्या आर्बीसानो या गावात १९४६ मध्ये जन्म. इ. स. १९६८ मध्ये राजीव गांधी यांच्याशी विवाह. राजीव गांधी यांच्या हत्येनंतर (१९९१) काँग्रेसच्या राजकारणात सहभाग. सन १९९८ मध्ये खऱ्या अर्थाने राजकारणात काँग्रेसची धुरा सांभाळली. त्यांच्या विदेशी जन्माचा मुद्दा भारतीय राजकारणात गाजला. १२ सप्टेंबर, २००१ रोजीच सोनिया गांधी या भारतीय नागरिक असल्याचा निर्णय देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने दिला.**

**मे, २००४ मध्ये झालेल्या चौदाव्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला सर्वाधिक जागा मिळाल्या. सर्वांत मोठ्या पक्षाच्या नेत्या म्हणून राष्ट्रपतींनी त्यांना सरकार स्थापनेस पाचारण केले. परंतु सोनिया गांधीयांच्या विदेशी जन्माचा मुद्दा विरोधकांकडून सातत्याने उपस्थित केला जात असल्याने त्यांनी आपल्या सदसद्‌विवेकबुद्धीने निर्णय घेऊन प्रधानमंत्री होण्याचे नाकारले. घटक पक्षांच्या मदतीने संयुक्त पुरोगामी आघाडी (संपुआ) स्थापन करून डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले गेले. मे, २००४ ते मे, २०१४ पर्यंत त्या संपुआच्या अध्यक्षा होत्या. काँग्रेसच्या इतिहासात सर्वाधिक काळ म्हणजेच १९ वर्षे (१९९८ ते १६ डिसेंबर, २०१७ पर्यंत) अध्यक्षपद भूषविण्याचा विक्रमही त्यांच्याच नावे जमा आहे.**

इ. स. १९८७ मध्ये भारत सरकारने त्यांना 'पद्मविभूषण' सन्मान प्रदान करून त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. जगातील सर्वोत्तम अर्थमंत्र्यास मिळणाऱ्या 'युरोमनी पुरस्कारा'ने त्यांना १९९३ मध्ये गौरविण्यात आले. १९९३ व १९९४ या दोन्ही वर्षी सर्वोत्तम आशियाई अर्थमंत्री म्हणून 'आशियामनी पुरस्कारा'नेही त्यांना सन्मानित केले गेले. एकूण बारा विद्यापीठांनी त्यांना सन्माननीय डॉक्टरेट्स प्रदान केल्या आहेत.

डिसेंबर, २००५ मध्ये 'मॉस्कोस्टेट युनिव्हर्सिटी'ने त्यांना 'प्रोफेसर ऑनरिस कॉसा' ही सन्माननीय पदवी बहाल केली आहे.

मार्च, १९९८ ते मे, २००४ या कालावधीत राज्यसभेतील विरोधी पक्षनेत्याची भूमिकाही त्यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे. २२ मे, २००४ ते २६ मे, २०१४ या दहा वर्षांच्या कालावधीत त्यांनी दोन वेळा पंतप्रधान म्हणून देशाचे नेतृत्व केले. पंतप्रधानपदाच्या पहिल्या कारकिर्दीत त्यांनी आपल्या मुत्सद्देगिरीची परिसीमा गाठीत अमेरिकेबरोबर अणुऊर्जा करार केला.

'इंडियाज् एक्स्पोर्ट ट्रेण्डस् ॲण्ड प्रॉस्पेक्टस् फॉर सेल्फ सस्टेन्ड ग्रोथ' (१९६४) या ग्रंथाचे ते कर्ते होत.

दोन वेळा भारताचे हंगामी पंतप्रधानपद भूषविणारे गुलझारीलाल नंदा वगळता डॉ. मनमोहन सिंग हे भारताचे एकूणातील पंधरावे पंतप्रधान असून पंतप्रधानपदी विराजमान होणारे तेरावी व्यक्ती आहेत.

## नरेंद्र मोदी

नरेंद्र मोदी यांचा जन्म १७ सप्टेंबर, १९५० रोजी गुजरात राज्यातील मेहसाणा जिल्ह्यात वडनगर येथे झाला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जन्मलेले ते देशाचे पहिलेच प्रधानमंत्री आहेत. २६ मे, २०१४ रोजी देशाचे सोळावे प्रधानमंत्री म्हणून त्यांनी शपथ घेतली. या अगोदर ते सन २००१ पासून गुजरातचे मुख्यमंत्री होते. डिसेंबर, २०१२ मध्ये त्यांची चौथ्यांदा गुजरातच्या मुख्यमंत्रीपदी निवड झाली होती. मुख्यमंत्री असताना प्रधानमंत्रीपदी विराजमान होणारे ते एच. डी. देवेगौडा यांच्यानंतर दुसरेच प्रधानमंत्री आहेत. पूर्वी मुख्यमंत्रीपद भूषवून नंतर देशाच्या प्रधानमंत्रीपदी रुजू होणारे ते मोरारजी देसाई, चरणसिंग, व्ही. पी. सिंग, पी. व्ही. नरसिंह राव आणि एच. डी. देवेगौडा यांच्यानंतर सहावे प्रधानमंत्री होत.

## गव्हर्नर जनरल व राष्ट्रपती

**लॉर्ड माऊंटबॅटन**

परतंत्र भारताचे शेवटचे ब्रिटिश व्हाइसरॉय लॉर्ड माऊंटबॅटन हे स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल ठरले. १५ ऑगस्ट, १९४७ ते २१ जून, १९४८ या कालखंडात त्यांनी हे पद भूषविले. यानंतर जवळजवळ तीस वर्षांनी २७ ऑगस्ट, १९७९ रोजी आयरिश दहशतवाद्यांकडून त्यांची हत्या झाली.

**चक्रवर्ती राजगोपालाचारी**

चक्रवर्ती राजगोपालाचारी (१८७९-१९७२) हे स्वतंत्र भारताचे दुसरे व शेवटचे गव्हर्नर जनरल होत. स्वतंत्र भारताचे पहिले भारतीय गव्हर्नर जनरल ठरण्याचा मानही त्यांनाच मिळाला. २१ जून, १९४८ ते २४ जानेवारी, १९५० या कालखंडात त्यांनी हे पद भूषविले.

**डॉ. राजेंद्रप्रसाद**

संपूर्ण नाव राजेंद्रप्रसाद महादेव सहाय. डॉ. राजेंद्रप्रसाद (१८८४-१९६३) हे स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती होत. त्यांनी २६ जानेवारी, १९५० ते १३ मे, १९६२ पर्यंत म्हणजे बारा वर्षांहून अधिक काळ हे पद भूषविले. सर्वाधिक काळ राष्ट्रपतिपदी राहण्याचा मान डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्याकडेच जातो.

**डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन (१८८८-१९७५) हे भारताचे दुसरे राष्ट्रपती होत. १३ मे, १९६२ ते १३ मे, १९६७ असा संपूर्ण पाच वर्षांचा कालखंड त्यांनी राष्ट्रपतिपद भूषविले. तत्पूर्वी त्यांनी उपराष्ट्रपतिपदही भूषविले.

# ३ महाराष्ट्रातील समाजसुधारक (महाराष्ट्राच्या इतिहासाच्या अनुषंगाने)

## महात्मा जोतीबा फुले (१८२७-१८९०)

**अल्प परिचय**

जन्म १८२७ मध्ये 'पुणे' येथे. जन्मतारखेबाबत निश्चित पुरावा नाही. तथापि, काही संशोधकांनी ११ एप्रिल ही त्यांची जन्मतारीख असल्याचे प्रतिपादन केले आहे. सामान्यत: तीच त्यांची जन्मतारीख मानली जाते. 'उक्ती व कृती' यांमध्ये एकवाक्यता असलेले थोर मानवतावादी समाजसेवक. समतेच्या तत्त्वांचा आयुष्यभर पुरस्कार करून समाजातील विषमतेवर कडाडून टीका केली. रूढी व परंपरा यांमधील दोष उघड करून समाजातील उच्च-वर्णीयांकडून इतरांची होत असलेली पिळवणूक व पौरोहित्य करणाऱ्या वर्गाची मक्तेदारी यांवर आघात केले.

**शैक्षणिक कार्य**

ऑगस्ट, १८४८ मध्ये पुण्यात 'मुलींची पहिली शाळा' सुरू केली. ही शाळा पुण्याच्या बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यात भरत असे. शाळेत अस्पृश्यांच्या मुली येत असल्याने त्या शाळेस शिक्षक मिळत नव्हता. अशा परिस्थितीत जोतीबांनी आपल्या धर्मपत्नीस घरी शिकवून तिला शिक्षिका बनविले. दरम्यान पहिली शाळा बंद पडल्याने ३ जुलै, १८५१ रोजी पुण्यातील चिपळूणकरांच्या वाड्यात त्यांनी मुलींची दुसरी शाळा सुरू केली. १७ सप्टेंबर, १८५१ रोजी रास्ता पेठेत तर, १५ मार्च, १८५२ रोजी वेताळपेठेत अशा आणखी दोन मुलींच्या शाळा त्यांनी सुरू केल्या. ३ जुलै, १८५२ रोजी जोतीबांनी वेताळपेठेत अस्पृश्यांच्या मुलांसाठी एक शाळा सुरू केली. त्याच वर्षी शुद्रातिशूद्रांच्या मुलांसाठी वेताळपेठेतच त्यांनी दुसरी शाळाही सुरू केली. सन १८५३ मध्ये त्यांनी 'महार, मांग इत्यादी लोकांस विद्या शिकविणारी मंडळी' म्हणून एक संस्था स्थापन केली.

**सामाजिक सुधारणा**

जोतीबांच्या काळात स्त्रियांची स्थिती शूद्रातिशूद्रांहूनही वाईट होती. समाजात 'बालविवाह' व 'जरठ-कुमारी विवाह' यांसारख्या अनिष्ट पद्धती रूढ होत्या. विधवा-विवाहाची कल्पना समाजास अमान्य होती. या

सत्य सोडूनिया धर्मवादी होती ।। संग्रामी करिती रक्तपात ।।
लढण्याचा कित्ता संतानांना घालिती ।। पिढी जादा देती ।। दु:ख जगा ।।

—महात्मा जोतीराव फुले

सर्व कारणांमुळे विधवा स्त्रियांची संख्याही मोठी होती. अशा स्त्रियांना समाजात व कुटुंबात स्थान नव्हते. या विधवांना केशवपन करावे लागे. कोवळ्या वयातील विधवा बालिकांचेही असे सक्तीने केशवपन होई. जोतीबांनी त्या प्रथेशी निकराचा लढा दिला. नापितांनाही अशा स्त्रियांचे केशवपन न करण्याचे त्यांनी आवाहन केले. त्याला प्रतिसादही मिळाला. वाट चुकलेल्या व अगतिक अशा विधवांसाठी त्यांनी आपल्या घरात प्रसूतिगृह चालविले. अशा विधवांवर कित्येकदा समाजाच्या भीतीने आपल्या अर्भकांची हत्या करावयाची पाळी यावयाची. असे घडू नये म्हणून जोतीबांनी सन १८६३ मध्ये 'बालहत्या प्रतिबंधक गृह' सुरू केले. विधवा पुनर्विवाहास उत्तेजन देऊन सन १८६४ मध्ये त्यांनी पुण्यामध्ये पहिला पुनर्विवाह घडवून आणला. अर्भकालये चालवून अनाथ बालकांचे त्यांनी पालनपोषण केले.

**सत्यशोधक समाज**

२४ सप्टेंबर, १८७३ रोजी त्यांनी पुण्यात 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. धार्मिक अवडंबर न माजविता अल्प खर्चात 'सत्यशोधक पद्धती'ने विवाह घडवून आणले. सत्यशोधक समाजाचे ते 'पहिले अध्यक्ष' व 'कोषाध्यक्ष' होते. त्यांनी निर्मिकाची संकल्पना मांडली व 'ईश्वर' किंवा 'निर्मिक' एकच असून तो निर्गुण व निराकार असल्याचे प्रतिपादिले. त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाने 'पुनर्जन्म', 'कर्मकांड' इत्यादी गोष्टी अज्ञानातून निर्माण झाल्या असल्याचे सांगितले व 'गुणश्रेष्ठत्वा'ची कल्पना मांडली. सर्व माणसे एकाच परमेश्वराची लेकरे असून परमेश्वरप्राप्तीसाठी मध्यस्थाची गरज नाही, यांसारखी मते मांडून शूद्र व अतिशूद्र यांची पुरोहितवर्गाकडून होत असलेली पिळवणूक थांबविण्यासाठी निकराचे प्रयत्न केले व मानवधर्माचा पुरस्कार केला. 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकात जोतीबा म्हणतात–

''निर्मिके निर्मिला मानव पवित्र, कमी जास्त सूत्र बुद्धीमधे ।
पिढीजाद बुद्धी नाही सर्वांमधी, शोध करा आधी पुर्तेपणी ।।
धर्म राज्य भेद मानवा नसावे, सत्याने वागावे ईशासाठी ।
ख्रिस्त, महंमद, मांग, ब्राह्मणाशी, धरावे पोटाशी बंधुपरी ।।
निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक, भांडणे अनेक कशासाठी ।''

या ओळी जोतीबांचा व सत्यशोधक समाजाचा मानवतावादी दृष्टिकोन स्पष्ट करण्यास पुरेशा आहेत.

**शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी लढा**

शेतकऱ्यांचे 'दारिद्र्य' व 'अज्ञान' नष्ट करण्याची त्यांना अतिशय तळमळ होती. 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथात त्यांनी खालील शब्दांत शिक्षणाचे किंवा विद्येचे महत्त्व स्पष्ट केले आहे–

''विद्येविना मती गेली । मतिविना नीती गेली ।
नीतीविना गती गेली । गतिविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।''

जोतीबांनी स्वत: आधुनिक पद्धतीने शेती करून शेतकऱ्यांपुढे आधुनिक शेतीचा आदर्श ठेवला. शेतीमालाच्या विक्रीसाठी पेढी स्थापन केली. जुलमी सावकारशाहीविरुद्ध लढे दिले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी खंबीरपणे लढणारे 'जोतीबा' हे महाराष्ट्रातील पहिलेच समाजसुधारक होत.

**वेळप्रसंगी सरकारलाही विरोध**

इंग्रजांचे राज्य हितकारक आहे, असे जरी त्यांना वाटत असले तरी वेळप्रसंगी त्यांनी इंग्रजांचे दोष उघड केले. त्यांची हंटर आयोगापुढील साक्ष त्या दृष्टीने उल्लेखनीय आहे. महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळाच्या काळात जनतेस पुरेशी मदत न केल्याबद्दल त्यांनी सरकारला धारेवर धरले होते.

**महात्मा जोतीराव फुले यांनी 'शेतकऱ्याचा असूड' हे पुस्तक शूद्र शेतकऱ्यांच्या बचावासाठी (हितार्थ) लिहिले असल्याचे म्हटले आहे.**

**हे लक्षात ठेवा!**

(१) २ जून, १९३५ रोजी मुंबईतील शासकीय विधी महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून शासनाने आंबेडकरांची नियुक्ती केली होती. मे, १९३८ मध्ये आंबेडकरांनी या पदाचा राजीनामा दिला. त्यांची ही कारकीर्द विधी महाविद्यालयाच्या इतिहासात गौरवशाली ठरली.

(२) १३ ऑक्टोबर, १९३५ रोजी येवले येथे सुरू झालेल्या परिषदेत ''मी हिंदू धर्मात जन्मास आलो, कारण ते माझ्या हाती नव्हते; परंतु मी हिंदू म्हणून मरणार नाही,'' अशी प्रतिज्ञा केली. थोडक्यात, येवले येथील परिषदेत त्यांनी आपला धर्मांतराचा निर्णय जाहीर केला.

(३) २ जुलै, १९४२ रोजी व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीचे सदस्य नेमल्याचे जाहीर केले.

(४) 'हू वेअर दी शूद्राज?' हा आपला ग्रंथ डॉ. आंबेडकरांनी 'महात्मा जोतीबा फुले या आधुनिक भारतातील सर्वश्रेष्ठ शुद्रास' अर्पण केला आहे.

(५) १५ एप्रिल, १९४८ रोजी बाबासाहेबांनी डॉ. शारदा कबीर यांच्याशी नोंदणी पद्धतीने द्वितीय विवाह केला. डॉ. शारदा कबीर या विवाहानंतर डॉ. सविता आंबेडकर झाल्या.

(६) हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठाने डॉ. आंबेडकरांना 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' ही मानद पदवी प्रदान केली.

(७) ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे हिंदू समाजातील दमनशील प्रवृत्तीच्या विरोधातील क्रांतीचे प्रतीक होते,'' असे पंडित जवाहरलाल नेहरूंनी म्हटले आहे.

**समाजसुधारक व त्यांनी चालविलेली पत्रे**

| समाजसुधारक | वृत्तपत्रे, मासिके वा मुखपत्रे |
|---|---|
| बाळशास्त्री जांभेकर | दर्पण साप्ताहिक, दिग्दर्शन मासिक |
| भाऊ महाजन | प्रभाकर हे मासिक व धूमकेतू हे साप्ताहिक |
| गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी) | लोकहितवादी मासिक (१८८२), लोकहितवादी त्रैमासिक (१८८३) |
| गोपाळ गणेश आगरकर | सुधारक (काही काळ केसरीचे संपादक) |
| भाई माधवराव बागल | अखंड भारत |
| आचार्य विनोबा भावे | महाराष्ट्र धर्म |
| लोकमान्य टिळक | केसरी व मराठा ही वृत्तपत्रे |
| विष्णुशास्त्री चिपळूणकर | निबंधमाला |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर | मूकनायक (पाक्षिक), बहिष्कृत भारत (पाक्षिक), जनता (वृत्तपत्र)– याचेच नामाभिधान पुढे 'प्रबुद्ध भारत' असे केले गेले. |
| डॉ. पंजाबराव देशमुख | महाराष्ट्र केसरी |
| महात्मा गांधी | दी इंडियन ओपिनियन, हरिजन, यंग इंडिया |
| न्यायमूर्ती रानडे | इंदुप्रकाश |
| र. धों. कर्वे | समाजस्वास्थ्य (मासिक) |

# ४ हे लक्षात ठेवा!

**आधुनिक भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा इतिहास**

१. .... हा पोर्तुगीज प्रवासी इ. स. १४९८ मध्ये भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर कालिकत (आता कोझिकोडे) येथे उतरला. **वास्को–द–गामा**

२. जलमार्गे भारतात आलेला पहिला ज्ञात प्रवासी .... **वास्को–द–गामा**

३. इंग्रजांनी आपली भारतातील पहिली वखार कोठे स्थापन केली होती? **सुरत**

४. इंग्रजांनी दक्षिण भारतातील आपली पहिली वखार इ. स. १६११ मध्ये .... येथे स्थापन केली. **मच्छलीपट्टणम**

५. इंग्रजांची मद्रासमधील वखार तेथे बांधलेल्या किल्ल्यामुळे .... नावाने प्रसिद्ध होती. **फोर्ट सेंट जॉर्ज**

६. इ. स. १६९९ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने बंगालमधील गोविंदपूर, सुतानुती व कलिकाता या तीन गावांची जमिनदारी मिळविली. याच गावांचे पुढे .... या शहरात रूपांतर झाले. **कोलकाता**

७. .... मध्ये डचांनी 'युनायटेड ईस्ट इंडिया कंपनी'ची स्थापना केली. **इ. स. १६०२**

८. इ. स. १७५७ मध्ये .... येथे झालेल्या लढाईतील विजयामुळे भारतातील ब्रिटिश साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. **'प्लासी'**

९. ''२३ जून, १७५७ रोजी भारतातील मध्य युगाचा अस्त होऊन अर्वाचीन युगाचा प्रारंभ झाला.'' हे उद्‌गार कोणाचे? **सर जदुनाथ सरकार**

१०. इ. स. १७६४ मध्ये झालेल्या .... च्या लढाईतील निर्णायक विजयाने इंग्रजांच्या भारतातील राजवटीचा पाया पक्का झाला असे म्हटले जाते. **बक्सार**

११. शहाआलमने ईस्ट इंडिया कंपनीस बंगाल, ओरिसा आणि बिहारची दिवाणी बहाल केली. कोणत्या वर्षी? **इ. स. १७६५**

१२. ''इतकी भ्रष्ट राजवट जगाच्या पाठीवर कोठेही झाली नसेल.'' रॉबर्ट क्लाईव्हच्या बंगालमधील दुहेरी राज्यव्यवस्थेच्या संदर्भात हे उद्‌गार काढले .... **सर जॉर्ज कॉर्नवॉल**

१३. ''पक्क्या मालाची मक्तेदारी इंग्लंडकडे आणि कच्च्या मालाचा सातत्याने पुरवठा करण्याची जबाबदारी भारतावर'' ही इंग्रज अर्थनीती खऱ्या अर्थाने याच्याच काळात सुरू झाली .... **रॉबर्ट क्लाईव्ह**

**या तारखा लक्षात ठेवा–** प्लासीची लढाई : २३ जून, १७५७, वांदिवॉशची लढाई : २२ जानेवारी, १७६० व बक्सारची लढाई : २२ ऑक्टोबर, १७६४.

# विभाग तिसरा

# भारतीय अर्थव्यवस्था

# १ लोकसंख्या, दारिद्र्य व बेरोजगारी

## भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप

भारतीय अर्थव्यवस्थेचे वर्णन 'मिश्र अर्थव्यवस्था' असे केले जाते. मिश्र अर्थव्यवस्था म्हणजे अशी अर्थव्यवस्था की, ज्या अर्थव्यवस्थेमध्ये खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही उद्योगांचे सहअस्तित्व राखले जाते; दोहोंच्या विकासास पुरेसा वाव दिला जातो व दोहोंचाही अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी उपयोग करून घेतला जातो. थोडक्यात, मिश्र अर्थव्यवस्था म्हणजे खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही प्रकारच्या उद्योगांना पुरेसा वाव देणारी अर्थव्यवस्था होय.

भारताची अर्थव्यवस्था आज अविकसित परंतु विकसनशील म्हणून गणली जाते. नैसर्गिक साधनसंपत्ती व मनुष्यबळ या दोहोंचा विचार करता आपला देश समृद्ध आहे असेच म्हणावे लागेल; कारण नैसर्गिक साधनसामग्री आपल्या देशात मुबलक प्रमाणावर उपलब्ध आहे आणि मनुष्यबळाचा तर काही तोटाच नाही! परंतु मुबलक असलेल्या या दोन्ही बाबींचा आपण पुरेसा किंवा पर्याप्त वापर करू शकलेलो नाही. ब्रिटिशांनी आपल्या अर्थव्यवस्थेस लावून दिलेले एक विशिष्ट वळण हेही याचे एक कारण होऊ शकते. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी युरोपची बाजारपेठ म्हणून भारताचा दीर्घकाळ वापर केला. युरोपातील व विशेषत: इंग्लंडमधील उद्योगधंद्यांना कच्चा माल पुरविणारा एक स्रोत म्हणूनच भारताकडे पाहिले गेले. कमी किमतीचा कच्चा माल युरोपला पाठविणे व अधिक किमतीचा पक्का माल आयात करणे यामुळे ब्रिटिशकाळात भारतीय अर्थव्यवस्था पूर्ण खिळखिळी होऊन गेली. येथील उद्योगधंदे साफ बुडाले. भारतातून परदेशांत होणाऱ्या संपत्तीच्या व भांडवलाच्या वहनामुळेच भारताची अर्थव्यवस्था बिकट झाली असल्याचे दादाभाई नौरोजींनी १८७६ मध्येच नमूद केले होते. भारतीय अर्थव्यवस्थेच्या अभ्यासासंदर्भात दादाभाईंनी मांडलेली 'Drain Theory' (वहन सिद्धान्त) व त्यांचा 'Poverty and Un-British Rule in India' हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये**

(१) **अत्यल्प दरडोई उत्पन्न** : जागतिक बँकेने जाहीर केलेल्या सन २०१७ मधील जागतिक विकास निर्देशकानुसार सन २०१५ मधील स्थितीनुसार ॲटलस पद्धतीने (Atlas Method) दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (GNI) १२,७३६ डॉलर्स अथवा अधिक असणाऱ्या राष्ट्रांचा समावेश उच्च उत्पन्नगटात; दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न १,०४६ डॉलर्स ते १२,७३६ डॉलर्स दरम्यान असणाऱ्या राष्ट्रांचा समावेश निम्न मध्यम उत्पन्नगटात तर दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न १,०४५ डॉलर्स अथवा त्यापेक्षा कमी असणाऱ्या राष्ट्रांचा समावेश कमी उत्पन्नगटात केला गेला आहे.

जागतिक बँकेने आता मध्यम उत्पन्नगटातील राष्ट्रांचेही दोन उपगट पाडले असून दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न १,०४६ ते ४,१२५ डॉलर्स असणाऱ्या राष्ट्रांचा समावेश कनिष्ठ-मध्यम उत्पन्नगटात तर दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न ४,१२६ ते १२,७३६ डॉलर्स इतके असणाऱ्या राष्ट्रांचा समावेश उच्च-मध्यम उत्पन्न गटात केला आहे.

**जागतिक विकास निर्देशक, २०१७**

जागतिक बँकेने सन २०१७ मध्ये जाहीर केलेल्या जागतिक विकास निर्देशकांनुसार ॲटलस पद्धतीनुसार काढलेल्या निष्कर्षांन्वये सन २०१५ मध्ये भारताचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्न २,०८,८५० कोटी डॉलर्स इतके तर दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न १,५९०/- डॉलर्स इतके होते. अर्थात, क्रयशक्तीचे प्रमाण (Purchasing Power Parity) विचारात घेता सन २०१५ मध्ये भारताचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्न ७,९०,९९० कोटी डॉलर्स इतके तर दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न ६,०३० डॉलर्स इतके असल्याचे काहीसे वेगळे चित्र समोर येते. जागतिक बँकेच्या या विकास निर्देशकांनुसार वरील दोन्ही पद्धतीनुसार काढलेले काही निवडक देशांचे सन २०१५ मधील दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न तुलनात्मक अभ्यासास्तव पुढील तक्त्यात दिले आहे.

| देश | ॲटलस पद्धती नुसार दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न डॉलर्समध्ये | क्रय शक्तीच्या निकषाधारे दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न डॉलर्समध्ये |
|---|---|---|
| नॉर्वे | ९३,५३० | ६५,२१० |
| स्वित्झर्लंड | ८४,५५० | ६३,९९० |
| स्वीडन | ५७,९०० | ४८,७०० |
| संयुक्त संस्थाने (अमेरिका) | ५५,९८० | ५७,५४० |
| जर्मनी | ४५,७९० | ४९,०९० |
| जपान | ३८,८४० | ४२,३१० |
| युनायटेड किंग्डम (ब्रिटन) | ४३,७०० | ४१,२३० |
| चीन | ७,९०० | १४,३२० |
| भारत | १,५९० | ६,०३० |

(२) **उत्पन्नाचे असमतोल वाटप** : भारतात काही मोजक्या व्यक्तींच्या हाती संपत्ती एकवटलेली आहे; त्यामुळे साहजिकच, राष्ट्रीय उत्पन्नाचा मोठा भाग या मोजक्या व्यक्तींच्याच वाट्यास येतो. संपत्तीच्या व उत्पन्नाच्या या असमतोल वाटपामुळे आज भारतातील २१ टक्क्यांहूनही अधिक लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत.

सातव्या पंचवार्षिक योजनेअन्वये सन १९८९-९० मध्ये भारतातील एकूण २८.५ टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला होता; तर घरगुती खर्चासंदर्भातील राष्ट्रीय नमुना पाहणीच्या (नॅशनल सँपल सर्व्हे) १९८७-८८ मधील निष्कर्षांनुसार भारतातील २९.२ टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली होते.

आठव्या योजनेने १९९३-९४ मध्ये देशातील अवघी १८.९ टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली होती, असा अंदाज वर्तविला होता; तर लकडावाला अभ्यासगटाच्या पद्धतीनुसार केलेल्या अन्वेषणानुसार १९९३-९४ मध्ये देशातील ३६ टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली असल्याचा निष्कर्ष काढला गेला होता. हा निष्कर्ष तत्कालीन नियोजन आयोगानेही स्वीकारला होता.

वेगवेगळे अभ्यासगट, समित्या, शासन व नियोजन आयोग यांनी दारिद्र्यरेषा ठरविताना अमलात आणलेले वेगवेगळे निकष व तत्त्वे आणि त्यांचे राजकीय वा क्वचितप्रसंगी सामाजिकदृष्ट्याही भिन्न असलेले हेतू व विचारसरणी यांमुळे दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या संख्येबाबत या सर्वांच्या अंदाजात कधीही एकवाक्यता आढळून येत नाही.

**ॲटलस पद्धतीअन्वये काढलेल्या दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाचा विचार करता नॉर्वेचा जगात पहिला क्रमांक लागतो; खरेदीशक्तीच्या निकषावर काढण्यात आलेल्या दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाचा विचार करता कतार (१,३८,४८० डॉलर्स) पहिल्या क्रमांकावर असल्याचे चित्र स्पष्ट होते.**

## महत्त्वाच्या समित्या व विषय

| क्र. | समितीचे/आयोगाचे नाव | विषय |
|---|---|---|
| १. | सुबिमल दत्त समिती, १९६७ | औद्योगिक परवाना धोरण चौकशी |
| २. | सेनगुप्ता समिती, १९८५ | सार्वजनिक उद्योगांबाबतच्या धोरणात सुधारणा |
| ३. | डॉ. सी. रंगराजन समिती, १९९२ | सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमधील गुंतवणूक कमी करण्याबाबत |
| ४. | ओंकार गोस्वामी समिती, १९९३ | आजारी उद्योगांचा प्रश्न |
| ५. | अबिद हुसेन समिती, १९९७ | लघु उद्योगांचा दर्जा |
| ६. | डॉ. राजा चेलय्या समिती, १९९१ | कर-सुधारणा |
| ७. | के. एल. रेखी समिती, (अहवाल-१९९३) | अप्रत्यक्ष करांसाठी समान संकेतांक |
| ८. | सरकारिया आयोग, १९८३ | केंद्र-राज्य संबंध |
| ९. | सुकुमॉय चक्रवर्ती समिती, १९८२ | भारतीय नाणेसंस्थेची कार्यपद्धती |
| १०. | नरसिंहम समिती, १९९१ | वित्तीय क्षेत्रातील सुधारणा |
| ११. | नरसिंहम समिती, १९९७ | बँकिंग क्षेत्रातील सुधारणा |
| १२. | आर. एन. मल्होत्रा समिती, १९९३ | विमा-क्षेत्रात सुधारणा |
| १३. | डॉ. एल. सी. गुप्ता समिती | रोखेबाजारातील रोख्यांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारात सुधारणा |
| १४. | आर. व्ही. गुप्ता समिती, १९९७ | कृषिपतपुरवठा |
| १५. | एक्स्पेंडिचर रिफॉर्म्स कमिशन, २००० (के. पी. गीताकृष्णन आयोग) | मध्यवर्ती शासनाच्या एकूणच खर्चाचा आढावा घेणे व अनावश्यक खर्च कमी करण्याचे सुचविणे |
| १६. | महाजन समिती, १९९७ | साखर उद्योग |
| १७. | हनुमंतराव समिती, १९९७ | खत उद्योग |
| १८. | यु. के. शर्मा समिती, १९९८ | प्रादेशिक ग्रामीण बँकांसंदर्भातील 'नाबार्ड'ची भूमिका |

**सनराईज इंडस्ट्री**

बाल्यावस्थेत असलेल्या पण वेगाने वाढत असलेल्या क्षेत्रासाठी किंवा उद्योग-व्यवसायासाठी वापरली जाणारी ही बोलीभाषेतील संज्ञा आहे. मराठीत याला उदयोन्मुख उद्योग अशी संज्ञा वापरता येईल. उच्च वृद्धिदर, अनेकविध उद्यम (स्टार्ट-अप्स) आणि जोखीम भांडवल निधीची विपुलता ही उदयोन्मुख उद्योगाची नमुनेदार वैशिष्ट्ये होत. उदयोन्मुख उद्योग क्षेत्राबाबत लोकांची जागृती जसजशी वाढते, तसतसा या उद्योगांभोवती मोठ्या प्रमाणावर गजबजाट निर्माण होतो आणि या उद्योगास भविष्यात असणाऱ्या दीर्घकालीन संधींनी गुंतवणूकदार आकर्षित होतात.

## नीती आयोगाने घेतली नियोजन आयोगाची जागा

१ जानेवारी, २०१५ रोजी मंत्रिमंडळाच्या प्रस्तावान्वये केंद्र शासनाने चौसष्ट वर्षे जुन्या असलेल्या नियोजन आयोगाच्या जागी नीती (National Institute for Transforming India : NITI) आयोगाची स्थापना केली. नीती आयोग हा शासनाचा विचार मंडळ (थिंक टँक) म्हणून कार्य करील व शासनाला निर्देशात्मक आणि धोरणात्मक गतिशीलता प्रदान करील, असे शासनाच्या प्रस्तावात म्हटले आहे. नीती आयोग केंद्र आणि राज्य स्तरांवर शासनाला प्रमुख धोरणात्मक बाबींवर प्रासंगिक, महत्त्वपूर्ण आणि तांत्रिक सल्ला देईल, असे अभिप्रेत आहे.

नीती आयोग पुढील उद्दिष्टांच्या परिपूर्तीसाठी कार्य करील–

(१) राष्ट्रीय उद्दिष्टे दृष्टीसमोर ठेवून राज्यांच्या सक्रीय भागीदारीसोबत राष्ट्रीय प्राधान्यक्रम क्षेत्रांचा आणि व्यूहरचनांचा एक भागीदारीत्मक दृष्टिकोन विकसित करणे. प्रधानमंत्र्यांना आणि मुख्यमंत्र्यांना 'राष्ट्रीय कार्यक्रमपत्रिकेचे' प्रारूप उपलब्ध करून देणे.

(२) सशक्त राज्येच सशक्त देशाची निर्मिती करू शकतात हे तथ्य स्वीकारून राज्यांना नियमित संरचनात्मक सहकार्य करून सहकारी संघराज्यास चालना देणे.

(३) जे क्षेत्र विशेषरूपाने आयोगाकडे सोपविले गेले आहे त्या क्षेत्राच्या आर्थिक कार्यतंत्रामध्ये आणि धोरणांमध्ये राष्ट्रीय सुरक्षेच्या हितांचा समावेश केला गेला आहे, हे सुनिश्चित करणे.

(४) ज्यांना आर्थिक प्रगतीचा पुरेशा प्रमाणात लाभ मिळू शकत नाही अशा समाजघटकांकडे विशेष लक्ष दिले जाईल, याची आयोग काळजी घेईल.

नीती आयोगाच्या स्थापनेसंबंधीच्या प्रस्तावासोबतच ५ जानेवारी, २०१५ रोजी केलेली पदाधिकाऱ्यांची घोषणाही केंद्रशासनाने ७ जानेवारी, २०१५ रोजी अधिसूचित केली.

**रचना**

अधिसूचनेनुसार भारताचे प्रधानमंत्री हे नीती आयोगाचे अध्यक्ष असून गव्हर्निंग कौन्सिलमध्ये राज्यांचे मुख्यमंत्री आणि केंद्रशासित प्रदेशांचे उपराज्यपाल यांचा समावेश करण्यात आला आहे.

याशिवाय आयोगांतर्गत एक पूर्णकालीक कार्यकारी मंडळ गठित करण्यात आले असून हे कार्यकारी मंडळ पुढीलप्रमाणे आहे–

**अध्यक्ष :** नरेंद्र मोदी

**उपाध्यक्ष :** डॉ. राजीव कुमार

**पूर्ण वेळ सदस्य :** विवेक देबरॉय, व्ही. के. सारस्वत, प्रा. रमेश चंद व डॉ. व्ही. के. पॉल

**मंत्रिमंडळातील चार सदस्य :** राजनाथ सिंग, अरुण जेटली, सुरेश प्रभू व राधामोहन सिंग

**विशेष निमंत्रित सदस्य :** नितीन गडकरी, स्मृती इराणी व थावरचंद गेहलोत

**मुख्य कार्यकारी अधिकारी :** अमिताभ कांत

जून, २०१६ मध्ये माजी वित्तीय सचिव रतन पी. पाटील यांची सामाजिक क्षेत्रासाठी प्रमुख तज्ज्ञ सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# ३ भारताचा परकीय व्यापार

## जागतिक व्यापारात भारत

**निर्यातीत प्रचंड वाढ–**

भारताचे आज जगातील बहुतेक सर्व राष्ट्रांशी व्यापारी संबंध प्रस्थापित झाले आहेत. आज आपण जवळजवळ १९० देशांना विविध प्रकारच्या साडेसात हजारांहून अधिक वस्तूंची निर्यात करतो, तर जवळपास १४० राष्ट्रांकडून सहा हजारांहून अधिक वस्तूंची आयात करतो. आपल्या निर्यातीमध्ये कृषी, औद्योगिक, हातमाग तसेच लघु व ग्रामोद्योग या क्षेत्रांतून तयार झालेल्या विविध वस्तूंचा समावेश आहे. आपल्या अर्थव्यवस्थेची गरज व विकासाच्या दृष्टीने वाटचाल यांमुळे आपली आयातही मोठ्या प्रमाणावर असून त्यामध्ये खनिज तेल व खनिज तेलजन्य पदार्थ, खते, घरगुती वापराच्या वस्तू, हिरे व इतर मौल्यवान खडे, भांडवली वस्तू, उपभोग्य वस्तू, औद्योगिक यंत्रसामग्री इत्यादींचा समावेश आहे. हिरे व इतर मौल्यवान खड्यांची आयात आपण, त्यावर कारागिरी करून ते पुन्हा निर्यात करण्याच्या उद्देशाने करत असतो. आयात वस्तूंच्या वाढत्या किमती, आपली आयातीची वाढती गरज, विकासाच्या दृष्टिकोनातून आवश्यक आयात, खनिज तेल व खनिज तेलजन्य पदार्थांच्या प्रचंड वाढलेल्या किमती यांमुळे आपल्या निर्यातीत प्रचंड वाढ होऊनही आपला व्यापारशेष दिवसेंदिवस अधिकाधिक प्रतिकूल होत आहे. खाली दिलेला तक्ता त्या दृष्टीने अभ्यासनीय ठरावा.

| वर्ष | निर्यात रुपये कोटींमध्ये | आयात रुपये कोटींमध्ये | व्यापारशेष रुपये कोटींमध्ये | |
|---|---|---|---|---|
| १९५०-५१ | ६०६ | ६०८ | (−) | २ |
| १९६०-६१ | ६४२ | १,१२२ | (−) | ४८० |
| १९७०-७१ | १,५३५ | १,६३४ | (−) | ९९ |
| १९७२-७३ | १,९७१ | १,८६७ | (+) | १०४ |
| १९७६-७७ | ५,१४२ | ५,०७४ | (+) | ६८ |
| १९८०-८१ | ६,७११ | १२,५४९ | (−) | ५,८३८ |
| १९९०-९१ | ३२,५५३ | ४३,१९३ | (−) | १०,६४० |

# ४ शासकीय अर्थव्यवस्था अर्थसंकल्प, लेखा, लेखा-परीक्षण

**'शासकीय अर्थव्यवस्था— अर्थसंकल्प, लेखा व लेखापरीक्षण इत्यादी' हा आपल्या घटकविषयातील अभ्यासक्रमाचा एक महत्त्वाचा भाग; त्यात थोडासा क्लिष्ट; त्यामुळे या प्रकरणाची रचना करताना हा भाग सोपा करून समजावून सांगणे हे महत्त्वाचे!**

**साहजिकच, या प्रकरणात विषय समजावून देण्यावर अधिक भर दिला आहे. त्याबरोबरच या प्रकरणाच्या अनुषंगाने कोणत्या घटकांना महत्त्व दिले पाहिजे व किती महत्त्व दिले पाहिजे याचा विचार करूनच या प्रकरणाची रचना केली आहे.**

**आयोगाची रचना पद्धती व संभाव्य प्रश्नपत्रिकेचे स्वरूप यांचा सूक्ष्म अभ्यास करून प्रारंभीची चर्चा केली आहे. चर्चेनंतर वस्तुनिष्ठ प्रश्न देतानाही हाच विचार केला आहे. चर्चेतून व प्रश्नांमधून आपणास आपल्या परीक्षेच्या दृष्टीने जास्तीत जास्त उपयुक्त माहिती मिळावी, हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवूनच प्रत्येक पान आकारास येईल, हे पाहिले आहे.**

## शासनाचे आर्थिक धोरण

शासनाच्या आर्थिक धोरणामध्ये उत्पन्नाच्या किंवा महसुलाच्या बाबी निश्चित करणे, उत्पन्नाचे किंवा महसुलाचे नवे मार्ग शोधणे, जुन्या व अव्यवहार्य अशा महसूल मार्गांचा त्याग करणे अथवा त्यांत सुधारणा घडवून आणणे, तद्वतच एकूणच सामाजिक हितसंबंधांचा व आर्थिक विकास आणि कल्याण यांचा एकत्रित व साकल्याने विचार करून खर्चाचा आराखडा तयार करणे यांचा समावेश होतो. गुंतवणुकीच्या खर्चाची योग्य ती तरतूद करणे, हाही शासनाच्या आर्थिक धोरणाचा एक भाग आहे. राष्ट्रास स्वयंपूर्णतेच्या दिशेने नेणे, एकूण निर्यातीस उत्तेजन देणे आणि आयातीवर निर्बंध घालून आयात कमी करणे व राष्ट्राचा व्यापारशेष आणि व्यवहारशेष अनुकूल राखणे या बाबीही योग्य आर्थिक धोरणाच्या माध्यमातून साध्य होऊ शकतात. प्रगतिशील करपद्धती, लघु व कुटीरोद्योगांना उत्तेजन, रोजगारनिर्मितीस चालना यांसारख्या मार्गांनी सामाजिक व आर्थिक असमानता कमी करणे व उत्पन्नाची आणि संपत्तीची न्याय्य विभागणी करणे, हेही प्रभावी व योग्य अशा आर्थिक धोरणांतून साकारले जाऊ शकते.

## शासकीय अंदाजपत्रक

**संकल्पनेचा जन्म**

''नवीन आर्थिक वर्ष सुरू होण्यापूर्वी चितारलेले राज्याच्या वा देशाच्या सार्वजनिक उत्पन्नाचे व खर्चाचे संकल्पित चित्र'' असे अंदाजपत्रकाचे अथवा अर्थसंकल्पाचे स्वरूप असते. 'Budget' हा शब्द फ्रेंच भाषेतील 'Bougetti' या शब्दापासून तयार झाला आहे. 'Budget' किंवा 'Bougetti' या शब्दांचा अर्थ 'चामड्याची छोटी थैली' असा होतो. इ. स. १७३३ मध्ये 'बजेट' या शब्दाचा प्रयोग 'जादूचा पेटारा' या अर्थाने करण्यात आला होता.

**अंदाजपत्रक : व्याख्या**

आज 'बजेट' हा शब्द 'आर्थिक वर्षातील शासनाच्या उत्पन्नाचा व खर्चाचा अंदाज' या अर्थाने प्रचलित आहे. या अर्थाने या शब्दाचा वापर प्रथम फ्रान्समध्ये १८०३ मध्ये करण्यात आला. ''सरकारचे अंदाजपत्रक एक असे प्रपत्र आहे की, ज्यामध्ये सार्वजनिक आयव्ययाची एक प्रारंभिक योजना असते'' या शब्दांत स्ट्रोनने अंदाजपत्रकाची व्याख्या केली आहे; तर ''अंदाजपत्रक म्हणजे सार्वजनिक उत्पन्नाचा आणि खर्चाचा पुढील वर्षाचा अंदाज होय'' असे जे. एल. हॅन्सन म्हणतो.

**अंदाजपत्रकाचे स्वरूप**

केंद्र शासनाच्या अंदाजपत्रकातून आपणास शासनाच्या कर-महसुलाचे अंदाज, करांशिवाय इतर उत्पन्नांचे अंदाज, तसेच खर्चाच्या बाबींचे अंदाज यांचे ज्ञान होते. केंद्र शासनाचे अंदाजपत्रक महसुली अंदाजपत्रक आणि भांडवली अंदाजपत्रक या दोन भागांत विभागलेले असते.

करांद्वारे गोळा होणारे उत्पन्न, शासकीय उद्योगांचा नफा यांसारख्या बाबींचा महसुली अंदाजपत्रकात समावेश असतो; तर सर्व प्रकारचे भांडवली उत्पन्न, भांडवली खर्च, देशांतर्गत परकीय कर्जे, कर्जांची परतफेड, कर्जांवरील व्याज, परकीय मदत यांसारख्या बाबींचा भांडवली अंदाजपत्रकात समावेश असतो.

**तीन प्रकारच्या आकडेवारीचे संच**

भारत सरकारच्या वार्षिक अर्थसंकल्पात व्यावहारिकदृष्ट्या आपणास तीन प्रकारच्या आकडेवारीचे संच आढळतात– गतवर्षाचे वास्तविक आकडे, चालू वर्षासाठीचे अंदाजित व सुधारित अंदाजाचे आकडे आणि पुढील वर्षाच्या अंदाजाचे आकडे. उदाहरणार्थ– २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात आपणास २०१५-१६ या वर्षाचे वास्तविक आकडे, २०१६-१७ चे अंदाजित व सुधारित अंदाजाचे आकडे आणि २०१७-१८ चे अर्थसंकल्पीय अंदाज पाहावयास मिळतात.

अर्थमंत्री अर्थसंकल्प तयार करतात व तेच तो संसदेपुढे सादर करतात. राज्य सरकारचे अर्थसंकल्प त्या त्या राज्याचे अर्थमंत्री तयार करतात आणि विधानसभेत सादर करतात. आर्थिक विधेयक अर्थसंकल्पातील उत्पन्नास मंजुरी घेण्यासाठी, तर विनिमय विधेयक खर्चास मंजुरी घेण्यासाठी सभागृहापुढे ठेवण्यात येते.

## शून्याधारित अंदाजपत्रक

**उद्देश**

प्रशासनात मागील वर्षाचे अंदाजपत्रक आधार धरून नव्या वर्षाचे अंदाजपत्रक तयार केले जाते; परंतु पुष्कळदा पूर्वीच्या वर्षी ज्या बाबींवर खर्च झालेला असतो त्या बाबी नवीन वर्षी अनावश्यक ठरलेल्या असतात किंवा त्या

**अमेरिका हा खनिज तेलाचा सर्वांत मोठा उपभोक्ता तर आहेच; पण सर्वांत मोठा उत्पादकही आहे!**

# ७ वस्तुनिष्ठ प्रश्न

## लोकसंख्या, दारिद्र्य व बेरोजगारी

१. ब्रिटिश राज्यकर्ते भारतातील साधनसंपत्तीची करीत असलेली लूट किंवा त्यांच्याकडून होत असलेले भारतीयांचे शोषण हेच भारतातील दारिद्र्याचे प्रमुख कारण आहे; हे स्पष्टपणे मांडणारे भारतीय विचारवंत म्हणजे ....

(अ) महात्मा फुले (ब) न्यायमूर्ती रानडे (क) दादाभाई नौरोजी (ड) फिरोजशहा मेहता

२. दादाभाई नौरोजींनी आपला सुप्रसिद्ध 'वहन सिद्धान्त' (Drain Theory) आपल्या .... ग्रंथात मांडला आहे.

(अ) पॉव्हर्टी इन इंडिया (ब) पॉव्हर्टी अँड अन्‌ब्रिटिश रूल इन इंडिया

(क) पॉव्हर्टी अँड ब्रिटिश रूल (ड) ब्रेन ड्रेन ड्युरिंग ब्रिटिश पिरिअड

३. भारतातील उत्पन्न व संपत्ती यांतील असमान वाटप भारतीय अर्थव्यवस्थेचे .... स्वरूप दर्शविते.

(अ) भांडवलशाही (ब) संमिश्र

(क) अविकसित (ड) लोकशाही समाजवादी

४. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात प्रस्थापित झालेल्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप सर्वसामान्यत: .... या शब्दांत सांगता येईल.

(अ) साम्यवादी अर्थव्यवस्था (ब) डावी अर्थव्यवस्था

(क) संमिश्र अर्थव्यवस्था (ड) भांडवलशाही अर्थव्यवस्था

५. मिश्र अर्थव्यवस्था म्हणजे ....

(अ) लोकशाही परंतु साम्राज्यवादी अर्थव्यवस्था.

(ब) शेती व उद्योग दोहोंना समान न्याय.

(क) सार्वजनिक व खाजगी क्षेत्रांतील उद्योगांना समान वाव.

(ड) संपत्तीतील असमान वाटप.

६. खालीलपैकी कोणत्या बाबीचे वर्णन भारतीय अर्थविकासास साहाय्यभूत ठरलेली बाब म्हणून करता येणार नाही?

(अ) वाढते औद्योगिक उत्पादन (ब) विपुल श्रमशक्ती

(क) अद्ययावत तंत्रज्ञान (ड) हरितक्रांती

१. (क) २. (ब) ३. (क) ४. (क) ५. (क) ६. (ब)

७. पूर्वीच्या नियोजन आयोगाच्या निष्कर्षांनुसार .... उष्मांकांपेक्षा कमी उष्मांक मिळणाऱ्या ग्रामीण भागातील व्यक्ती या दारिद्र्यरेषेखाली येत होत्या.

(अ) २,१०० (ब) २,४०० (क) २,८०० (ड) ३,२००

८. पूर्वीच्या नियोजन आयोगाच्या निष्कर्षांनुसार .... उष्मांकांपेक्षा कमी उष्मांक मिळणाऱ्या शहरी भागातील व्यक्ती या दारिद्र्यरेषेखाली येत होत्या.

(अ) २,१०० (ब) ३,२०० (क) २,४०० (ड) २,८००

९. भारताची अर्थव्यवस्था अविकसित असण्याची जी आर्थिक कारणे दिली जातात, त्यांमध्ये खालीलपैकी कोणत्या कारणाचा समावेश करता येणार नाही?

(अ) भांडवलाची कमतरता (ब) तांत्रिक ज्ञानाचा अभाव
(क) कुशल श्रमिकांचा अभाव (ड) कुटुंबनियोजन कार्यक्रमाचे अपयश

१०. भारताची अर्थव्यवस्था अविकसित असण्याबाबत जी सामाजिक कारणे दिली जातात,त्यांमध्ये खालील-पैकी कोणत्या कारणाचा समावेश करता येणार नाही?

(अ) भारतातील जातिव्यवस्था (ब) श्रमाला दिला जाणारा कनिष्ठ दर्जा
(क) एकत्रित कुटुंबपद्धती (ड) दारिद्र्याचे दुष्टचक्र

११. भारतात .... क्षेत्रात छुप्या बेरोजगारीचे दर्शन घडते.

(अ) खाण उद्योग (ब) सेवा उद्योग (क) कृषी (ड) वस्तुनिर्मिती

१२. कृषि-आधारित अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्न मोजण्यासाठी खालीलपैकी कोणती पद्धती वापरणे अधिक सयुक्तिक ठरेल?

(अ) उत्पादन पद्धती (ब) खर्च पद्धती (क) गणना पद्धती (ड) अंदाज पद्धती

१३. अविकसित अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्रात मजुरांची सीमान्त उत्पादकता .... असते.

(अ) अतिरिक्त (ब) प्रमाणापेक्षा अधिक (क) शून्य (ड) अगण्य

१४. खालीलपैकी कोणती बाब भारतीय अर्थव्यवस्थेचे एक वैशिष्ट्य म्हणून निर्देशित करता येणार नाही?

(अ) उत्पन्नाचे असमान वाटप (ब) प्राथमिक क्षेत्रातील उत्पादन
(क) भांडवलनिर्मितीचा कमी वेग (ड) मुक्त अर्थव्यवस्था

१५. एखाद्या अभियांत्रिकी पदवीधरास एखाद्या आस्थापनेत लिपिकाची नोकरी करावी लागणे, हे खालीलपैकी कोणत्या प्रकारच्या बेरोजगारीचे उदाहरण म्हणून सांगता येईल?

(अ) हंगामी रोजगारी (ब) अर्ध रोजगारी
(क) प्रच्छन्न बेरोजगारी (ड) कमी प्रतीची रोजगारी

१६. .... या दशकाचा अपवाद वगळता १९०१ पासून भारतातील लोकसंख्या सातत्याने वाढत आहे.

(अ) १९११-२१ (ब) १९२१-३१
(क) १९५१-६१ (ड) १९६१-७१

**गोल्डन रूल (राजकोषीय धोरण) :** हा नियम सरकारला राजकोषीय धोरणाची संक्रिया करण्यास मार्गदर्शन करतो. या नियमानुसार सरकारने फक्त भांडवली गुंतवणुकीसाठी किंवा भांडवली खर्चासाठीच कर्जाचा विनियोग करावा. कर्जाचा विनियोग चालू खर्च भागविण्यासाठी किंवा महसुली खात्यावरील तुटीच्या भरण्यासाठी करू नये.

## विभाग चौथा

# भूगोल

## महाराष्ट्राच्या भूगोलाच्या विशेष अभ्यासासह

# १ पृथ्वी व अक्षांश-रेखांश

## खगोलशास्त्र

**आकाश**

मोकळ्या जागेवरून वर पाहिल्यास निळसर रंगाची पोकळी दिसते, या पोकळीस 'आकाश' म्हणतात.

**दीर्घिका**

अवकाशात ताऱ्यांच्या मिळून बनलेल्या विशाल व प्रचंड आकाराच्या तारकासमूहांना 'दीर्घिका' (गॅलॅक्सी) असे म्हणतात. दीर्घिकांना विश्वखंड किंवा द्वीपविश्वही म्हणतात. एका दीर्घिकेत १० ते २० हजार कोटी तारे व हायड्रोजनचे प्रचंड ढग असतात. अशा अनेक दीर्घिका अवकाशात आहेत. या दीर्घिकांनी 'विश्व' बनले आहे. दीर्घिकेत अनेक तारे तयार होत असतात.


**आकाशगंगा**

सूर्यमाला ज्या दीर्घिकेत आहे तिला आकाशगंगा म्हणतात. आपल्या आकाशगंगेचा आकार चाकासारखा आहे. आकाशगंगा समोरून पाहिल्यास वेटोळ्या घातलेल्या सापासारखी दिसते, बाजूने पाहिल्यास मध्ये फुगीर व बाजूने चपटी दिसते. आकाशगंगा दक्षिणोत्तर पसरलेली आहे.

**तारकासमूह**

ताऱ्यांच्या समूहाला 'तारकासमूह' म्हणतात. आकाशात अनेक तारकासमूह दिसतात.

उत्तरेकडील आकाशात सात तेजस्वी ताऱ्यांचा एक तारकासमूह दिसतो, त्यास 'सप्तर्षी' म्हणतात. रात्रीच्या वेळी दिशा शोधण्यासाठी सप्तर्षी तारकासमूहाची मदत होते.




**सप्तर्षी**

**ध्रुवतारा**

तारकासमूहाच्या मदतीने ध्रुवतारा शोधता येतो. ध्रुवतारा 'उत्तर दिशा' दर्शवितो. ध्रुवतारा पृथ्वीपासून ३०० प्रकाशवर्ष दूर आहे. म्हणजे ध्रुवताऱ्याचा प्रकाश पृथ्वीवर पोहोचण्यास ३०० वर्षे लागतात.

**तारे**

अवकाशातील स्वयंप्रकाशित व उष्ण तेजस्वी खगोलास 'तारा' म्हणतात. पृथ्वीवरून रात्री आपल्याला दिसणारा सर्वांत जास्त तेजस्वी तारा 'व्याध' हा आहे. 'सूर्य' हा पृथ्वीपासून सर्वांत जवळचा तारा आहे. ताऱ्यांना स्वतःचा प्रकाश व उष्णता असते.

**सौरडाग**

सूर्याच्या पृष्ठाचे काही भाग कमी तेजस्वी व काळसर दिसतात; त्यांना 'सौरडाग' (Sunspots) असे म्हणतात.

**धूमकेतू**

केव्हा केव्हा रात्री आकाशात पिसाऱ्यासारखा भाग असलेला प्रकाशित गोल दिसतो; त्यास धूमकेतू (Comet) म्हणतात. यात अमोनिया, मिथेन व सूक्ष्म धूलीकण, कार्बन-डाय-ऑक्साइड असते. सूर्याच्या उष्णतेमुळे धूमकेतूतील द्रव्याचे वायूत रूपांतर होते. धूमकेतूचा सूर्याकडील भाग तेजस्वी व गोलाकार असून विरुद्ध बाजूस शेपूट असते. धूमकेतू सूर्याभोवती 'अतिलंबवर्तुळाकार' मार्गाने फिरतात. सूर्यमालेत अनेक धूमकेतू आहेत असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. 'हॅलेचा धूमकेतू' दर ७६ वर्षांनी दिसतो. अलीकडे हा धूमकेतू ९ फेब्रुवारी, १९८६ रोजी दिसला होता. यानंतर तो सन २०६२ मध्ये दिसेल.

**उल्का**

धूळ आणि वायू यांचे बनलेले अवकाशात फिरणारे लहान गोलक म्हणजे 'उल्का' (Meteor) होय. पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणामुळे उल्का पृथ्वीकडे खेचल्या जातात. त्यास 'उल्कापात' म्हणतात. साधारणतः पृथ्वीच्या वातावरणातून येताना जळून चमकतात व त्याची राख होते. काही मोठ्या उल्काच पृथ्वीवर आदळतात. त्यामुळे भूभागावर प्रचंड विवरे पडतात. 'लोणार सरोवर' हे उल्कापातामुळेच निर्माण झाले आहे.

**प्रकाशवर्ष**

तारे व दीर्घिका यांचे अंतर मोजण्यासाठी 'प्रकाशवर्ष' या एककाचा वापर करतात.

प्रकाशकिरण एक वर्षात जेवढे अंतर जाऊ शकतात, तेवढ्या अंतरास 'एक प्रकाशवर्ष' असे म्हणतात. प्रकाशाचा वेग दर सेकंदास ३ लाख कि. मी. आहे.

## सूर्यकुल

सूर्य हा एक तारा आहे. सूर्य व सूर्याभोवती फिरणारे ग्रह, उपग्रह, लघुग्रह इत्यादींचे मिळून सूर्यकुल बनले आहे. सूर्याचे पृथ्वीपासूनचे अंतर १४ कोटी ९६ लाख कि. मी. इतके आहे.

सूर्याची निर्मिती ही ५०० कोटी वर्षांपूर्वी झाली असावी असे शास्त्रज्ञांचे मत आहे. सूर्याभोवतीच्या द्रव्यातून ग्रहमाला निर्माण झाली असावी. हायड्रोजन व हेलिअमपासून ग्रह बनले असावेत, असे शास्त्रज्ञांचे अनुमान आहे. सूर्याचा व्यास १३ लाख ९० हजार कि.मी. इतका आहे.

**खगोलशास्त्रविषयक सिद्धांत** : या सिद्धांतानुसार वातावरणीय बदल हे सूर्यमालेतील ग्रहांच्या भ्रमणामुळे (Planetary Motion) निर्माण होणाऱ्या नैसर्गिक गुरुत्वाकर्षण व चुंबकीय आंदोलनांमुळे होतात. या आदोलनांमुळे सूर्यापासून प्राप्त ऊर्जेमध्ये बदल घडतो किंवा पृथ्वीबाह्य प्रभाव पडतात आणि त्यामुळे वातावरणीय बदल घडून येतात. सर्बियन खगोलभौतिकी शास्त्रज्ञ मिलुटिन मिलान्कोविच यांनी १९४१ मध्ये हा सिद्धांत मांडला.

# २ हवा आणि हवामान

## हवा

वातावरणाच्या अभ्यासात हवा आणि हवामान हे दोनही शब्द एकाच अर्थी वापरण्याची चूक होण्याची शक्यता असते. या दोन शब्दांचे अर्थ वेगवेगळे आहेत.

**हवा आणि हवेची अंगे**

अल्पकाळ असणाऱ्या वातावरणविषयक स्थितीच्या वर्णनाला 'हवा' (Weather) असे म्हणतात.

हवेचे तापमान, हवेचा दाब किंवा भार, वाऱ्याची दिशा व वेग, आर्द्रता, वृष्टी, दृश्यता, ढग इत्यादी हवेची प्रमुख अंगे आहेत.

**हवेचे तापमान :** सूर्यापासून निघालेली किरणे पृथ्वीच्या पृष्ठभागावर पडतात व तो भाग प्रथम तापतो. भू-पृष्ठाच्या संपर्कामुळे हवेचा सर्वांत खालचा थर तापतो. तो तापल्यानंतर त्याच्या वरचा थर तापतो; यामुळे सूर्यकिरणे जरी वातावरणातून येत असली तरी हवा त्यांच्यापासून प्रत्यक्षपणे तापत नाही. ती खालच्या थरापासून वरच्या थराकडे जाते; म्हणून हवेचे तापमान भू-पृष्ठाजवळ जास्त व जास्त उंचीच्या प्रदेशात कमी असते. समुद्रसपाटीपासून प्रत्येक १६० मीटर उंचीला १° सें. ग्रे. याप्रमाणे हवेचे तापमान कमी होत जाते.

**हवेचा दाब :** इतर वायुरूप पदार्थांप्रमाणे हवेला वजन आहे. १ घनमीटर हवेचे वजन १,२०२ ग्रॅम असते. हवेचा दाब सें. मी. मध्ये किंवा मिलिबार या परिमाणात मोजत असून त्यासाठी फोर्टीनचा वायुभारमापक, निर्द्रव वायुभारमापक, वायुभारलेखक इत्यादी विविध उपकरणांचा वापर करतात. समुद्रसपाटीला हवेचा दाब साधारणपणे २९.९२ इंच किंवा १०१३.२ मिलिबार किंवा ७६ सें. मी. असतो.

हवेच्या वरच्या थरांचे खालच्या थरांवर वजन पडल्यामुळे भू-पृष्ठालगत वातावरणाचे थर दाट असतात. जसजसे जास्त उंचीच्या प्रदेशात जावे त्याप्रमाणे हवेवर पडणारे वजन कमी कमी होत गेल्याने ती विरळ होत जाते; यामुळे समुद्रसपाटीला हवेचा दाब सर्वांत जास्त आढळतो व उंचीनुसार तो कमी कमी होत जातो. समुद्रसपाटीवर हवेचे वजन १ चौ. सें. मी. ला १ किलोग्रॅम असून याच्या निम्मा म्हणजे सुमारे अर्धा किलोग्रॅम भार समुद्रसपाटीपासून ५ कि. मी. अंतरावर आढळतो. वातावरणाच्या अगदी वरच्या थरात तो जवळपास नाहीसा झालेला असतो.

**वाऱ्याची दिशा व गती** : हवेचा भार हा वेगवेगळ्या ठिकाणी कमी-जास्त असल्याचे आढळते. ज्या वेळी हवा जास्त भाराच्या प्रदेशाकडून कमी भाराच्या प्रदेशाकडे वाहू लागते त्या वेळी त्या दिशेने वारा वाहू लागला असे म्हणतात. वाऱ्याची दिशा ही नेहमी भारप्रदेशावर अवलंबून असते. वाऱ्याचा वेग अथवा गती हवेच्या दाबांतील फरकावर अवलंबून असते. फरक जास्त असेल तर वेग जास्त असतो व फरक कमी असेल तर वारा मंदपणे वाहतो.

**काही महत्त्वाचे स्थानिक वारे**

जगाच्या विविध भागात निर्माण होणारे स्थानिक वारे व त्यांची वैशिष्ट्ये खालील तक्त्यात दिली आहेत. ती याप्रमाणे–

| अनु. क्र. | वाऱ्याचे नाव | भूप्रदेश | वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|
| १ | बोरा | ॲड्रियाटिक समुद्राचा ईशान्य भाग | थंड व कोरडे |
| २ | फॉन | युरोपातील आल्प्स पर्वत | उष्ण व कोरडे |
| ३ | चिनूक (हिमभक्षक) | रॉकी पर्वत (अमेरिका व कॅनडा) | उष्ण व कोरडे |
| ४ | सेमून | इराणमधील पर्वतीय प्रदेश | तीव्र, उष्ण व कोरडे |
| ५ | सिरोक्को किंवा खामसीन | उत्तर आफ्रिका आणि दक्षिण युरोप | उष्ण व कोरडे |
| ६ | पाम्पेरो | दक्षिण अमेरिकेतील पम्पास गवताळ प्रदेश | अतिथंड आणि कोरडे |
| ७ | लू | उत्तर भारत | अतिउष्ण व कोरडे |
| ८ | ब्रिकफिल्डर | दक्षिण मध्य ऑस्ट्रेलिया | अतिउष्ण, धुळीची वादळे |
| ९ | मिस्ट्रल | स्पेन व फ्रान्स यांचा किनारी प्रदेश | अतितीव्र, थंड व कोरडे |
| १० | बर्ग | दक्षिण आफ्रिका | उष्ण व कोरडे |

## आवर्त व प्रत्यावर्त

**आवर्त**

एखाद्या क्षेत्रात वातावरणातील विशिष्ट बदलामुळे केंद्रभागी कमी दाब आणि सभोवताली जास्त दाब अशी परिस्थिती निर्माण होते. अशा वेळी सभोवतालच्या जास्त दाबाच्या प्रदेशाकडून केंद्रातील कमी दाबाच्या प्रदेशाकडे चक्राकार दिशेने वारे वाहतात. त्यास आवर्त वारे असे म्हणतात. नकाशामध्ये आवर्ताचा केंद्रभाग 'L' (Low) या अक्षराने दाखवतात.

**प्रत्यावर्त**

एखाद्या क्षेत्रात विशिष्ट वातावरणीय परिस्थितीमुळे केंद्रभागी जास्त दाब आणि सभोवताली कमी दाब निर्माण होतो. केंद्रभागातील जास्त दाबाच्या प्रदेशाकडून सभोवतालच्या कमी दाबाच्या प्रदेशाकडे चक्राकार दिशेत वारे वाहतात. त्यास प्रत्यावर्त वारे म्हणतात. नकाशामध्ये प्रत्यावर्ताचा केंद्रभाग 'H' (High) या अक्षराने दाखवतात.

## काही वादळवारे

**टोरनॅडो**

आफ्रिकेच्या किनाऱ्याजवळ निर्माण होणाऱ्या वादळासाठी 'टोरनॅडो' हा स्पॅनिश शब्द वापरला जातो. या वादळाचे वैशिष्ट्य असे की, वाऱ्यात एकाएकी बदल होतो. संयुक्त संस्थानांतील वादळांसाठीही हा शब्द वापरला जातो. उत्तर अमेरिकेत दक्षिण राज्यात जेथे सपाट भाग आढळतो तेथे, तसेच मिसिसिपी व मिसुरी नद्यांच्या खोऱ्यांत ही वादळे निर्माण होतात.

या वादळांचा विस्तार फार कमी असतो; परंतु तरीही सर्व वादळांत ही वादळे अतिशय उग्र स्वरूपाची असून विध्वंसक असतात. ही उत्तर गोलार्धात कमी भाराच्या प्रदेशात दक्षिणेकडे आढळून येतात. यांचा व्यास ३०० मीटरच्या जवळपास असतो. टोरनॅडोचे एक वैशिष्ट्य असे की, त्या वेळी नरसाळ्याच्या आकाराचा मोठा ढग

**पश्चिमवाहिनी नद्या**

पश्चिमवाहिनी नद्या तीव्र उतारावरून वाहणाऱ्या कमी लांबीच्या, उथळ व खळखळणाऱ्या आहेत. पश्चिमवाहिनी नद्यांमध्ये नर्मदा, तापी, सरस्वती, नेत्रावती, पेरियार इत्यादी महत्त्वाच्या नद्यांचा समावेश होतो. नर्मदा व तापी या विशेष महत्त्वाच्या पश्चिमवाहिनी नद्या होत.

**नर्मदा नदी :** नर्मदा नदी मध्य प्रदेशात अमरकंटकजवळ उगम पावून नैर्ऋत्येकडे वाहत जाते. शेवटी गुजरातमध्ये भरुचजवळ ती अरबी समुद्रास मिळते. नर्मदेचे खोरे मुख्यत्वे मध्य प्रदेशातच पसरलेले असून त्या खोऱ्याचा फक्त दहावा हिस्सा गुजरातमध्ये आहे. सर्वसाधारणपणे आकारमानाने कावेरी खोऱ्याइतकेच असलेले हे खोरे कावेरीप्रमाणेच द्वीपकल्पीय पठारी प्रदेशातील चौथ्या क्रमांकाचे खोरे गणले जाते. बऱ्हनेर, बंजार, शार, शक्कर, दुधी व तवा या नर्मदेच्या डाव्या किनाऱ्यावरील उपनद्या होत; तर हिरण, ओरसांग, बारणा व कोलार या तिच्या उजव्या किनाऱ्यावरील उपनद्या होत.

**तापी नदी :** तापी नदी मध्य प्रदेशात बेतूल जिल्ह्यात मुलताईजवळ उगम पावते. कमी-अधिक प्रमाणात नर्मदेस समांतर अशीच वाहत जाऊन ती सुरतजवळ अरबी समुद्रास मिळते. तापी नदीचे खोरे मध्य प्रदेश, महाराष्ट्र व गुजरात या राज्यांतील काही प्रदेशांत पसरलेले आहे. तापी नदीच्या मुखाजवळील काही भागाचा वाहतुकीसाठी उपयोग होतो. पूर्णा ही तापीची एक महत्त्वाची उपनदी आहे. याशिवाय बेतूल, पातकी, गंजाल, अणेर, अरुणावती, गोगाई इत्यादी तिच्या उजव्या किनाऱ्यावरील उपनद्या असून अंभोरा, खुरसी, वाघुर, गिरणा, बोरी, पांझरा या तिच्या डाव्या किनाऱ्यावरील उपनद्या होत.

**साबरमती नदी :** ही नदी राजस्थानात अरवली पर्वतात उगम पावून राजस्थान व गुजरात राज्यांतून नैर्ऋत्येकडे वाहत जाते व शेवटी खंभातच्या आखातात अरबी समुद्रास मिळते. अहमदाबाद हे तिच्या काठावर वसलेले महत्त्वाचे शहर होय.

**मही नदी :** विंध्य पर्वतात उदयपूरच्या पूर्वेस उगम पावणारी ही नदी राजस्थान, मध्य प्रदेश व गुजरातमधून वाहत जाऊन अरबी समुद्रास मिळते.

**भारतातील नद्या**

| नदी | उगमस्थान | लांबी कि. मी. | कोणत्या समुद्रास वा नदीस मिळते? |
|---|---|---|---|
| **गंगा नदीप्रणाली** | | | |
| गंगा | गंगोत्री (हिमालय पर्वत, उत्तराखंड). | २,५२५ | बंगालच्या उपसागरास बांगलादेशात, चंडिपूरजवळ. |
| यमुना | यमुनोत्री (उत्तराखंड). | १,३७६ | गंगा नदीस, अलाहाबाद येथे. |
| घाग्रा | तिबेटमध्ये मानसरोवराच्या दक्षिणेस, गुरला मांधाता शिखराजवळ. | १,०८० | गंगा नदीस, बिहार राज्यात पाटण्याजवळ छपरा येथे. |
| कोसी | तिबेट-नेपाळ सरहद्दीजवळ. | ७३० (भारतात) | गंगा नदीस, बिहार राज्यात. |
| दामोदर | तोरी (छोटा नागपूर पठार). | ५४१ | हुगळी नदीस. |

घाग्रा नदीलाच पश्चिम नेपाळमध्ये करनाली असे संबोधले जाते. सारदा, सरजू (शरयू), राप्ती या तिच्या उपनद्या होत.

| नदी | उगमस्थान | लांबी कि. मी. | कोणत्या समुद्रास वा नदीस मिळते? |
|---|---|---|---|
| गंडक | मध्य हिमालय (नेपाळमध्ये). | ४२५ (भारतात) | गंगा नदीस, पाटण्याजवळ. |
| चंबळ | महू (मध्य प्रदेश) | १,०५० | गंगा नदीस |
| **सिंधू नदीप्रणाली** | | | |
| सिंधू | तिबेटमध्ये, मानसरोवराजवळ. | २,८८० (भारतातील लांबी ७०९ (+) कि. मी.) | अरबी समुद्रास. |
| झेलम | पीरपांजाल टेकड्यांमध्ये, वैरीनाग येथे. | ७२४ | सिंधू नदीस, पाकिस्तानमध्ये. |
| चिनाब | हिमालय पर्वतात, झास्कर रांगांमध्ये, हिमाचल प्रदेशात, बारा लाचा खिंडीजवळ. | १,१८० (भारतातील लांबी ५०० कि. मी.) | सिंधू नदीस, पाकिस्तानमध्ये. |
| रावी | हिमाचल प्रदेशात, कुलू टेकड्यांमध्ये, रोहतांग खिंडीजवळ | ७२५ | सिंधू नदीस, पाकिस्तानमध्ये. |
| बियास | हिमाचल प्रदेशात, कुलू टेकड्यांमध्ये, रोहतांग खिंडीजवळ, बियासकुंड येथे. | ४६० | सतलज नदीस. |
| सतलज | तिबेटमध्ये, राकस सरोवर येथे. | १,४५० (भारतातील लांबी १,०५० कि. मी.) | सिंधू नदीस, पाकिस्तानमध्ये. |
| **ब्रह्मपुत्र नदीप्रणाली** | | | |
| ब्रह्मपुत्र | चेमायुंगडंग खोऱ्यात, तिबेटमध्ये. | २,९०० (भारतातील लांबी ९१६ कि. मी.) | गंगा नदीस, बांगलादेशमध्ये. (+) |
| **पठारावरील पश्चिमवाहिनी नद्या** | | | |
| नर्मदा | अमरकंटक, जिल्हा-शहाडोल, मध्य प्रदेश. | १,३१२ | अरबी समुद्रास, भरुचजवळ. |
| तापी | मुलताई, जिल्हा-बेतूल, | ७३० | अरबी समुद्रास, सुरतजवळ. मध्य प्रदेश. |
| साबरमती | अरवली रांगांमध्ये, मेवाड टेकड्यांत, जयसमुद्र सरोवर, उदयपूर, राजस्थान. | ३२० | अरबी समुद्रास. |

## भारतातील कृषि–उत्पादने

| क्र. | कृषी उत्पन्ने | महत्त्वाची उत्पादक राज्ये |
|---|---|---|
| १. | गहू | उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, पंजाब, हरियाना. |
| २. | तांदूळ | पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, पंजाब, आंध्र प्रदेश |
| ३. | ज्वारी | महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य प्रदेश, गुजरात, आंध्र प्रदेश. |
| ४. | बाजरी | गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र. |
| ५. | बार्ली | उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश. |
| ६. | मका | महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य प्रदेश, बिहार |
| ७. | हरभरा | मध्य प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान |
| ८. | तूर | महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य प्रदेश |
| ९. | भुईमूग | गुजरात, राजस्थान, आंध्र प्रदेश, तमिळनाडू |
| १०. | सोयाबीन | मध्य प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान. |
| ११. | सूर्यफूल | कर्नाटक, ओडिशा, आंध्र प्रदेश, हरियाना |
| १२. | ऊस | उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक |
| १३. | कापूस | महाराष्ट्र, गुजरात, तेलंगाणा, पंजाब, हरियाना, तमिळनाडू, राजस्थान, कर्नाटक. |
| १४. | ताग | पश्चिम बंगाल, बिहार, आसाम. |
| १५. | चहा | दारांग, शिवसागर, लखिमपूर (आसाम), दार्जिलिंग, जलपैगुडी व कुचबिहार (पश्चिम बंगाल), तमिळनाडू, केरळ व कर्नाटकमधील निलगिरी पर्वत परिसर. |
| १६. | कॉफी | कर्नाटक, केरळ, तमिळनाडू. |
| १७. | रबर | केरळ, तमिळनाडू, कर्नाटक. |
| १८. | तंबाखू | आंध्र प्रदेश, गुजरात, कर्नाटक. |
| १९. | काजू | महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, ओडिशा, केरळ |
| २०. | कोको | केरळ, कर्नाटक, तमिळनाडू. |
| २१. | रेशीम | कर्नाटक, आसाम, झारखंड, बिहार, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, जम्मू आणि काश्मीर. |
| २२. | बटाटे | उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, पंजाब |
| २३. | कांदे | महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य प्रदेश |
| २४. | मिरची | महाराष्ट्र, तेलंगाणा, आंध्र प्रदेश. |
| २५. | लवंग | केरळ. |
| २६. | आले | केरळ, मेघालय. |

अधोरेखित केलेल्या कृषिउत्पादनांसमोरील अधोरेखित केलेली तीन राज्ये इकॉनॉमिक सर्व्हे २०१७-१८ मधील माहितीनुसार उत्पादनाच्या क्रमाने दिली आहेत.

# ४ महाराष्ट्राचा भूगोल एक विशेष अभ्यास

## भू-स्तर रचना, प्राकृतिक रचना, भू-शास्त्रीय रचना, मृदा व पर्जन्य

### भू-स्तर रचना

भू-शास्त्रीयदृष्ट्या महाराष्ट्र हा भारतीय द्वीपकल्पीय पठाराचाच एक भाग आहे. महाराष्ट्राचा ९० टक्के भू-भाग लाव्हारसापासून तयार झालेल्या 'बेसॉल्ट' या अग्निजन्य खडकांपासून बनलेला आहे. दखखनच्या पठाराच्या निर्मितीची क्रिया सुमारे सात कोटी वर्षांपूर्वी सुरू झाली. त्यानंतर दीर्घ काळ ही क्रिया चालूच राहिली; त्यामुळे राज्यात लाव्हारसाचे, एकावर एक अनेक थर दिसून येतात. हाच लाव्हारस थंड होऊन त्याच्यापासून बेसॉल्ट खडकाची निर्मिती झाली. बेसॉल्टपासून बनलेल्या या पठारी प्रदेशाच्या तळभागात आर्कियन प्रणालीतील खडक आहेत. राज्यात जसजसे पूर्वेकडे जावे तसतशी बेसॉल्टच्या थराची जाडी कमी कमी होत जाऊन नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांत बेसॉल्टच्या थराखाली असलेले आर्कियन, धारवाड, कडप्पा आणि विंध्य प्रणालीतील खडक उघडे पडलेले दिसून येतात. थोडक्यात, या भागात बेसॉल्टचा थर पातळ व विरळ होत जाऊन जवळजवळ नाहीसा झालेला आढळतो.

दक्षिण कोकणात, विशेषतः सिंधुदुर्ग जिल्ह्यात वरचे बेसॉल्टचे थर खननक्रियेने निघून गेल्याने खालचे वालुकाश्म आणि गारगोटीचे खडक भू-पृष्ठालगत उघडे पडलेले दिसतात.

चंद्रपूर आणि नागपूर जिल्ह्यांतील कोळशाचे साठे प्राचीन गोंडवन श्रेणीच्या खडकांत सापडतात.

आपण वर अभ्यासल्याच्या अगदी उलट म्हणजे जसजसे पूर्वेकडून पश्चिमेकडे जावे तसतशी बेसॉल्टच्या थरांची जाडी वाढत जाऊन सह्य पर्वतात ही जाडी सर्वांत जास्त म्हणजे सुमारे २,२०० मीटर इतकी झाल्याचे दिसून येते.


बेसॉल्टचे थर क्षितिजसमांतर असल्याने त्यांची झीज होऊन सपाट माथ्यांची पायऱ्यापायऱ्यांसारखी रचना असणारी भू-रूपे राज्यात सर्वत्र दिसतात. सह्याद्रीतील शिखरे टोकदार नसून सपाट असण्याचे हे मुख्य कारण आहे.

सह्याद्रीत महाबळेश्वरच्या दक्षिणेस तसेच दक्षिण कोकणात डोंगरांच्या माथ्यावर जांभा खडकाचे थर कवचाच्या स्वरूपात आढळतात. राज्यात नद्यांच्या खोऱ्यात आणि खाड्यांच्या काठावर वाहून आलेल्या गाळाचे थर आढळतात. याव्यतिरिक्त महाराष्ट्राच्या भू-स्तर रचनेत विशेष अशी विविधता दिसून येत नाही.

### प्राकृतिक रचना

भारतीय द्वीपकल्पाच्या उत्तर-पश्चिम भागात वसलेला महाराष्ट्र हा प्राकृतिकदृष्ट्या बहुतांशी पठारी प्रदेश आहे. राज्यातून कोकण किनारपट्टीस समांतर दक्षिणोत्तर गेलेल्या सह्य पर्वतरांगांमुळे किंवा पश्चिम घाट रांगांमुळे राज्याचे 'कोकण' आणि 'देश किंवा पठार' असे दोन स्पष्ट भाग पडलेले आहेत. याहून काटेकोरपणे बोलावयाचे तर कोकण, सह्य पर्वतरांगा व पठार असे राज्याचे प्राकृतिकदृष्ट्या तीन भाग सांगता येतील.

# गोदावरी




गोदावरी ही महाराष्ट्रातील एक प्रमुख नदी आहे.

**उगम**

गोदावरी मध्य महाराष्ट्रातून वाहते. हिचा उगम नाशिक जिल्ह्यात सह्य पर्वतात त्र्यंबकेश्वरजवळ ब्रह्मगिरी येथे झाला आहे.

**खोऱ्याच्या भौगोलिक सीमा**

गोदावरी सातमाळा-अजिंठा व हरिश्चंद्र-बालाघाट या डोंगररांगांच्या दरम्यान वाहते. याचाच अर्थ असा की, ही नदी सातमाळा-अजिंठा डोंगररांगांच्या दक्षिणेकडून आणि हरिश्चंद्र-बालाघाट डोंगररांगांच्या उत्तरेकडून वाहत जाते.

**प्रवाहमार्गातील जिल्हे**

ही नदी नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी व नांदेड जिल्ह्यांतून वाहत जाऊन धर्माबादजवळ तेलंगाणात प्रवेश करते. पुढे ती बंगालच्या उपसागरास मिळते. महाराष्ट्रातील सर्वांत जास्त जिल्ह्यांतून वाहणारी ही नदी आहे.

**गोदावरीची लांबी**

गोदावरीची एकूण लांबी १,४६५ कि. मी. असून तिचा ७३२ कि. मी. लांबीचा प्रवाह महाराष्ट्रातून गेला आहे. महाराष्ट्रातील ही सर्वांत लांब नदी आहे.

**गोदावरीच्या उपनद्या**

गोदावरीला दारणा, मांजरा, प्रवरा, सिंधफणा, दुधना, मुळा व कुंडलिका या दक्षिणेकडून (उजव्या बाजूने) आणि शिवना, दक्षिणा-पूर्णा, प्राणहिता, इंद्रावती व कादवा या उत्तरेकडून (डाव्या बाजूने) मिळणाऱ्या उपनद्या आहेत.

(४) भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे.
(५) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
(६) भारतीय ॲग्रो इंडस्ट्रीज फाऊंडेशन, उरुळी-कांचन (पुणे).
(७) बाँबे नॅचरल हिस्टरी सोसायटी, मुंबई.
(८) टेक्स्टाईल इन्स्टिट्यूट, इचलकरंजी (कोल्हापूर).
(९) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक संशोधन मंडळ, पुणे

**राज्यातील सैनिकी प्रशिक्षण देणाऱ्या संस्था.**

(१) आयएनएस हमला, मालाड (मुंबई).
(२) आयएनएस राजेंद्र, मुंबई.
(३) कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग, खडकी (पुणे).
(४) आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेज, पुणे.
(५) नॅशनल डिफेन्स अकॅडमी, खडकवासला (पुणे).
(६) आयएनएस शिवाजी, लोणावळा (पुणे).
(७) स्कूल ऑफ आर्टिलरी, देवळाली (नाशिक).

## महाराष्ट्रातील प्रमुख शहरे

**मुंबई**

महाराष्ट्राची राजधानी. सन २०११ च्या जनगणनेच्या प्राथमिक निष्कर्षांनुसार बृहन्मुंबई विस्तारित नागरी संकुलाची लोकसंख्या २ कोटी ०७ लाख ४८ हजार ३९५ असून बृहन्मुंबई नागरी संकुलाची लोकसंख्या १ कोटी ८४ लाख १४ हजार २८८ इतकी तर बृहन्मुंबई शहराची लोकसंख्या १ कोटी २४ लाख ७८ हजार ४४७ इतकी आहे. सन २०११ च्या जनगणनेच्या प्राथमिक निष्कर्षांनुसार 'बृहन्मुंबई विस्तारित नागरी संकुल' हे लोकसंख्येचा विचार करता दिल्ली विस्तारित नागरी संकुलानंतरचे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे विस्तारित नागरी संकुल असून देशातील पहिल्या क्रमांकाचे शहर व नागरी संकुल आहे. देशातील लोकसंख्येची सर्वाधिक घनता असलेले शहर. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील अतिशय महत्त्वाचे बंदर. भारतातील महत्त्वाचे औद्योगिक केंद्र. कापड गिरण्या, सूत गिरण्या, इलेक्ट्रॉनिक वस्तू व इंजिनिअरिंग उत्पादने यांचे कारखाने. भारताची व्यापारी राजधानी. भारताचा व्यापार प्रामुख्याने (जवळजवळ २५ टक्के) मुंबई बंदरातूनच चालतो.

तुर्भे येथे तेलशुद्धीकरण कारखाने. मुंबई हाय (मुंबईपासून २४० कि. मी.) येथे समुद्रातून 'सागरसम्राट' व अन्य जहाजांच्या साहाय्याने खोदाई करून खनिज तेल मिळविले जाते.

जुहूचा किनारा, गेट वे ऑफ इंडिया, राणीचा बाग (जिजामाता बाग), तारापोरवाला मत्स्यालय, कमला नेहरू पार्क, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान (बोरीवली), फिरोजशहा मेहता उद्यान (हँगिंग गार्डन) इत्यादी प्रेक्षणीय स्थळे येथे आहेत. मुंबई येथे मंत्रालय, विधानभवन, मुंबई विद्यापीठ व उच्च न्यायालयाच्या इमारती आहेत. उच्च न्यायालयाची इमारत पाहण्याजोगी असून १८७८ मध्ये बांधून पूर्ण झालेली ही वास्तू इंग्रजांच्या 'गॉथिक शैली'चा अप्रतिम नमुना आहे.

मुंबई येथे 'सहार' व 'सांताक्रूझ' ही विमानतळे आहेत. सहार विमानतळावरून आंतरराष्ट्रीय वाहतूक चालते; तर सांताक्रूझ विमानतळावरून देशांतर्गत वाहतूक चालते. सहार विमानतळ आता 'छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ' या नावाने ओळखले जाते.

येथील छत्रपती शिवाजी टर्मिनस (पूर्वीचे व्हिक्टोरिया टर्मिनस) हे इटालियन गॉथिक शैलीने बांधलेले रेल्वेस्थानकही प्रेक्षणीय आहे. जुलै, २००४ मध्ये युनेस्कोने 'छत्रपती शिवाजी टर्मिनस'चा म्हणजे पूर्वीच्या 'व्हिक्टोरिया टर्मिनस'चा 'जागतिक वारसा स्थळ' म्हणून गौरव केला आहे.

'चले जाव' आंदोलनामुळे ऐतिहासिक महत्त्व लाभलेले 'ऑगस्ट क्रांती मैदान' (गवालिया टँक मैदान) येथेच आहे. मुंबईपासून जवळच परंतु रायगड जिल्ह्याच्या उरण तालुक्यात घारापुरी येथे 'एलेफंटा केव्ह्ज्' आहेत.

**पुणे**

लोकसंख्येचा विचार करता राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे विस्तारित नागरी संकुल व दुसऱ्या क्रमांकाचे दशलक्षी शहर. देशातील आठव्या क्रमांकाचे विस्तारित नागरी संकुल. पुणे विस्तारित नागरी संकुलाची लोकसंख्या ५० लाख ४९ हजार ९६८ (सन २०११ प्राथमिक निष्कर्ष) इतकी असून केवळ पुणे शहराची लोकसंख्या ३१ लाख १५ हजार ४३१ इतकी आहे.

विद्येचे माहेरघर. ऐतिहासिक शहर. पेशव्यांची राजधानी. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मुख्य ठिकाण. महाराष्ट्र राज्य विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती). टिळक महाराष्ट्र विद्यापीठ. शासकीय परीक्षा मंडळ. राज्य शिक्षणशास्त्र संस्था. बालचित्रवाणी, फिल्म आणि दूरचित्रवाणी शिक्षण केंद्र. आकाशवाणी केंद्र. औद्योगिक केंद्र- इंजिनिअरिंग, ऑटोमोबाईल व इलेक्ट्रॉनिक उत्पादने; हातकागद कारखाना- हा कागद निर्यातही होतो; पिंपरी-चिंचवड, भोसरी, हडपसर, गुलटेकडी येथे औद्योगिक वसाहती; जवळच थेरगाव येथे कागद गिरणी. महत्त्वाचे रेल्वे जंक्शन व बाजारपेठ. लोहगाव येथे विमानतळ.

जवळच कात्रज येथे सर्पउद्यान. बालेवाडी येथे अत्याधुनिक क्रीडासंकुल; त्यामुळे 'क्रीडानगरी' म्हणूनही पुण्यास महत्त्व प्राप्त झाले आहे. जवळच हिंजेवाडी येथे स्व. राजीव गांधी माहिती-तंत्रज्ञान उद्यान (इन्फोटेक पार्क) विकसित झाले आहे.

**नागपूर**

लोकसंख्येचा विचार करता देशातील तेराव्या क्रमांकाचे, तर राज्यातील तिसऱ्या क्रमांकाचे विस्तारित नागरी संकुल. नागपूर विस्तारित नागरी संकुलाची लोकसंख्या २५,८३,९१९ (सन २०११ प्राथमिक निष्कर्ष) इतकी असून नागपूर नागरी संकुलाची लोकसंख्या २४,९७,७७७ इतकी आहे.

नाग नदीकाठी वसलेले भारताच्या मध्यवर्ती असे स्थान लाभलेले शहर.

महाराष्ट्राची उपराजधानी. विधानसभा व विधानपरिषदेचे हिवाळी अधिवेशन येथे भरते. उच्च न्यायालयाचे खंडपीठ. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे मुख्य ठिकाण. सीताबर्डीचा किल्ला.

कापड-गिरण्या, हातमाग, औद्योगिक उत्पादने.

सोनेगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ.

नागपूर परिसर संत्र्यांच्या उत्पादनासाठी विशेष प्रसिद्ध. नागपूरची संत्री असे समीकरणच जमलेले.

जवळच रामटेक व सावनेर येथे मँगनीजच्या खाणी. कामठी व उमरेड येथे दगडी कोळशाचे उत्पादन.

रामटेक येथे 'कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय' कार्यरत झाले आहे.

**नाशिक**

राज्यातील चौथ्या क्रमांकाचे व देशातील एकोणतिसाव्या क्रमांकाचे विस्तारित नागरी संकुल. नाशिक विस्तारित नागरी संकुलाची लोकसंख्या १५ लाख ६२ हजार ७६९. (सन २०११ प्राथमिक निष्कर्ष). गोदावरी नदीच्या काठावर. हिंदूंचे तीर्थक्षेत्र. 'सिंहस्थ' कुंभमेळ्याबद्दल प्रसिद्ध. ओझर येथे मिग विमानांचा कारखाना. अंबड व सातपूर येथे औद्योगिक वसाहती. देवळाली येथे लष्करी छावणी व स्कूल ऑफ आर्टिलरी. शासकीय प्रतिभूती मुद्रणालय (सिक्युरिटी प्रेस). यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ येथे आहे. जवळच गंगापूर येथे देशातील पहिले मातीचे धरण आहे. गोदावरीवर बांधण्यात आलेल्या या धरणातूनच नाशिक शहराला पाणीपुरवठा केला जातो.

महाराष्ट्र राज्य अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) व पोलीस उपअधीक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना प्रशिक्षण देणारी महाराष्ट्र राज्य पोलीस अकॅडमी या संस्था येथे आहेत.

# ७ वस्तुनिष्ठ प्रश्न

## पृथ्वी, अक्षांश-रेखांश, हवा- हवामान

१. पृथ्वीच्या काल्पनिक आसाभोवती फिरण्याच्या गतीला पृथ्वीची अक्षीय गती म्हणतात. खालीलपैकी कोणते पृथ्वीच्या अक्षीय गतीचे परिणाम होत?

(१) पृथ्वी विषुववृत्तीय भागात काहीशी फुगीर आहे.
(२) पृथ्वी दोन्ही ध्रुवांपाशी किंचित चपटी आहे.
(३) पृथ्वीवर निरनिराळे ऋतू निर्माण होतात.
(४) पृथ्वीवर दिवस व रात्र स्थिती निर्माण होते.

(अ) फक्त १, २ व ३ (ब) फक्त १, २ व ४
(क) फक्त १, ३ व ४ (ड) १, २, ३ व ४

२. खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

(१) पृथ्वी सूर्याभोवतीची प्रदक्षिणा ज्या मार्गावरून करते त्या मार्गास तिची कक्षा असे म्हणतात.
(२) आपल्या कक्षेतून फिरण्याच्या पृथ्वीच्या गतीला कक्षीय गती असे म्हटले जाते.
(३) आपल्या कक्षेतून फिरण्याच्या पृथ्वीच्या गतीस पृथ्वीचे परिभ्रमण असे म्हटले जाते.
(४) पृथ्वीचा परिभ्रमण मार्ग वर्तुळाकार स्वरूपाचा आहे.

(अ) १ (ब) २ (क) ३ (ड) ४

३. पृथ्वीच्या स्वतःभोवती फिरण्यामुळे हे घडत नाही ....

(अ) सागरी प्रवाहांची दिशा बदलणे. (ब) चंद्राच्या कला बदलणे.
(क) भरती-ओहोटी येणे. (ड) दोन वृत्तांवरील वेळेमध्ये फरक आढळणे.

४. खालील प्रसंगी स्प्रिंग टाइड्स (वासंतिक भरती) निर्माण होतात ....

(अ) सूर्य, पृथ्वी आणि चंद्र एका रेषेत आल्यास
(ब) सूर्य, पृथ्वी आणि चंद्र परस्परांशी काटकोनात आल्यास
(क) चंद्र पृथ्वीपासून सर्वांत जवळ असताना
(ड) चंद्र पृथ्वीपासून सर्वांत लांब असताना

**१. (ब) २. (ड) ३. (ड) ४. (अ)**

५. आपणास पृथ्वीवरून चंद्राचा एकसमानच पृष्ठभाग सतत का दिसतो?
   (अ) त्याच्या पलीकडील पृष्ठावर प्रकाश पडत नाही.
   (ब) चंद्राचा स्वतःभोवती फिरण्याचा काळ आणि पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालण्याचा काळ एकसमान आहे.
   (क) चंद्राचा स्वतःभोवती फिरण्याचा काळ आणि पृथ्वीचा स्वतःभोवती फिरण्याचा काळ एकसमान आहे.
   (ड) आपणास तसे केवळ भासमान होते.

६. एखाद्या स्थानाचे रेखांश त्याचे .... कोनीय अंतर दाखवितात.
   (अ) पृथ्वीच्या अक्षापासूनचे (ब) विषुववृत्तापासूनचे
   (क) उत्तर ध्रुवापासूनचे (ड) दक्षिण ध्रुवापासूनचे

७. .... या वेळी/स्थळी सूर्याचे विषुववृत्तापासूनचे कोनीय अंतर सर्वाधिक असते.
   (अ) ख-स्वस्तिक (झेनिथ) (ब) सस्तंभ (सोल्स्टिस)
   (क) संपात (इक्विनॉक्स) (ड) मध्यान्ह (दुपार)

८. कोणत्या वेळी वा प्रसंगी उत्तर ध्रुवावर पडणाऱ्या सूर्यकिरणांचा आयातकोन सर्वाधिक असेल?
   (अ) २१ मार्च
   (ब) २१ सप्टेंबर
   (क) कर्कवृत्तावर सूर्यकिरण थेट उभ्या दिशेने पडतात तेव्हा
   (ड) मकरवृत्तावर सूर्यकिरण थेट उभे पडतील तेव्हा

९. पृथ्वीचा आस एका बाजूस किंचित कललेला नसता तर ....
   (१) सर्वत्र एकसमान तापमान आढळले असते.
   (२) दिवस आणि रात्र निर्माण झाल्या नसत्या.
   (३) बदलते हवामान (ऋतुचक्र) आढळले नसते.
   (४) ध्रुव प्रदेशांत दीर्घकालीन दिवस-रात्र आढळले नसते.
   (अ) १, ३ व ४ (ब) २ व ४ (क) ३ व ४ (ड) २, ३ व ४

१०. खालील प्रदेशात सूर्य थेट डोक्यावर कधीच दिसणार नाही ....
   (१) उत्तरी समशीतोष्ण प्रदेश (२) दक्षिणी समशीतोष्ण प्रदेश
   (३) उत्तरी बर्फाळ प्रदेश (४) उष्ण कटिबंधीय प्रदेश
   (अ) फक्त ३ (ब) फक्त १, २ व ३ (क) फक्त २ व ३ (ड) १ ते ४ सर्व

११. चंद्र पृथ्वीपासून खूप अंतरावर असताना सूर्यग्रहण झाले तर असे ग्रहण .... असेल.
   (अ) खग्रास (ब) खंडग्रास (क) कंकणाकृती (ड) यापेक्षा वेगळे उत्तर

१२. खग्रास सूर्यग्रहण जास्तीतजास्त किती वेळ असू शकते?
   (अ) १२.५ मिनिटे (ब) ७.४० मिनिटे
   (क) १.४२ तास (ड) ४० मिनिटांहून अधिक काळ

**५. (ब) ६. (ब) ७. (ब) ८. (क) ९. (क) १०. (ब) ११. (क) १२. (ब)**

# १ सामान्य विज्ञानातील सामान्य माहिती

## महत्त्वाची माहिती

**काही विषय व त्यांची शास्त्रीय नावे**

| क्र. | विषय | शास्त्रीय नाव |
|---|---|---|
| १. | हवामानाचा अभ्यास | मीटिअरॉलॉजी |
| २. | रोग वा आजार यांचा अभ्यास | पॅथॉलॉजी |
| ३. | ध्वनीचा अभ्यास | ॲकॉस्टिक्स |
| ४. | ग्रह-ताऱ्यांचा अभ्यास | ॲस्ट्रॉनॉमी |
| ५. | वनस्पतिजीवनाचा अभ्यास | बॉटनी |
| ६. | मानवी वर्तनाचा अभ्यास | सायकॉलॉजी |
| ७. | प्राणिजीवनाचा अभ्यास | झूलॉजी |
| ८. | पृथ्वीच्या पृष्ठभागावरील पदार्थांचा अभ्यास | जिऑलॉजी |
| ९. | कीटकजीवनाचा अभ्यास | एन्टामॉलॉजी |
| १०. | धातूंचा अभ्यास | मेटॅलर्जी |
| ११. | भूगर्भातील पदार्थांचा (खनिज वगैरे) अभ्यास | मिनरॉलॉजी |
| १२. | जिवाणूंचा अभ्यास | बॅक्टेरिऑलॉजी |
| १३. | विषाणूंचा अभ्यास | व्हायरॉलॉजी |
| १४. | हवाई उड्डाणाचे शास्त्र | एअरॉनॉटिक्स |
| १५. | पक्षिजीवनाचा अभ्यास | ऑर्निथॉलॉजी |
| १६. | सरपटणाऱ्या प्राण्यांचे शास्त्र | हर्पेटॉलॉजी |
| १७. | आनुवंशिकतेचा अभ्यास | जेनेटिक्स |
| १८. | मज्जासंस्थेसंबंधीचा अभ्यास | न्यूरॉलॉजी |
| १९. | विषासंबंधीचा अभ्यास | टॉक्सिकॉलॉजी |

| क्र. | विषय | शास्त्रीय नाव |
|---|---|---|
| २०. | हृदय व त्याची कार्ये यांच्याशी संबंधित शास्त्र | कार्डिऑलॉजी |
| २१. | अवकाश-प्रवासशास्त्र | ॲस्ट्रॉनॉटिक्स |
| २२. | प्राणि-शरीरशास्त्र | ॲनाटॉमी |
| २३. | मानववंशशास्त्र (मानव जातीचा अभ्यास) | ॲंथ्रापॉलॉजी |
| २४. | जीव-रसायनशास्त्र | बायोकेमिस्ट्री |
| २५. | सजीवांसंबंधीचा अभ्यास (जीवशास्त्र) | बायोलॉजी |
| २६. | रंगविज्ञानाचे शास्त्र | क्रोमॅटिक्स |
| २७. | विविध मानववंशांसंबंधीचा अभ्यास | एथ्नॉलॉजी |
| २८. | उद्यानरोपण, संवर्धन व व्यवस्थापन यांचे शास्त्र | हॉर्टिकल्चर |
| २९. | शरीर-इंद्रिय-विज्ञानशास्त्र | फिजिऑलॉजी |
| ३०. | फलोत्पादनशास्त्र | पॉमॉलॉजी |
| ३१. | मृतप्राणी भूसा भरून ठेवण्याचे शास्त्र | टॅक्सीडर्मी |
| ३२. | भूपृष्ठाचा अभ्यास | टॉपोग्राफी |

**काही महत्त्वाचे शोध व शास्त्रज्ञ**

| क्र. | शोध | शास्त्रज्ञ | क्र. | शोध | शास्त्रज्ञ |
|---|---|---|---|---|---|
| १. | विमान | राईट बंधू | २. | सायकल | मॅक्मिलन |
| ३. | डिझेल इंजिन | रुडाल्फ डिझेल | ४. | डायनामाइट | अल्फ्रेड नोबेल |
| ५. | रडार | टेलर व यंग | ६. | रेडिअम | मेरी क्यूरी व पेरी क्यूरी |
| ७. | रेडिओ | जी. मार्कोनी | ८. | रिव्हॉल्वर | कोल्ट |
| ९. | वाफेचे इंजिन | जेम्स वॅट | १०. | टेलिफोन | अलेक्झांडर-ग्राहम बेल |
| ११. | थर्मामीटर | गॅलेलिओ | १२. | ग्रामोफोन | एडिसन |
| १३. | हेलिकॉप्टर | सिकोर्स्की | १४. | टेलिव्हिजन | जॉन बेअर्ड |
| १५. | विजेचा दिवा | एडिसन | १६. | पेनिसिलीन | अलेक्झांडर फ्लेमिंग |
| १७. | रेफ्रिजरेटर | पार्किन्स | १८. | सेफ्टी लँप | हंप्रे डेव्ही |
| १९. | विशिष्ट गुरुत्व | आर्किमिडीज | २०. | कॉस्मिक किरण | डॉ. होमी भाभा |
| २१. | वनस्पतींनाही संवेदना असतात. | जगदीशचंद्र बोस | २२. | उत्क्रांतिवाद | डार्विन |
| २३. | सापेक्षतेचा सिद्धान्त | आइन्स्टाईन | २४. | भूमिती | युक्लिड |
| २५. | होमिओपाथी | हायेनमान | २६. | शिवण मशीन | होवे |

## महत्त्वाची मूलद्रव्ये आणि त्यांचे उपयोग

| अ.क्र. | मूलद्रव्य | | उपयोग |
|---|---|---|---|
| (१) | सोडिअम (Na) | (१) | सोडिअम बाष्पदीपांमध्ये. |
| | | (२) | सोडिअम पारदसंमिश्राचा क्षपणक म्हणून उपयोग करतात. |
| | | (३) | उच्च तापमानदर्शक तापमापीमध्ये. |
| (२) | मॅग्नेशिअम (Mg) | (१) | क्षणदीप्ती छायाचित्रणात. |
| | | (२) | शोभेच्या दारूत. |
| | | (३) | मॅग्नेलिअमसारखी (मॅग्नेशिअम आणि ॲल्युमिनिअम यांचे संमिश्र) संमिश्रे तयार करण्यासाठी. (विमाने, मोटारी यांचे सुटे भाग आणि प्रयोगशालेय तराजू वगैरे तयार करण्यासाठी मॅग्नेलिअमचा उपयोग होतो.) |
| (३) | पारा (Hg) | (१) | हवादाबमापी आणि तापमापीमध्ये. |
| | | (२) | पाऱ्याच्या बाष्पदीपात. |
| | | (३) | कथिल-पारदसंमिश्राचा उपयोग आरसे तयार करण्यासाठी होतो. |
| | | (४) | सोने व चांदी यांच्या निष्कर्षणात. |
| (४) | ॲल्युमिनिअम (Al) | (१) | चॉकलेट, सिगारेट आदी वस्तूंच्या आवरणासाठी ॲल्युमिनिअमच्या वर्खाचा उपयोग होतो. |
| | | (२) | ॲल्युमिनिअमची पूड थर्माइट तयार करण्यासाठी वापरतात. |
| (५) | जस्त (Zn) | (१) | लोखंड आणि पोलाद गंजू नये म्हणून त्यांच्यावर लेप देण्यासाठी. |
| | | (२) | डॅनियलचा विद्युत घट, लेक्लांशेचा विद्युत घट आणि कोरडा विद्युत घट या घटांमध्ये इलेक्ट्रोड म्हणून. |
| | | (३) | क्षपणक म्हणून. |
| | | (४) | चांदी आणि सोने यांच्या निष्कर्षण प्रक्रियेत. |
| (६) | तांबे (Cu) | (१) | उत्प्रेरक म्हणून. |
| | | (२) | विद्युत विलेपनाकरिता. |
| (७) | कथिल (Sn) | (१) | भांड्यांना कल्हई करण्यासाठी. |
| | | (२) | लोखंडी पत्र्यांवर लेप देण्यासाठी. |
| | | (३) | ब्राँझसारखी संमिश्रे बनविण्यासाठी. |
| (८) | चांदी (Ag) | (१) | तांबे, पारा, निकेल आणि जस्त यांच्याबरोबर संमिश्रे तयार करण्यासाठी. |
| | | (२) | चांदीचे क्षार तयार करण्यासाठी. (चांदीच्या क्षारांचा छायाचित्रणात, औषधांमध्ये, अंकनशाई तयार करण्यासाठी आणि प्रयोगशाळेतही उपयोग होतो.) |
| | | (३) | विद्युत्‌विलेपनात. |
| | | (४) | रजतदर्पण तयार करण्यासाठी. |

# ९ हे लक्षात ठेवा!

**रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र**

१. रसायनशास्त्राचा 'शास्त्र' म्हणून विचार करणारा पहिला शास्त्रज्ञ .... **रॉबर्ट बॉईल**

२. प्रत्येक पदार्थ हा अतिसूक्ष्म कणांनी बनलेला असतो; ही कल्पना प्रथम .... या प्राचीन भारतीय शास्त्रज्ञानेच जगासमोर ठेवली. **कणाद**

३. आयोडीनच्या द्रावात स्टार्चचे दोन थेंब टाकले असता आयोडीनचा द्राव .... रंगाचा होईल. **निळ्या**

४. हळदीच्या द्रावात बुडविलेला कागद साबणाच्या द्रावात बुडविला असता त्या कागदास कोणता रंग प्राप्त होईल? **तांबडा**

५. निसर्गामध्ये एकूण .... मूलद्रव्ये आढळतात. **९२**

६. कक्ष तापमानाला द्रवस्थितीत असणारा एकमेव अधातू .... **ब्रोमीन**

७. कक्ष तापमानाला द्रवस्थितीत असणारा एकमेव धातू .... **पारा**

८. पाणी या संयुगात हायड्रोजन आणि ऑक्सिजन यांच्या अणूंचे प्रमाण २:१ असते; परंतु, त्यांच्या वजनी प्रमाणाचा (Atomic Weight) विचार केला असता हेच प्रमाण .... असते. **१ : ८**

९. रसायनशास्त्रज्ञांना आतापर्यंत कृत्रिमरीत्या एकूण .... इतकी मूलद्रव्ये बनविण्यात यश प्राप्त झाले आहे. **पंधरा**

१०. 'क्लोरीन' या वायूचा रंग .... असतो. **पोपटी**

११. अल्फा अथवा हेलिअम अणुकेंद्रांचा शोध .... **अर्नेस्ट रूदरफोर्ड**

१२. सोडिअम धातूचा तुकडा पाण्यात टाकल्यास .... हा वायू मुक्त होईल. **हायड्रोजन**

१३. गंधक .... मध्ये द्रावणीय आहे. **कार्बन–डाय–सल्फाइड**

१४. छपाईची शाई तयार करण्यासाठी .... चा वापर केला जातो. **कार्बन**

१५. .... हा कक्ष तापमानास हवेत पेट घेत असल्यामुळे तो नेहमी पाण्याखाली ठेवला जातो. **पिवळा फॉस्फरस**

१६. पिवळ्या फॉस्फरसपासून तांबडा फॉस्फरस बनविताना .... हे उत्प्रेरक म्हणून वापरले जाते. **आयोडीन**

१७. लसणासारखा वास असणारे मूलद्रव्य .... **पिवळा फॉस्फरस**

१८. .... या वायूस 'हसविणारा वायू' असे म्हटले जाते. **नायट्रस ऑक्साइड**

१९. .... या वायूस ठसका आणणारा वास येतो. **सल्फर–डाय–ऑक्साइड ($SO_2$)**

२०. कांदा कापताना .... हा वायू बाहेर पडत असल्याने डोळ्यास पाणी येते. **अमोनिया**

# ४ वर्ग-वर्गमूळ, घन-घनमूळ

**अवयव आणि मूळ अवयव**

(१) 12 ही संख्या 2 आणि 6 या संख्यांच्या गुणाकाराने बनली आहे; म्हणून 2 आणि 6 हे 12 चे अवयव आहेत. 12 = 2 x 6

(२) 12 ही संख्या 3 आणि 4 या संख्यांच्या गुणाकाराने बनली आहे; म्हणून 3 आणि 4 हे 12 चे अवयव आहेत. 12 = 3 x 4

(३) 2 आणि 3 या मूळ संख्या आहेत आणि त्या 12 चे अवयवसुद्धा आहेत; म्हणून 2 आणि 3 हे 12 चे मूळ अवयव आहेत.

(४) 6 ही संख्या 12 ची अवयव आहे; पण मूळ अवयव नाही; कारण 6 चे पुन्हा अवयव पडतात. 6 = 2 x 3

(५) 2 ही संख्या 7 ची अवयव नाही; कारण 2 ने 7 ला पूर्ण भाग जात नाही.

**वर्ग आणि वर्गमूळ**

(१) एखाद्या संख्येला त्याच संख्येने गुणले तर येणारा गुणाकार हा त्या संख्येचा 'वर्ग' असतो.

6 x 6 = 36 — 36 हा 6 चा वर्ग आहे.

10 x 10 = 100 — 100 हा 10 चा वर्ग आहे.

(२) 36 व 100 या वर्गसंख्या आहेत. वर्गसंख्या ज्या संख्येचा वर्ग असते त्या संख्येला 'वर्गमूळ' म्हणतात. 6 चा वर्ग 36 आहे. 36 चे वर्गमूळ 6 आहे. 10 चा वर्ग 100 आहे. 100 चे वर्गमूळ 10 आहे.

(३) संख्येचे वर्गमूळ दाखविण्यासाठी '$\sqrt{\ }$' (Square Root) या चिन्हाचा वापर करतात.

$\sqrt{36}$ म्हणजे 36 चे वर्गमूळ. $\sqrt{36} = 6$

(४) $6^2$ याचा अर्थ 6 चा वर्ग किंवा 6 x 6 = 36

**घन आणि घनमूळ**

(१) एखादी संख्या तीन वेळा मांडून गुणाकार केला म्हणजे त्या संख्येचा घन मिळतो आणि त्या संख्येला त्या घनाचे 'घनमूळ' म्हणतात.

6 x 6 x 6 = 216 — 216 हा 6 चा घन आहे.

10 x 10 x 10 = 1,000 — 1,000 हा 10 चा घन आहे.

(२) घनसंख्या ज्या संख्येचा घन असते तिला 'घनमूळ' म्हणतात.

216 चे घनमूळ 6 आहे.

1,000 चे घनमूळ 10 आहे.

(३) $6^3$ याचा अर्थ 6 चा घन किंवा 6 x 6 x 6 = 216

(४) $\sqrt[3]{216}$ याचा अर्थ 216 चे घनमूळ. $\sqrt[3]{216} = 6$

## सोडवून दाखविलेली उदाहरणे

(१) $(13)^2 = ?$

**स्पष्टीकरण :** $(13)^2 = 13 \times 13 = 169$ $\therefore$ **169 हे उत्तर.**

(२) $\sqrt{256} = ?$

**स्पष्टीकरण :**

$$\sqrt{256} = \sqrt{2 \times 2 \times 2 \times 2 \times 2 \times 2 \times 2 \times 2}$$

$$= \sqrt{(2 \times 2 \times 2 \times 2) \times (2 \times 2 \times 2 \times 2)}$$

$$\therefore \sqrt{256} = (2 \times 2 \times 2 \times 2) = 16$$

$\therefore$ **16 हे उत्तर.**

(३) $(7)^3 = ?$

**स्पष्टीकरण :** 7 चा घन काढावयाचा. $7 \times 7 \times 7 = 343$ $\therefore$ **343 हे उत्तर.**

(४) $(3)^3 - \sqrt{144} = ?$

**स्पष्टीकरण :** $(3)^3 = 3 \times 3 \times 3 = 27;$ $\sqrt{144} = 12$

$27 - 12 = 15$ $\therefore$ **15 हे उत्तर.**

(५) $\sqrt{625} - \sqrt{169} = ?$

**स्पष्टीकरण :** 625 चे वर्गमूळ 25, 169 चे वर्गमूळ 13

$\therefore 25 - 13 = 12$ $\therefore$ **12 हे उत्तर.**

(६) $(18)^2 + 18 = ?$

**स्पष्टीकरण :** $(18)^2 = 18 \times 18 = 324,$ $324 + 18 = 342$

$\therefore$ **342 हे उत्तर.**

(७) $8^2 \times 8^2 = ?$

**स्पष्टीकरण :** गुणाकार करताना जर पाया समान असेल तर घातांकांची बेरीज होते.

$$\therefore 8^2 \times 8^2 = 8^{2+2} = 8^4$$

$$(8 \times 8) \times (8 \times 8) = 8 \times 8 \times 8 \times 8 = 4096$$

$\therefore$ **4096 हे उत्तर.**

(८) $(15)^2 - (6)^3 = ?$

**स्पष्टीकरण :** $15 \times 15 = 225$ $6 \times 6 \times 6 = 216$

$\therefore 225 - 216 = 9$ $\therefore$ **9 हे उत्तर.**

२

# बुद्धिमापन चाचणी
# संमिश्र महत्त्वाचे प्रश्न

**प्रश्न 1.** खालील मालिकेत समावेश होऊ शकत नसलेली संख्या ओळखा.

180, 154, 130, 108, 88, 78

(1) 130 (2) 108 (3) 88 (4) 78

**उत्तर :** (4) 78. मालिकेतील संख्या क्रमाने 26, 24, 22, 20, 18 या क्रमाने कमी होत गेल्या. जसे– 180 − 26 = 154, 154 − 24 = 130, 130 − 22 = 108, 108 − 20 = 88 या पद्धतीने या मालिकेत 88 −18 = 70 यावयास हवेत; परंतु येथे '78' ही संख्या दिली आहे. ती या मालिकेशी विसंगत आहे.

**प्रश्न 2.** खालीलपैकी विसंगत घटक ओळखा.

दूरदर्शन, चित्रपट, संगणक, वृत्तपत्र, रेडिओ

(1) चित्रपट (2) रेडिओ (3) संगणक (4) वृत्तपत्र

**उत्तर :** (2) रेडिओ. (श्राव्य माध्यम आहे) चित्रपट, संगणक आणि वृत्तपत्र ही दृश्य माध्यमे आहेत.

**प्रश्न 3.** शेजारच्या माणसाचा परिचय करून देताना एक स्त्री म्हणाली, 'त्याची बायको माझ्या आईची एकुलती एक मुलगी आहे.' स्त्रीचे त्या माणसाशी नाते काय?

(1) मेहुणी (2) पत्नी

(3) आत्या (4) यांपैकी कोणतेच नाही.

**उत्तर :** (2) पत्नी. 'माझ्या आईची एकुलती एक मुलगी' म्हणजे ती स्त्री स्वत:.

**प्रश्न 4.** खालीलपैकी कोणता अक्षरसमूह इतरांसारखा नाही?

acquire, require, enquire, requiem

(1) acquire (2) require (3) enquire (4) requiem

**उत्तर :** (4) requiem. उच्चार व स्पेलिंग वेगळे.

**प्रश्न 5.** खालीलपैकी कोणती संख्या इतर संख्यांसारखी नाही?

78, 117, 234, 154

(1) 78 (2) 117 (3) 234 (4) 154

**उत्तर :** (4) 154. (13 ने भाग जात नाही.) 78, 117 आणि 234 यांना 13 ने भाग जातो.

सम संख्या-विषम संख्या या दृष्टीने विचार करता '117' ही विषम संख्या असल्याने आणि बाकीच्या सम संख्या असल्याने '117' ही संख्या इतरांपेक्षा वेगळी ठरते. एवम्, या प्रश्नाची दोन उत्तरे संभवतात.

**प्रश्न 6.** खालील प्रश्नात अक्षरांचे गट विशिष्ट क्रमाने दिलेले आहेत. तो क्रम ओळखून रिकाम्या जागी दिलेल्या पर्यायांपैकी कोणता गट येतो ते शोधा?

ACZXP, BDYYQ, CEXZR, DFWAS, ......, FHUCU

(1) FGVBT (2) EGUBT (3) EGVZT (4) EGVBT

**उत्तर :** (4) EGVBT. पाच अक्षरांच्या प्रत्येक गटातील अक्षरांचा क्रम लक्षात घ्यावा. पहिली अक्षरे ABCDEF, दुसरी अक्षरे CDEFGH, तिसरी अक्षरे ZYXWVU, चौथी अक्षरे XYZABC, पाचवी अक्षरे PQRSTU यावरून पाचव्या गटातील अक्षरे क्रमाने EGVBT.

**प्रश्न 7.** जर 'BARODA' हे B1R4D1 असे लिहिले आणि 'BHOPAL' हे BH4P1L असे लिहिले, तर 'INDORE' कसे लिहावे?

(1) 3ND4R2 (2) 3ND2R4 (3) IND4R2 (4) IND2R4

**उत्तर :** (1) 3ND4R2. वर्णमालेतील A, E, I, O, U या पाच स्वरांना (Vowels) अनुक्रमे 1, 2, 3, 4, 5 असे क्रमांक दिले आहेत.

त्यानुसार INDORE = 3ND4R2.

**प्रश्न 8.** जर APTITUDE = 15646723 तर 16646723 म्हणजे काय?

(1) ALTITUDE (2) ATTRIBUTE

(3) ATTITUDE (4) यांपैकी कोणतेच नाही.

**उत्तर :** (3) ATTITUDE. फक्त दुसऱ्या क्रमांकाचे अक्षर बदलले.

**प्रश्न 9.** जर TIREDNESS = SLEEP तर HUNGER = ?

(1) THIRST (2) FOOD (3) DAY (4) APETITE

**उत्तर :** (2) FOOD. थकवा आल्यानंतर झोप आवश्यक त्याप्रमाणे भूक लागल्यानंतर अन्न आवश्यक.

**प्रश्न 10.** जर a = −3, b = 4, c = −3, d = 4 तसेच n = 3, o = −4, p = 3, q = − 4.

CARPOV ची किंमत −1 आहे तर BHAGYAWAN = ?

(1) −7 (2) 9 (3) − 9 (4) 7

**उत्तर :** (3) − 9. इंग्रजी वर्णमालेतील अक्षरांच्या सम-विषम स्थानांवरून त्यांना दिलेल्या किमती लक्षात घ्याव्यात.

| A | B | C | D | E | F | G | H | I | J | K | L | M |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| −3 | 4 | −3 | 4 | −3 | 4 | −3 | 4 | −3 | 4 | −3 | 4 | −3 |

| N | O | P | Q | R | S | T | U | V | W | X | Y | Z |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | −4 | 3 | −4 | 3 | −4 | 3 | −4 | 3 | −4 | 3 | −4 | 3 |

CARPOV = (−3) + (−3) + (3) + (3) + (−4) + (3)
= 9 − 10
= −1 (उत्तर).

BHAGYAWAN = (4) + (4) + (−3) + (−3) + (−4) + (−3) + (− 4) + (−3) + (3)
= 11 − 20
= −9 (उत्तर).

**प्रश्न 11.** जर RED चे रूपांतर WED असे केले, तर DEW चे रूपांतर कसे होईल?

(1) EDR (2) DRE (3) DER (4) ERD

**उत्तर :** (3) DER. या ठिकाणी प्रथम आलेल्या RED या शब्दात 'R' ऐवजी 'W' हे अक्षर योजले आहे. म्हणून नंतर दिलेल्या DEW या शब्दांत 'W' ऐवजी 'R' हे अक्षर घेणे सयुक्तिक आहे. म्हणून DER हे उत्तर योग्य.

**प्रश्न 12.** खाली दिलेल्या अक्षरांच्या यादीत किती स्वरांनंतर द्विरुक्त अक्षरे व त्यानंतर पुन्हा स्वर येतात?

B K H H P D T P P H N P J J I M R F F G O U B B E H

I N N A G D X X Q Y L S S K Z N P P I O T U U A C N

(1) 2 (2) 3 (3) 4 (4) 5

**उत्तर :** (1) 2. इंग्रजी वर्णमालेत A, E, I, O, U हे पाच स्वर (Vowels) आहेत. (स्वर, व्यंजन, व्यंजन, स्वर) असा क्रम असलेले अक्षर गट शोधायचे.

B K H H P D T P P H N P J J I M R F F G O U B B E H

I N N A G D X X Q Y L S S K Z N P P I O T U U A C N





**प्रश्न 13.** एका संकेतात + म्हणजे x, – म्हणजे + आणि x म्हणजे ÷,


तर 7 + 4 – 12 x 3 ची किंमत काय?

(1) 32 (2) 25 (3) 30 (4) 44

**उत्तर :** (1) 32. येथे 7 + 4 – 12 x 3 ची संकेतानुसार मांडणी 7 x 4 + 12 ÷ 3 अशी होते. त्यानुसार 7 x 4 + 12 ÷ 3 = 28 + 4 = 32 हे उत्तर.

**प्रश्न 14.** पुढे काही संच दिले आहेत. त्यामधील घटकांचा संबंध पुढीलपैकी कोणती आकृती उत्तम प्रकारे दाखवते? चिन्ह, मूळाक्षर, अंक.

(1)  (2)  (3)  (4) 

**उत्तर :** (1)  . मूळाक्षर हे उच्चार दर्शविणारे लिपीचिन्ह आहे. अंक संख्या दर्शविणारे चिन्हच आहे. चिन्हामध्ये मूळाक्षर आणि अंक यांचा समावेश होतो. पण मूळाक्षर अंक नाही आणि अंक मूळाक्षर नाही. म्हणजे मूळाक्षर व अंक स्वतंत्र आहेत. त्यांचे स्वतंत्र अस्तित्व एका मोठ्या वर्तुळात (चिन्ह) लहान दोन वर्तुळांनी दाखविले आहे.

**प्रश्न 15.** जर 1235 म्हणजे + x – < व 9478 हे⊗★> = आहे तर = ★ x < > यातून कोणती संख्या दर्शविली आहे?

(1) 42587 (2) 45728 (3) 84257 (4) 47852

**उत्तर :**(3) 84257. अंकांसाठी वापरलेली चिन्हे लक्षात घेणे.

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 7 | 8 | 9 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| + | × | – | * | < | > | = | ⊗ |

यावरून = *x< > यातून 84257 ही संख्या दर्शविली जाते.

# चालू घडामोडी

**हे लक्षात ठेवा!**

१. भारत व श्रीलंका यांच्यात ७ ते १३ सप्टेंबर दरम्यान संपन्न झालेला नौदलांचा संयुक्त सागरी अभ्यास– **'स्लिनेक्स १८'**

२. स्वामी विवेकानंद यांनी शिकागो येथील जागतिक सर्व धर्म परिषदेसमोर आपले गाजलेले भाषण केले होते. या घटनेस ११ सप्टेंबर, २०१८ रोजी .... वर्षे पूर्ण होत आहेत. **१२५**

३. स्पॅम मेल पाठविण्यात अमेरिका जगात अग्रेसर आहे, तर भारत .... क्रमांकावर आहे. **चौथ्या**

४. सन २०१९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाकडून कोणता नारा देण्यात आला? **अजेय भारत, अटल भाजप**

५. केंद्र शासनाने नुकतीच सात नवीन भारतीय व्यवस्थापन संस्था (आयआयएम) उभारण्यास मंजुरी दिली आहे .... **अमृतसर, बोधगया, नागपूर, संबलपूर, सिरमौर, जम्मू, विशाखापट्टणम इत्यादी**

१८ ऑगस्ट ते २ सप्टेंबर, २०१८ दरम्यान इंडोनिशियातील जकार्ता आणि पालमबांग या दोन शहरांमध्ये अठरावी आशियाई क्रीडा स्पर्धा संपन्न झाली. भिन–भिन (नंदनवनातील एक पक्षी), अतुंग (हरीण) आणि काका (गेंडा) हे या स्पर्धेचे शुभंकर होते.

**पदकतालिका**

| क्रमवारी | देश | सुवर्णपदक | रौप्यपदक | कांस्यपदक | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | चीन | १३२ | ९२ | ५६ | २८९ |
| २. | जपान | ७५ | ५६ | ७४ | २०५ |
| ३. | दक्षिण कोरिया | ४९ | ५८ | ७० | १७७ |
| ४. | इंडोनेशिया | ३१ | २४ | ४३ | ९८ |
| ५. | उज्बेकिस्तान | २१ | २४ | २५ | ७० |
| ६. | इराण | २० | २० | २२ | ६२ |
| ७. | चायनीज तैपेई | १७ | १९ | ३१ | ६७ |
| ८. | भारत | १५ | २४ | ३० | ६९ |
| ९. | कजाकिस्तान | १५ | १७ | ४४ | ७६ |
| १०. | उत्तर कोरिया | १२ | १२ | १३ | ३७ |

६. आसामच्या प्रथम क्रीडा सदिच्छादूतपदी ‘ढिंग एक्स्प्रेस’ म्हणून ओळखाल्या जाणाऱ्या .... हीची नेमणूक केली गेली आहे. **हिमा दास**

७. आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन २०१८ चा संकेत .... हा आहे. **लिटरसी अँड स्किल्स डेव्हलपमेंट**

८. १४ ते १५ जानेवारी, २०१९ रोजी इंडसफूड-२ परिषदेचे आयोजन कोणत्या शहरात करण्यात येणार आहे? **ग्रेटर नोएडा**

९. इंडिया आफ्टर नेहरू, बियाँड दि लाइन्स आणि इमरजन्सी रिटोल्ड या प्रख्यात पुस्तकांचे लेखक .... **कुलदीप नायर**

१०. ॲन एरिया ऑफ डार्कनेस, इंडिया : अ वुंडेड सिव्हिलायझेशन, इन अ फ्रि स्टेट यांसारख्या गाजलेल्या इंग्रजी साहित्यकृतीचे जनक व मूळ भारतीय वंशाचे ब्रिटनस्थित साहित्यिक .... **विद्याधर सुरजप्रसाद नायपॉल**

११. अकरावे विश्व हिंदी संमेलन १८ ते २० ऑगस्ट, २०१८ दरम्यान कोणत्या शहरात पार पडले? **पोर्ट लुई (मॉरिशस)**

१२. गांधी : द इयर्स दॅट चेंज्ड द वर्ल्ड (१९१४-१९१८) या पुस्तकाचे लेखक आहेत .... **रामचंद्र गुहा**

१३. भारत व थायलंड दरम्यान ऑगस्ट, २०१८ मध्ये झालेला संयुक्त सैन्य अभ्यास सराव .... **मैत्री**

१४. भारतातील तसेच आशियातीलही युरेनियम आधारित पहिली संशोधनात्मक अणुभट्टी १० सप्टेंबर, २०१८ रोजी पुन्हा एकदा कार्यरत करण्यात आली. या अणुभट्टीचे नाव .... **अप्सरा**

१५. केरळमधील पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी भारतीय सेना आणि नौसेना या दोहोंनी चालविलेली अभियाने अनुक्रमे .... **ऑपरेशन सहयोग आणि ऑपरेशन मदद**

१६. कलैगनार म्हणून ओळखले जाणारे आणि पाच वेळा तमिळनाडूचे मुख्यमंत्रिपद भूषविणारे .... यांचे ७ ऑगस्ट, २०१८ रोजी चेन्नई येथे निधन झाले. **एम. करुणानिधी**

१७. राज्यसभेचे नवनिर्वाचित व विद्यमान उपसभापती .... **हरिवंश नारायण सिंह**

१८. ईज ऑफ लिविंग इंडेक्स - २०१८ अनुसार देशातील प्रमुख शहरांतून ‘सर्वोत्कृष्ट राहण्यायोग्य शहर’ म्हणून कोणत्या शहराचा उल्लेख कराल? **पुणे**

१९. सन २०१४ पासून राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारकडून २५ डिसेंबर हा अटलजींचा जन्मदिवस .... म्हणून पाळण्यात येतो. **सुशासन दिन**

२०. बिमस्टेक देशांचे चौथे शिखर संमेलन ३०-३१ ऑगस्ट दरम्यान कोठे पार पडले? **काठमांडू (नेपाळ)**

२१. भारत व पाकिस्तान दरम्यान पहिल्यांदाच होणाऱ्या संयुक्त सैन्य अभ्यासाचे सांकेतिक नाव .... **पीस मिशन-२०१८**

२२. राष्ट्रीय महिला आयोगाच्या नवनिर्वाचित व विद्यमान अध्यक्षा ..... **रेखा शर्मा**

२३. सरकारच्या शेतकरी कल्याण उपक्रमांना चालना देण्यासाठी २०१८ च्या अर्थसंकल्पात घोषणा केल्याप्रमाणे शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांसाठी योग्य दर सुनिश्चित करण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकतीच .... या योजनेला मंजुरी दिली. **‘प्रधनामंत्री अन्नदाता आय संरक्षण अभियान (PM-AASHA)’**

२४. भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट, २०१८ रोजी निधन झाले. त्यांनी एकूण किती वेळा भारताचे पंतप्रधानपद भूषविले होते? **तीन**

२५. डीआरडीओच्या चेअरमनपदी नुकतीच .... यांची निवड करण्यात आली. **जी सतीश रेड्डी**

२६. सांप्रदायिक सद्‌भावना व शांततेसाठी प्रयत्न यांसाठी देण्यात येणारा राजीव गांधी सद्‌भावना पुरस्कार-२०१८ नुकताच यांना देण्यात आला.... **गोपाल कृष्ण गांधी**

२७. अठराव्या आशियाई क्रीडा स्पर्धेदरम्यान नेमबाजीच्या २५ मीटर पिस्तुल प्रकारात .... हिने सुवर्णपदक पटकावले. या नेमबाजीच्या प्रकारात सुवर्णपदक पटकावणारी ती पहिली भारतीय पहिला नेमबाज ठरली. **राही सरनोबत**

२८. आशियाई क्रीडा स्पर्धा २०१८ मध्ये पहिल्यांदाच खेळल्या गेलेल्या 'ब्रिज' या पत्त्यांच्या क्रीडाप्रकारात .... आणि .... यांच्या जोडीने सुवर्णपदक पटाकविले. **प्रणव वर्धन, शिवनाथ सरकार**

२९. आशियाई क्रीडा स्पर्धा २०१८ मध्ये तब्बल ४८ वर्षांनंतर भारताला ट्रिपल जम्प प्रकारात .... याने सुवर्णपदक मिळवून दिले. **ॲथलीट अपरिंदर सिंह**

३०. १८ ऑगस्ट, २०१८ रोजी संयुक्त राष्ट्रांचे माजी महासचिव .... यांचे निधन झाले. **कोफी अन्नान**

३१. ८ जुलै, २०१८ रोजी जिम्नॅस्टिक्स विश्वचषक स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून या स्पर्धेत सुवर्णपदक मिळविणारी पहिली महिला ठरण्याचा मान .... हिने मिळविला. **दीपा कर्माकर**

३२. २४ जुलै, २०१८ रोजी पहिली वैश्विक दिव्यांगता परिषद .... येथे पार पडली. **लंडन (युनायटेड किंग्डम)**

३३. २९ जुलै, २०१८ रोजी रशियन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतेपद .... या खेळाडूने पटकावले आणि ही कामगिरी करणारा तो पहिलाच भारतीय बॅडमिंटनपटू ठरला. **सौरभ वर्मा**

३४. १४ जून ते १५ जुलै, २०१८ दरम्यान रशियामध्ये पार पडलेल्या एकविसाव्या फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत .... या देशाने अजिंक्यपद पटकावले. **फ्रान्स**

३५. जून, २०१८ मध्ये अठरावी आंतरराष्ट्रीय माहिती संपर्क तंत्रज्ञान परिषद .... येथे पार पडली. **काठमांडू (नेपाळ)**

३६. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या 'हॉल ऑफ फेम' मध्ये एका भारतीय क्रिकेटपटूस सामील करण्यात आले. हा सन्मान प्राप्त करणारा तो पाचवा भारतीय क्रिकेटपटू ठरला. हा क्रिकेटपटू कोण? **राहुल द्रविड**

३७. चेन्नई येथील .... हा भारताचा पहिला आणि जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वांत कमी वयाचा ग्रँडमास्टर ठरला आहे. **आर. प्राग्नानंधा**

३८. फ्रान्समधील विची येथे पार पडलेल्या 'आयर्नमॅन २०१८' या स्पर्धेचा किताब .... यांनी पटकावला आहे. **रविंद्रकुमार (नाशिकचे पोलीस आयुक्त)**

३९. पाकिस्तानचे नवे पंतप्रधान म्हणून ऑगस्ट, २०१८ मध्ये विख्यात माजी क्रिकेटपटू .... यांनी शपथ घेतली. **इम्रान खान**

४०. २ मार्च, २०१८ रोजी जगातील सर्वाधिक क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प .... या राज्यात सुरू करण्यात आला. **कर्नाटक**

४१. १५ मार्च, २०१८ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'शाश्वत विकास उपाय साखळी'द्वारा प्रकाशित केलेल्या जागतिक आनंद निर्देशांक अहवालात १५६ देशांच्या यादीमध्ये भारत .... व्या क्रमांकावर आहे. **१३३**

४२. २० मार्च, २०१८ रोजी केंद्रीय रसायने व खत मंत्रालयाने .... राज्यातील देवघर जिल्ह्यात प्लॅस्टिक पार्क उभारण्यास संमती दिली. **झारखंड**

# महाराष्ट्र दुय्यम सेवा (अराजपत्रित) गट–ब पूर्व परीक्षा – २०१८

१. ‘प्रधानमंत्री मातृत्व (मातृ) वंदना’ योजनेबाबत खालील विधाने विचारात घ्या.
   (१) सदरहू योजना १ एप्रिल, २०१६ रोजी केंद्र शासनाने लागू केली आहे.
   (२) या योजनेनुसार शासन गर्भवती आणि स्तन्यदा मातांना रु. ८,००० वित्त साहाय्य देते.
   (३) गर्भवती महिलांना आणि स्तन्यदा मातांना रोख रकमेद्वारे त्यांचे आरोग्य सुधारणे हेदेखील या योजनेचे उद्दिष्ट आहे.
   (अ) विधाने १, २, ३ बरोबर आहेत. (ब) फक्त विधाने २, ३ बरोबर आहेत.
   (क) केवळ विधान १ बरोबर आहे. (ड) केवळ विधान ३ बरोबर आहे.

२. ‘दी कोएलिशन ईअर्स’ (The Coalition Years) या पुस्तकाचे लेखक कोण आहेत?
   (अ) प्रणव मुखर्जी (ब) पी. चिदंबरम् (क) डॉ. मनमोहन सिंग (ड) कपिल सिब्बल

३. सन २०१८ च्या आयपीएल टी–२० क्रिकेट स्पर्धेच्या खेळाडूंच्या लिलावामध्ये जयदेव उनाडकट हा सर्वाधिक बोलीने करारबद्ध झाला. त्याला कोणत्या संघाने करारबद्ध केले?
   (अ) राजस्थान रॉयल्स् (ब) किंग्ज् इलेव्हन पंजाब
   (क) चेन्नई सुपर किंग्ज् (ड) कोलकाता नाईट रायडर्स

४. महाराष्ट्र शासनाचा यंदाचा डॉ. अशोक केळकर यांच्या नावे दिला जाणारा भाषा अभ्यासक पुरस्कार नुकताच कोणाला देण्यात आला?
   (अ) डॉ. रंगनाथ पठारे (ब) डॉ. मिलींद जोशी
   (क) डॉ. अविनाश बिनीवाले (ड) डॉ. अशोक कामत

५. भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या विविध पुढाकारांपैकी पुढे दिलेल्या पुढाकारांच्या पर्यायांपैकी चुकीचा पर्याय कोणता आहे, ते सांगा?
   (अ) प्रसाद : प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांच्या येथे भाविकांना नि:शुल्क अन्न वितरण.
   (ब) हृदय : भारताच्या वारसा असणाऱ्या शहरांचे जतन आणि नवजीवन घडविणे.
   (क) इनक्रेडिबल इंडिया २.० : भारतात पर्यटनाचा विकास घडविणे.
   (ड) पर्यटन स्थानी ई–तिकिटांची सुविधा : ताजमहाल आणि हुमायूनची कबर येथे सुरुवात.

६. कैलास मानसरोवर यात्रेसंदर्भात पुढीलपैकी कोणती विधाने सत्य आहेत?
   (अ) या यात्रेचे आयोजन परराष्ट्र मंत्रालयाद्वारा केले जाते.
   (ब) यात्रेचे आयोजन दोन वेगवेगळ्या मार्गांनी होते– एक मार्ग लिपुलेख खिंड (उत्तराखंड) आणि दुसरा मार्ग नाथू–ला खिंड (सिक्कीम).
   (क) या यात्रेसाठी परकीय/परदेशी व्यक्ती पात्र नाहीत.
   (ड) यात्रेकरूंना या यात्रेसाठी परराष्ट्र मंत्रालय कोणतीही सवलत/आर्थिक साहाय्य देत नाही.

१. (ड) २. (अ) ३. (अ) ४. (क) ५. (अ) ६. (अ)